

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
२० मार्च २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

## सदा डुम्बरे : 'कोल्हापूर सकाळ'पासून पाहिलेले
दशरथ पारेकर

# मुक्त विचारांचं भय : कट्टर उजव्यांनी केलेलं कट्टर डाव्यांचं अनुकरण

रामचंद्र गुहा



डोरा रसेल



रवींद्रनाथ टागोर


जॉबची संधी नक्की!
करिअरची दिशा पक्की!!
कॉलेज सोबत करा करियरची तयारी
MKCL
आता MS-CIT केंद्रात जाऊन शिका
किंवा घरून आपल्या कंप्यूटरवर शिका
किंवा आपल्या स्मार्टफोनवरून शिका
नव्या करियर्सचे प्रवेशद्वार
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
www.mkcl.org/mscit
प्रवेशासाठी www.mkcl.org/join या लिंकला भेट द्या
किंवा नजिकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा
आजच प्रवेश घ्या!
संपर्क : 8411960005

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
२० मार्च २०२१
वर्ष ७३ / अंक - ३१
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

४ ...संपादकीय
**भारताच्या उज्ज्वल भवितव्यासाठी**
यशवंतराव चव्हाण

७ **मुक्त विचारांचं भय : कट्टर उजव्यांनी केलेलं कट्टर डाव्यांचं अनुकरण**
...रामचंद्र गुहा

१० **बांगलादेशातील हिंदू कायद्यात सुधारणेची आवश्यकता**
...न्या. हेमंत गोखले

१४ **सदा डुम्बरे : 'कोल्हापूर सकाळ'पासून पाहिलेले**
...दशरथ पारेकर

२२ **'एकाकी'मधील शेवटची दोन प्रकरणे**
...सुरेश द्वादशीवार

२८ **विषमतेचा विषाणू**
...संतोष दास्ताने

३३ **न्या. राजिन्दर सच्चर : एक सच्चा माणूस**
...छाया दातार

३८ **'अंतर्नाद'चा पूर्णविराम**
...रवी गोडबोले

संपादकीय

# भारताच्या उज्ज्वल भवितव्यासाठी

यशवंतराव चव्हाण

१९६२ मध्ये जे घडले, त्याचे स्वतंत्र महत्त्व आहे, असे मी मानतो. कारण त्या घटनेने भारताच्या केवळ संरक्षणविषयक समस्येच्या दृष्टीनेच नव्हे, तर राजकीय दृष्ट्याही दीर्घकालीन परिणाम घडवून आणला. त्या वेळी चीनने सीमावाद उकरून काढून भारतावर आक्रमण केले. चिनी सैनिक नेफा-लडाखमध्ये घुसले आणि एके दिवशी सकाळी अचानक चीनने आपण माघार घेत असल्याचे जाहीर केले. त्याप्रमाणे त्याने आपले सैन्य मागे घेतलेही.

२० नोव्हेंबर १९६२ ची रात्र अजूनही आपल्याला आठवते. त्या वेळी चीनने एकतर्फी माघारीची घोषणा केली. त्याच दिवशी मी मुंबईहून संरक्षणमत्री पदाची वस्त्रे घेण्यासाठी दिल्लीस गेलो. चीनबरोबर लढण्यासाठी माझी संरक्षणमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. चीनबरोबरची लढाई आता उरलेलीच नाही, हे मला दुसऱ्या दिवशी सकाळी समजले. मी दिल्लीस गेलो, म्हणून लढाई थांबली असे मला म्हणायचे नाही; परंतु तसे घडले हे मात्र खरे. महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की चीनने आक्रमण का केले आणि नंतर एकतर्फी माघार का घेतली? व्यापलेला सगळाच प्रदेश चीनने सोडलेला नाही. अजून लडाखचा काही भाग त्याच्याच ताब्यात आहे. यामागचे कारण समजावून घेतले पाहिजे. चीन काही गमतीकरिता आलेला नव्हता, किंवा हिमालयाची सहल करण्याकरता त्याने आपल्या सैन्यास धाडले नव्हते. चिनी सैनिक शस्त्रास्त्रे घेऊन आलेले होते. त्यांच्यापाशी तोफखाना होता. ते आपल्या लोकांशी लढले. त्यांनी आपली शक्ती दाखवली. आपल्यापाशी सामर्थ्य आहे हे त्यांना कळून आले; पण या आक्रमणामागचा उद्देश कोणता होता? ज्या देशाबरोबर आपल्याला युद्ध करावे लागते, त्याचा राजकीय उद्देश समजावून घेतल्याशिवाय आपल्याला लढता येत नाही. म्हणून आक्रमणामागचा चीनचा उद्देश समजावून घेतला पाहिजे. मला असे वाटते की, या आक्रमणामागे चीनचे दोन-तीन हेतू असावेत. ज्या जगात आपण राहतो, त्या जगात राजकीयदृष्ट्या चीन महत्त्वाचा आहे, भारत नव्हे, हे आफ्रिकी-आशियाई इत्यादी देशांना कळावे, हा चीनचा एक हेतू असावा. लष्करीदृष्ट्या चीन बलवान आहे, भारत नव्हे, हे जगाला दाखवून द्यायचे असावे आणि आपले आर्थिक विचार, आर्थिक सिद्धता आणि आर्थिक साधनसंपत्ती यांच्यावर एक प्रकारचा ताण पडावा, हा त्याचा दुसरा हेतू असावा. कारण तोपर्यंत आपण आपल्या आर्थिक विकासावर विशेष भर देत होतो. आपण आपली आर्थिक साधनसामग्री वाढविली, आर्थिक बाबतीत देश स्वयंपूर्ण केला, तर आपली संरक्षणक्षमता वाढवू शकू, असे आपण मानत होतो.

आक्रमण करून भारताची आर्थिक ताकद खच्ची करावी, असे चीनला वाटत असले पाहिजे. भारताला अलिप्ततावाद सोडायला भाग पाडावे, हा त्याचा तिसरा हेतू असावा, असेही मला वाटते. अमेरिका आणि रशिया यांच्या दरम्यान सुरू असलेल्या शीतयुद्धापासून आपण अलिप्त रहावे आणि या दोन्ही गटांतील राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध ठेवावेत, ही भारताची भूमिका चीनला रुचण्यासारखी नव्हती.

चीनच्या १९६२ मधील आक्रमणाने अनेक राजकीय प्रश्न स्पष्ट केले आहेत. शीतयुद्ध हे दोन लष्करांतील युद्ध नसते. जागतिक वर्चस्वासाठी धडपडणाऱ्या दोन भिन्न विचारसरणींमधील ते युद्ध असते. अशा युद्धाचे नेतृत्व आपल्याकडे यावे, अशी




चीनची आकांक्षा आहे. या आकांक्षेबरोबरच त्याला आणखी एका महत्त्वाकांक्षेने ग्रासलेले आहे. साऱ्या जगाचे नाही, तरी निदान आशियाई–आफ्रिकी देशांचे राजकीय नेतृत्व आपल्याकडे यावे, असे चीनला वाटते.

पाकिस्तानने भारताबाबत सतत शत्रुत्वाचीच भूमिका घेतलेली आहे. पाकिस्तानच्या दृष्टीने काश्मीर हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील एक विवाद्य प्रश्न आहे. काश्मीरचा भूभाग हा आमच्या दृष्टीने निश्चितच जसा महत्त्वाचा आहे, तसाच तो आमचा आहे. आमच्या भूमीचा इंच अन् इंच भाग आम्हांला प्रिय वाटतो; परंतु भारत–पाकिस्तान वाद केवळ काश्मीरपुरताच मर्यादित नाही. भूभागापेक्षाही अधिक महत्त्वाच्या गोष्टी त्यात अंतर्भूत आहेत. आपल्या लोकशाहीवादी राष्ट्रीय जीवनाशी तो प्रश्न निगडित आहे. खरे आव्हान तेच आहे.

आजचा भारत कसा आहे? भारत जर लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष राहणार नसेल, तर त्याला काहीच अर्थ उरणार नाही, ही गोष्ट आपण नीट समजावून घेतली पाहिजे. आपल्या संरक्षणाच्या दृष्टीनेही ती महत्त्वाची आहे. त्यासाठी आपल्याला भारताच्या गेल्या एक हजार वर्षांच्या इतिहासावर नजर टाकली पाहिजे. गेल्या हजार वर्षांचा भारताचा इतिहास हा भारतावर झालेल्या आक्रमणांचा इतिहास आहे. पूर्वीच्या काळी वायव्येकडून ही आक्रमणे झाली. टोळ्यांमागून टोळ्या, सैन्यांमागून सैन्ये येत होती आणि भारत पादाक्रांत करू पाहात होती. नंतर पश्चिमेकडून सागरी मार्गाने आक्रमणे झाली. या प्रत्येक आक्रमणाच्या वेळी भारत पराभूत झाला, ही वस्तुस्थिती मान्य केलीच पाहिजे.

आपण का पराभूत झालो? आपल्या देशात प्रतिकाराची परंपराच नव्हती का? आपल्या देशात रणधुरंधर नव्हते का? तसे मुळीच नव्हते. उलट या भूमीने अनेक पराक्रमी वीर आणि शूर योद्धे यांना जन्म दिलेला आहे, अशीच इतिहासाची साक्ष आहे. हा देश त्यागामध्ये कधीही उणा पडलेला नाही. तशी बुद्धिवंतांचीही कधी वाण नव्हती. तरीही आपण पराभूत झालो, ही वस्तुस्थिती शिल्लक उरतेच. मग असे का झाले? आपण चंद्रगुप्त, अशोक, चाणक्य आणि विजयनगर यांच्या परंपरा सांगतो. त्या परंपरा असूनही आक्रमकांसमोर आपल्याला नमते घ्यावे लागले. आपल्यापाशी शूर सैनिक होते, मोठे सैन्य होते, पराक्रमाचा वारसा होता आणि तरीही आपण आक्रमकांपुढे नमलो, याचे कारण आपण एक राष्ट्र नव्हतो. १९६२ मध्ये नेफा विभागात आक्रमकाला यशस्वी रीतीने रोखले, हा गेल्या हजार वर्षांच्या इतिहासातील पहिला प्रसंग आहे. १९६५ मध्ये पाकिस्तानच्या सुसज्ज लष्कराने आपल्यावर चाल केली. सुरुवातीला त्याला थोडेसे यशही मिळाले, परंतु नंतर आपण आक्रमकांना रोखले आणि त्यांचा पराभवही केला. याचे कारण आजचा भारत हा लोकशाहीवादी देश आहे. सर्व प्रांतांतील सर्व धर्मांचे, सर्व भाषिक गटांतील भारतीय एक होऊन आक्रमकांविरुद्ध उभे ठाकले.

हा नवा भारत काही विशिष्ट मूल्यांवर उभा आहे. ही कोणती मूल्ये आहेत? लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता ही ती मूल्ये आहेत. पंजाब, काश्मीर, राजस्थान आणि सिंध येथे कोण लढले? ते केवळ सिंधी किंवा पंजाबी किंवा काश्मिरी नव्हते. पंजाब, काश्मीर, राजस्थान येथील भूमीवर केवळ पंजाबी, काश्मिरी आणि राजस्थानी लोकांचे रक्त सांडलेले नाही. तामिळ लोकांचे रक्त तेथे सांडले, केरळीयांचे सांडले, कर्नाटकीयांचे सांडले, गुजरात्यांचे सांडले. म्हणून मी म्हणतो, की भारताचा नवा इतिहास लिहिला जात आहे, तो केवळ शाईने आणि लेखणीने लिहिला जात नाही. तलवार आणि रक्त यांनी तो लिहिला जात आहे. तलवार आणि रक्त यांनी लिहिला जात असलेला इतिहास हा खराखुरा आधुनिक इतिहास आहे. आपल्याला असा इतिहास घडविणारा भारत हवा आहे.

पाकिस्तानचे आक्रमण हे केवळ भारताच्या विशिष्ट भूभागावरचे आक्रमण नव्हते. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या भारताच्या राष्ट्रीय जीवनाच्या मूलभूत मूल्यांवरच हे आक्रमण करण्यात आले होते, म्हणून आपण कशासाठी लढत आहोत, हे नीट समजावून घेतले पाहिजे. तसेच आपण कोणाविरुद्ध लढत आहोत, याचाही बोध व्हावयास हवा.

एक हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या एका चिनी युद्धवेत्त्याने– चीनमध्ये असे अनेक युद्धवेत्ते होऊन गेले– अत्यंत मार्मिकपणे असे म्हटले आहे, की 'तुम्हाला जर शत्रूचा पराभव करावयाचा असेल, तर प्रथम शत्रू समजावून घ्या.' म्हणून आपणही आपला शत्रू कशासाठी आपले शत्रुत्व करीत आहे, हे जाणून घेतले पाहिजे. चीनला केवळ दक्षिण आणि आग्नेय आशियामध्येच नव्हे, तर संपूर्ण आशियाई–आफ्रिकी देशांमध्ये राजकीय वर्चस्व प्रस्थापित करावयाचे आहे. त्या दृष्टीने भारत हा आपल्या मार्गातील मुख्य अडसर आहे, असे त्याला वाटते. कारण चीनच्या विचारसरणीपेक्षा भिन्न विचारसरणी भारताने अंगिकारली आहे. चीनच्या विचारसरणीला आपण खराखुरा पर्याय शोधून काढला आहे.

आज आपल्याला ज्या दोन देशांशी मुकाबला करावा लागत आहे, त्या दोन्ही देशांत हुकूमशाही आहे. पाकिस्तानात धर्माधिष्ठित हुकूमशाही आहे, तर चीनची साम्यवादी हुकूमशाही आहे. या दोन्ही हुकूमशाही राजवटींना भारताचे खरे सामर्थ्य कळूच शकत नाही. भारत हा एक दुर्बल देश आहे असेच ते मानतात. लोकशाहीचे सामर्थ्य काय असते, हे त्यांना उमगून येत नाही. त्यात त्यांचाही काही दोष नाही. गेल्या जुलै–ऑगस्टमधील परिस्थिती ध्यानात घ्या. त्या वेळी भारतापुढे अनेक अडचणी होत्या. अन्नधान्याची टंचाई होती. ठिकठिकाणी निदर्शने होत होती. पंजाबमध्ये संत फत्तेसिंगांनी आमरण उपोषणाची धमकी दिली होती. मुंबईत हरताळ आणि संप घडून येत होते. दिल्लीत संसदेसमोर मोठा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. भारताचे विघटन होते की काय, अशी भीती वाटावी, अशी त्या वेळची परिस्थिती होती. आपल्याला लोकशाही पचली आहे किंवा नाही, अशी शंका व्यक्त केली जात होती. काय होणार आहे, हे कोणीच सांगू शकत नव्हते.

६ सप्टेंबरला भारतीय सैन्याने लाहोरची दिशा धरली आणि परिस्थिती एकदम बदलली. निदर्शने आणि हरताळ यांची भाषा ऐकू येईनाशी झाली. निदर्शनाची आणि उपोषणाची भाषा बंद पडली. हा खरा लोकशाहीचा अर्थ आहे. म्हणून आपण देशाची बांधणी करताना आपल्याला प्रिय असलेल्या मूल्यांचेही जतन करीत आहोत. भारताचे हे खरे चित्र आपण नेहमीच आपल्या डोळ्यांसमोर ठेवले पाहिजे. दुर्दैवाने पाकिस्तानला या चित्राचा अर्थ कळूच शकला नाही.

आपण चीनकडून एक धडा शिकलो, तो पाकिस्ताननेही ध्यानात घेतला पाहिजे. चीन आणि भारत मित्रभावाने नांदतील, असे आपण १९६२ पर्यंत गृहीत धरून चाललो होतो. १९५८–५९ मध्ये चौ एन–लाय मुंबईला आले होते, त्या वेळी मी द्वैभाषिक मुंबई राज्याचा मुख्यमंत्री होतो. मी त्यांच्या स्वागताला गेलो, तेव्हा मी त्यांच्यावर प्रेमपूर्ण पुष्पहारांचा वर्षाव केला. त्यांनी आपला हात उंचावून म्हटले, 'हिंदी चिनी भाई भाई!' मीही तसेच म्हटले. त्यांची ती घोषणा खरी आहे, अशीच आपली कल्पना झाली. तसे होणे स्वाभाविकही होते. कारण हातात पुष्पगुच्छ आणि अंत:करणात मैत्री ठेवून आपण मित्रांचे स्वागत करीत असतो. परंतु नंतर आपल्याला कळून आले, 'भाई भाई' म्हणविणाऱ्या या लोकांच्या हातात तलवारी आहेत आणि हृदयात विष आहे.

(संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी २९ डिसेंबर १९६५ रोजी, मद्रास येथे केलेल्या भाषणातील हा काही भाग आहे. 'भूमिका' (रोहन प्रकाशन, पुणे) या पुस्तकात ते भाषण समाविष्ट केले आहे. या आठवड्यात यशवंतरावांची १०८ वी जयंती साजरी झाली आणि गेल्या काही महिन्यांपासून भारत–चीन संबंधात असलेला तणाव, हे निमित्त साधून हा भाग येथे प्रसिद्ध करीत आहोत. – संपादक)

रामचंद्र गुहा

# मुक्त विचारांचं भय : कट्टर उजव्यांनी केलेलं कट्टर डाव्यांचं अनुकरण

डोरा रसेल या ब्रिटिश स्त्रीवादी विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञाचं आत्मकथन मी सध्या वाचतो आहे. तीन खंडांत प्रकाशित झालेल्या या आत्मकथनातला पहिला खंड मी नुकताच वाचून पूर्ण केला आहे. या खंडात प्रामुख्याने वाचायला मिळतं ते तिच्या एडवर्डिय इंग्लंडमध्ये झालेल्या जडणघडणीबद्दल. याशिवाय केंब्रिज विद्यापीठातलं तिचं शिक्षण लिंगभाव समतेबाबत उत्तरोत्तर विकसित होत गेलेले तिचे विचार, तिनं स्थापन केलेली प्रयोगशील शाळा, अतिशय विद्वान आणि तितकाच वादग्रस्त ठरलेला तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेलसोबतचं सहजीवन हे सारं या खंडांत वाचायला मिळतं.

डोरा विशीत असतानाच बोल्शेविक क्रांती झाली होती. त्यामुळेच समकालीन विचारवंतांप्रमाणेच तीसुद्धा या क्रांतीमुळे खूप प्रभावित झाली होती. या क्रांतीचा नेमका काय परिणाम झाला आहे, याचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याकरता क्रांतीनंतर अवघ्या काही काळातच ती रशियाला गेली. १९१८ –१९ ची ती वर्षे होती. त्या वेळी झपाटलेल्या बोल्शेविकांशी बोलल्यानंतर तिला ख्रिस्ती धर्मअभ्यासकांची आठवण झाली. या धर्मअभ्यासकांना, त्यांनी कल्पना केलेलं जग देव साकारेल, असं वाटत असे. ती लिहिते, ‘अशा धार्मिक युटोपियनांप्रमाणे ‘हे लोक (रशियातील) जगाच्या नियंत्याचं, या विश्वाच्या निर्मात्याचं अनुकरण करत होते. त्या निर्मात्याने जसं सगळ्या ग्रहमालेला एका गतीत नियंत्रित केलं, तसंच हे लोक नवीन समाजाची विस्तृत रुपरेषा बनवतील, ही रुपरेषा औद्योगिक कार्यप्रणालीवर आधारित असेल. अशा समाजात काम करून आपलं योगदान देण्याकरता स्त्री आणि पुरुष दोहोंनाही स्थान असेल. एकदा का हे चक्र सुरू झालं तर ही नवी विवेकी व्यवस्था तिच्या अंगभूत गतीवर सुरू राहील.’

या काळातील सोव्हिएत रशियातील लोकांशी, बोल्शेविकांशी केलेल्या संवादामुळे डोरा प्रभावित झाली,

एका गोष्टीचा उल्लेख मात्र करायलाच हवा, आपल्या देशाचा समकालीन इतिहासही हे दाखवून देतो की, कट्टर उजवे आणि कट्टर डावे यांच्या काही गुणवैशिष्ट्यांत खूप साधर्म्य आहे. अंतिम साध्य महत्त्वाचं, त्याकरता अनुसरलेले मार्ग महत्त्वाचे नाहीत, असं समर्थन डावे करतात. सत्तेत असलेल्या राजकर्त्यांनी नोकरशाही, न्यायवस्थेवर नियंत्रण ठेवावं, तसंच कुणी कोणती कादंबरी लिहावी, कोणतं गाणं गावं... कोणत्या घोषणा दिल्या जाव्यात, कोणत्या घोषणांवर बंदी असावी. या साऱ्यावर नियंत्रण ठेवण्याचं सामर्थ्य राज्यव्यवस्था आणि सत्ताधारी पक्षाकडे असावं, असंच त्यांना वाटतं. तर कट्टर उजव्यांनीही वैज्ञानिक दृष्टिकोनाकडे दुर्लक्ष केलं आहे आणि त्यांचा विश्वास असलेल्या आध्यात्मिक, अविवेकी विचारांनुसार ते काम करत आहेत.

मात्र त्यांच्या हटवादीपणामुळे काहीशी निराशही झाली. तिनं लिहून ठेवलं, 'भविष्यात होऊ घातलेल्या साम्यवादी राज्यव्यवस्थेच्या निर्मितीसाठी, या विचारांचा प्रसार करणं कितीही आवश्यक असलं तरी हे विचार मला शत्रुभावी बनायला लावतात. हे भावनिकपणे आणि कट्टरपणे केलं जातं, या प्रक्रियेत संरचनात्मक विचारांपेक्षा हेटाळणी करण्याचं आवाहन आणि एक हिंसक झपाटलेपण आहे.'

रसेलच्या रशियाभेटीनंतर दशकभरानं रवींद्रनाथ टागोर रशियाला गेले. तिथल्या दोन आठवड्यांच्या वास्तव्यात त्यांनी शाळा, कारखान्यांना भेटी दिल्या तसंच विविध स्तरांतील लोकांशी संवाद केला. रशियातून निघण्यापूर्वी त्यांनी 'इझवेस्तीया' या तिथल्या सत्ताधारी पक्षाच्या वर्तमानपत्राला मुलाखत दिली. ज्या आत्मीयतयेनं सोव्हिएतनं शिक्षणाचा प्रसार केला, त्यांचं त्यांनी कौतुक केलं. सोबतच आणखी काही चिंताजनक पुस्ती जोडल्या. 'तुम्ही तुमच्या आदर्शांचं पालन करता, ते वर्गद्वेषानं आणि संतापाच्या भावनेनं पेटून उठून करता ना? तुमचे विचार व कल्पना न मानणाऱ्या लोकांना शत्रू समजून तुम्ही हे करता ना? तुमच्या मार्गातल्या अडथळ्यांविरोधात तुम्ही लढलं पाहिजे, हे खरं आहे. आणि सभोवताली दुर्लक्ष करण्याची वृत्ती, सहअनुभूतीचा अभाव, सततची आडमुठी भूमिका या अडथळ्यांविरोधात तुम्ही लढा दिला पाहिजे. पण तुमचं हे काम तुमच्या पक्षापुरतं वा देशापुरतं सीमित राहता कामा नये. किंबहुना तुमच्या दृष्टिकोनानुसार हे अखिल मानवतेसाठीचं काम आहे, पण मानवतेमध्ये, तुमच्या ध्येयाविरोधी असलेल्या मतांना, विचारांना काहीच स्थान नसतं का?'

टागोरांच्या मते प्रगल्भ राजकीय व्यवस्थेत विरोधी विचारांना, त्याच्या मुक्त अभिव्यक्तीला स्थान असतं. मात्र राज्यव्यवस्थेअंतर्गत 'जेव्हा आपली सगळीच मतं जबरदस्तीनं दडपली जातात, ती इतरांना आवडत नाहीत, तेव्हा ते चित्र फक्त नीरसच नसतं तर ते एक अजननक्षम (ज्यातून काही नवनिर्मितीच होणार नाही असं) आणि रटाळ- यांत्रिकही होऊन जातं.' तुमच्या ध्येयात सर्वंकष मानवीयतेचा अंतर्भाव असेल तर विविध मत-मतातरांच्या अस्तित्वाचा आदर राखला जाईल. मतं, धारणा सतत बदलत असतात, ती सातत्यानं वाहणाऱ्या मुक्त बुद्धिजीवी प्रवाहांमुळे आणि बदलासाठी आवश्यक असलेल्या नैतिक बळामुळे. हिंसेने हिंसा वाढते आणि डोळ्यावर कातडी ओढून केला जाणारा मूर्खपणाही! सत्याचा स्वीकार करण्यासाठी विचारांचं स्वातंत्र्य आवश्यक आहे, मात्र भयाचं वातावरण खूप निर्दयीपणे हे सगळं मारून टाकतं.

टागोरांची ही टिपण्णी विश्वभारतीनं त्याच वर्षी प्रकाशित केलेल्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे. पी.सी.महालोनोबीस हे विख्यात शास्त्रज्ञही टागोरांसोबत त्या प्रवासाला गेले होते. या दोघांनी हे पुस्तक लिहिलं आहे. मात्र 'इझवेस्तिया'नं टागोरांची ही मुलाखत त्यांच्या वार्षिकीत छापली, हे एक आश्चर्यच आहे. कारण 'इझवेस्तिया' हे पक्षाचं मुखपत्र असल्यानं सोव्हिएत राज्यव्यवस्थेवरची टीका त्यांना छापता येणार नव्हती. साम्यवाद्यांच्या सूडबुद्धी तसेच शत्रूभावी वर्तन-व्यवहाराबाबत टागोरांनी नोंदवलेली निरीक्षणं हा अद्यापही साम्यवादी विचारसरणीबाबत कळीचा मुद्दा राहिला आहे.

आता पुन्हा डोरा रसेलकडे वळू. सोव्हिएत रशियाच्या प्रवासानंतर दोनच वर्षांनी ती चीनला गेली आणि तिथल्या कम्युनिस्ट पक्षाच्या नव्या कार्यकर्त्यांशी तिनं संवाद केला. रशियन कॉम्रेड्सपेक्षा यांच्यात वेगळं काय होतं, तर त्यांचा अधिकाधिक एककल्लीपणा नि हटवादीपणा. बीजिंगमध्ये राहणाऱ्या तिच्या एका मित्राला तिनं १९२१ मध्ये पत्र लिहिलं. या पत्रात तिनं म्हंटलं आहे, 'कम्युनिझमच्या सार्वभौमत्वासाठी पक्षाच्या बुद्धिजीवींची अनेक ध्येयं असू शकतात, पण रशिया आणि चीनमध्येही अद्याप हे सारं एखाद्या धर्मापेक्षा वेगळं नाही. एक धर्म म्हणून त्याचे अनेक फायदे असू शकतात, जसे ते राज्यव्यवस्थेत कोणत्याही धर्माला असतात. उदा., लोकांना एकत्र बांधून ठेवून, त्यांच्याकडून एकसमान सामूहिक वर्तन होत आहे, अशी भावना त्यांच्यात निर्माण करणे. पाश्चिमात्यांकडून पूर्वेला देणगी मिळतेय ती- बदलासाठी एक धर्मच बहाल करण्याच्या रुपात, हे पाहणं अचाट आहे.' याच पत्रात पुढे ती म्हणते, 'आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी बळाचा अन्याय्य वापर करणं गब्बर भांडवलशाहीवाद्यांपेक्षाही जास्त भयंकर आहे. विज्ञानाबद्दल खूप अभिमानाने बोलणाऱ्या या लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव पाहून माझं डोकं चक्रावून जातं.'

एका गोष्टीचा उल्लेख मात्र करायलाच हवा, आपल्या देशाचा समकालीन इतिहासही हे दाखवून देतो की, कट्टर उजवे आणि कट्टर डावे यांच्या काही गुणवैशिष्ट्यांत खूप साधर्म्य आहे. अंतिम साध्य महत्त्वाचं, त्याकरता

अनुसरलेले मार्ग महत्त्वाचे नाहीत, असं समर्थन डावे करतात. सत्तेत असलेल्या राजकर्त्यांनी नोकरशाही, न्यायवस्थेवर नियंत्रण ठेवावं, तसंच कुणी कोणती कादंबरी लिहावी, कोणतं गाणं गावं... कोणत्या घोषणा दिल्या जाव्यात, कोणत्या घोषणांवर बंदी असावी. या साऱ्यावर नियंत्रण ठेवण्याचं सामर्थ्य राज्यव्यवस्था आणि सत्ताधारी पक्षाकडे असावं, असंच त्यांना वाटतं. तर कट्टर उजव्यांनीही वैज्ञानिक दृष्टिकोनाकडे दुर्लक्ष केलं आहे आणि त्यांचा विश्वास असलेल्या आध्यात्मिक, अविवेकी विचारांनुसार ते काम करत आहेत.

उजव्या आणि डाव्या विचारसरणीमधल्या काही समांतर गोष्टींचा अतिशय उत्तमप्रकारे वेध घेण्याचं काम फ्रेंच इतिहासकार फ्रँकॉइस (फ्रांझ्वा) फ्युरे यानं त्यांच्या 'पासिंग ऑफ ॲन इल्युजन' या पुस्तकात केलं आहे. फ्युरे लिहितो, 'जसे समाजवादी लोक अस्तित्वात होते, तसेच राष्ट्रीय समाजवादीही अस्तित्वात होते. त्यांच्याव्यतिरिक्त वा त्या कक्षेबाहेरचा माणूस जणू सामाजिकतेविरोधीच होता. त्या लोकांमधल्या एकतेचा सतत उदो उदो केला जायचा आणि सार्वजनिकपणे ती एकता ठसवली जायची. विचारसरणीच्याही पलीकडे जाऊन पाहिलं तर हुकूमशाही वृत्तीचा एक सर्वशक्तिमान नेता हे त्याचं वैशिष्ट्य आहे. त्यामुळे लोकांवर पक्ष आणि राज्यव्यवस्थेशी सातत्यानं जोडलेलं असणं, सक्तीचं होतं. ज्या लोकांना या नेत्यांचे विचार पटत नसत आणि यांची अमर्याद एकाधिकारशाही सत्ता मान्य नसे, अशा लोकांना हे नेते शत्रूच्या गोटात लोटत असत. लेनिनसारख्या हुकूमशहासाठी असे लोक 'बूर्झ्वा' होते, तर हिटलरसाठी 'ज्यू'. सामान्य लोकांनी नेहमीच या घटकांच्या अस्तित्वाबद्दल दक्ष असावं, असं या सत्ताधीशांना वाटे आणि आपली हुकूमशाही सत्ता अबाधित राहावी, यासाठी ते त्यांच्या (बूर्झ्वा, ज्यू) अस्तित्वाचा बागुलबुवा सतत सामान्य लोकांना दाखवत असत.

फ्युरे पुढे लिहितो, फॅसिझम आणि त्याचप्रमाणे कम्युनिझमने आपलं राजकीय वर्चस्व प्रस्थापित करताना अनेक अनैतिक आणि हिंसक मार्गांचा वापर केला. 'तुमच्या नागरिकांना तुम्ही युद्धातल्या शत्रूसारखं मारू शकता, अशी लेनिन आणि हिटलरची धारणा होती. त्यासाठी या नागरिकांनी केवळ चुकीच्या वर्गातलं असणं किंवा विरोधी पक्षाचं असणं पुरेसं होतं. या हुकूमशहांनी समाजातील न्याय्य आणि शांततापूर्ण वर्तनाच्या 'औपचारिकरीत्या' केलेल्या धिक्काराचं पर्यावसान खरोखरीच अनिर्बंध सत्ता आणि लोकांच्या मनावर दहशत गाजवण्यात झालं.'

फ्युरेच्या पुस्तकात प्रामुख्यानं दोन महायुद्धांदरम्यानचा युरोप दिसतो. अर्थात त्यामुळेच लेनिन आणि हिटलरमधलं साम्यही! आशिया खंडात, भविष्यातील– युद्धोतर इतिहासकारालाही चीनमधील कम्युनिझमचा उदय आणि भारतातील एकाधिकारशाही हिंदुत्ववादी राजवट या दोहोंत अशी काही साम्यं दिसू शकतात, विशेषत: माओ आणि मोदी यांच्या लाटेतली साम्यं. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपला इथे पक्षीय राज्यव्यवस्था निर्माण करायची आहे. त्यांनी, एकच– थोर आणि कोणत्याही उणिवा नसलेल्या मोठ्या नेत्याचं नेतृत्व, असा पायंडा अतिशय विषारी पद्धतीनं पाडला आहे. विरोधी पक्ष तसंच त्यांच्या टीकाकारांना ते मोडीत काढतात आणि ठराविक काळानं, 'पंतप्रधानांची हत्या करण्याचा कट रचला जातोय,' अशी आवई उठवतात, तसा प्रोपगंडा करतात. यातली सगळ्यात चिंताजनक बाब म्हणजे चीनमध्ये हान समूहाला जसं कम्युनिस्टांनी दडपलं, तसं आता भारतात मुस्लिमांना दडपलं जात आहे.

कट्टर डाव्या आणि कट्टर उजव्यांपैकी कोणीही कधीच या सगळ्याची दखल घेत नसले तरी, या दोहोंमध्ये एक युती मात्र निश्चित असते. आता डोरा रसेलचंच हे उदाहरण पहा, 'भविष्यात साम्यवादी राज्यव्यवस्था आणण्यासाठी या विचारसरणीचा प्रसार–प्रचार करण्याची आवश्यकता असली तरी हे सगळं अतिशय भावनिकरीत्या आणि कट्टरपणे केलं जातं, ज्यामध्ये संरचनात्मक विचारांपेक्षा भवतालाची हेटाळणी करण्याचं आवाहन आणि एक हिंसक झपाटलेपण आहे. हे सारं मुक्त बुद्धिप्रामाण्य आणि त्यानुसार केल्या जाणाऱ्या कृतिकार्यक्रमांवर अंकुश ठेवणारं आहे.' वरील विधानात 'साम्यवाद' या शब्दाच्या जागेवर 'हिंदुत्ववाद' हा शब्द ठेवून बघा, मग तुम्हाला आज रा.स्व.संघ आणि भाजप भारतात काय करू पाहत आहेत, याचं एकदम चपखल आणि टोकदार चित्र दिसेल.

(अनुवाद : प्रियांका तुपे)

**रामचंद्र गुहा, बंगळुरु**

न्या. हेमंत गोखले

# बांगलादेशातील हिंदू कायद्यात सुधारणेची आवश्यकता

जगातल्या आणि भारतीय उपखंडातल्या स्त्रियाही एकविसाव्या शतकात सर्व दृष्टीने प्रगतिपथावर आहेत. बांगलादेशची राज्यघटना ही राष्ट्रवाद व लोकशाही यांबरोबरच समाजवाद आणि सर्वधर्मसमभाव ही आपली उद्दिष्टे घोषित करते. बांगलादेशमधल्या हिंदू, बौद्ध, ख्रिस्ती आणि इतर धर्मीयांनाही मुस्लिमांप्रमाणेच समान हक्क असतील, असेही त्यांची घटना जाहीर करते. या धर्मांच्या स्त्रियांनाही समतेवर आधारित कायदेशीर हक्क मिळाले पाहिजेत, त्यासाठी बांगलादेशमधील हिंदूधर्मीय कायद्यात सुधारणेची आवश्यकता आहे. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना या एक प्रगतिशील राज्यकर्त्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशच्या लोकांचा आर्थिक जीवनस्तर चांगलाच उंचावलेला आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्याच्या ५० व्या वर्षांत हिंदू-बौद्ध कायद्यात सुधारणेची पावले उचलली जातील, अशी आपण अपेक्षा करू या.

बांगलादेशला जाण्याआधी प्रा.डॉ. मेघना गुहा-ठाकुरता आणि त्यांच्या Research Initiatives Bangladesh (R.I.B.) या संस्थेच्या संशोधन आणि सामाजिक कार्याबद्दल ऐकले होते. भारतातल्या 'हिंदू' ह्या वर्तमानपत्राचे माजी संपादक आणि माझे मित्र श्री.एन.राम ह्यांनी ढाक्यातल्या त्यांच्या वार्ताहराचा- अरुण देवनाथ यांचा दूरध्वनी क्रमांक दिला होता. त्यांच्यामार्फत प्रा.मेघनाजी यांच्याशी संपर्क साधला आणि Spring Law School चे शिबिर संपल्यानंतर त्यांना भेटायला गेलो.

ढाक्याच्या बनानी ह्या मध्यवर्ती भागात त्यांच्या संस्थेचे कार्यालय आहे. डॉ.शमशुल बारी हे त्यांच्या संस्थेचे अध्यक्ष आणि डॉ. हमिदा हुसेन ह्या त्यांच्या सल्लागारांपैकी एक आहेत. त्यांच्या संस्थेतच हमिदाजींची आणि आमची भेट झाली होती. प्रा.मेघनाजी ह्या ढाका विद्यापीठात 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयाच्या प्राध्यापिका होत्या. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी ही संशोधन संस्था स्थापन केली आहे. मेघनाजी ह्या संस्थेच्या कार्यकारी संचालक आहेत. त्यांनी समाजकार्याचा आणि पुरोगामी विचारांचा वारसा आपले वडील प्रा.डॉ. ज्योतिर्मय गुहा-ठाकुरता यांच्याकडून घेतला आहे. प्रा. ज्योतिर्मय ांना लंडनच्या 'किंग्ज कॉलेज'मधून डॉक्टरेट मिळाली आणि ढाका विद्यापीठात ते इंग्रजीचे विभागप्रमुख होते. बांगलादेशच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात, दि. ३० मार्च १९७१ रोजी ते पाकिस्तानी सैन्याकडून मारले गेले. ढाका विद्यापीठाच्या प्रांगणात त्यांच्या स्मरणार्थ स्मृतिस्थळ उभारण्यात आले आहे.

मेघनाजींच्या संस्थेने बांगलादेशातील स्त्रियांच्या हक्कांसंबंधी मोठे काम केल्याचे ऐकले होते. त्यामुळे त्याविषयीची वस्तुस्थिती त्यांच्याकडून जाणून घेण्याची इच्छा होती.

बांगलादेशमधील मुस्लिमांचा कौटुंबिक संबंध कायदा

पुष्कळच सुधारलेला आहे. तेव्हाचे पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष जनरल अयुबखान यांनी १९६१ मध्ये सुधारित मुस्लिम कौटुंबिक कायदा अमलात आणला. त्या वेळेस बांगलादेश हा पाकिस्तानचा भाग असल्यामुळे तिथेही हा कायदा अमलात आला आणि आजमितीसही अंमलात आहे. मुस्लिम विवाहाची नोंदणी करणे, हे त्या कायद्यानुसार आवश्यक आहे. एखाद्या पुरुषाला दुसरा विवाह करायचा असेल तर तो सहजासहजी करता येत नाही. त्याला पहिल्या पत्नीची परवानगी किंवा तिचा विरोध असेल तर Arbitration Council पुढे जावे लागते. त्या Council ला पोटगीची रक्कम ठरविण्याचाही अधिकार आहेत.

हिंदू धर्मीयांसाठी मात्र जुना दायभाग पद्धतीचा हिंदू कायदाच लागू आहे, त्यात कुठलीच सुधारणा झालेली नाही. बांगलादेशच्या लोकसंख्येच्या १० टक्क्यांच्या आसपास म्हणजे साडेसोळा कोटींच्या देशात जवळपास दीड कोटी लोक हे हिंदू आणि बौद्ध आहेत, अर्थातच त्यातल्या अर्ध्या म्हणजे ७५ लाख स्त्रिया आहेत. शेख हसीना यांच्या सरकारने अल्पसंख्याकांना मोठ्या प्रमाणात सुरक्षितता मिळवून दिली आहे, परंतु इथल्या पारंपरिक हिंदू कायद्यात काहीही सुधारणा न झाल्याने हिंदू स्त्रियांना आणि विशेषतः दलित व गरीब वर्गातल्या स्त्रियांना कौटुंबिक बाबींमध्ये जवळजवळ संरक्षण नसल्यासारखी परिस्थिती आहे.

हिंदू धर्मीयांचे लग्न पारंपरिक पद्धतीने होते; पण त्याची नोंदणी होत नाही, त्यामुळे नवऱ्याने लग्न झाल्याचे नाकारले तर पत्नीला लग्नाचा पुरावा देता येत नाही. नवऱ्याने बायकोला टाकून दिले, तर तिला पोटगी मागण्याचा हक्क नाही. बायकोला टाकून नवरा पुनर्विवाह करू शकतो, पण स्त्रीला तो हक्क नाही. पुरुषाला अनेक विवाह करण्यापासून थांबवणारा असा कायदेशीर प्रतिबंध तिथे नाही. त्या कायद्यानुसार फक्त पुरुषालाच घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे आणि तोही पत्नीचे चारित्र्य/पावित्र्य (Chastity) ह्या एकाच कारणावरून. पत्नीला मात्र हा अधिकार नाही. स्त्रियांना कौटुंबिक आणि वारशाने मिळणाऱ्या संपत्तीमध्ये फारच मर्यादित अधिकार आहेत. स्त्रियांना वेगवेगळ्या प्रकारच्या कौटुंबिक हिंसेला तोंड द्यावे लागते, पण

प्रा. मेघनाजी, हमिदाजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर न्या. गोखले व श्री. अन्वर राजन



त्यासंबंधी दाद मागणे कठीण असते.

हिंदू स्त्रियांची ही परिस्थिती आणि हिंदू कायद्यातील सुधारणेची आवश्यकता ह्या विषयांवर मेघनाजींची RIB ही संस्था आणि 'मानुशेर जोंनो फाउंडेशन' (जनहितार्थ संस्था) ह्या दोन संस्थांतर्फे सप्टेंबर १९७२ मध्ये एक सर्वेक्षण करण्यात आले. प्रा. मेघनाजी आणि डॉ. कुर्बान अली हे त्या अभ्यासाचे संशोधन सल्लागार, श्रीमती. सिप्रा गोस्वामी ह्या कायदेविषयक सल्लागार आणि महम्मद सैदूर रेहमान हे प्रकल्प समन्वयक (Project Coordinator) होते. त्या सर्वेक्षणासाठी आधी एक प्रदीर्घ प्रश्नमालिका बनवून ९३६ व्यक्तींकडून त्यावर उत्तरे मागवण्यात आली. सर्वेक्षण केलेल्या ९३६ व्यक्तींपैकी ७५६ म्हणजे ८०.०८ टक्के ह्या स्त्रिया होत्या. आपल्याला कौटुंबिक हिंसाचाराला तोंड द्यावे लागत असल्याचे ५२.०७ टक्के महिलांनी सांगितले. लग्नाची नोंदणी आवश्यक असल्याचे ९१.०३ टक्के व्यक्तींनी सांगितले, त्यात ७४.०५ टक्के स्त्रिया होत्या. २९ टक्के स्त्रियांना घटस्फोटाचा, २६ टक्के स्त्रियांना कायदेशीर रीत्या वेगळे राहण्याचा (Judicial Separation) आणि २६ टक्के स्त्रियांना स्वतंत्र राहण्याचा– म्हणजेच सगळ्या मिळून ८१ टक्क्यांहून अधिक स्त्रियांना आवश्यकता निर्माण झाल्यास कायद्याने वेगळे होण्याचा हक्क हवा होता. ७०.०४ टक्के व्यक्ती हिंदू कायद्यातील स्त्रियांच्या संपत्तीसंबंधीच्या अधिकाराबाबत असमाधानी होत्या. ह्या सर्व पाहणीमुळे हिंदू विवाहाच्या नोंदणीची कायदेशीर व्यवस्था नसणे, हुंड्याच्या प्रथेवर बंदी नसणे, घटस्फोट-पोटगी व वारसा हक्कासंबंधीचा कायदा नसणे, कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षणाचा कायदा नसणे, यामुळे हिंदू स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांची परिस्थिती अधिकच अधोरेखित झाली.

जानेवारी २०१७ मध्ये RIB तर्फे समाजातल्या दुर्बल आणि उपेक्षित (Marginalised) घटकांची पाहणी करण्यात आली. त्यात उत्तर प्रदेशातून अनेक वर्षांपूर्वी आलेले आणि संत रविदास ह्यांना मानणारे रोबिदास, जेसोर जिल्ह्यातले कावरा किंवा कायपुत्र आणि कानपूर व आंध्र प्रदेशातून आलेले हरिजन दलित समाज यांचा समावेश होता. रोबिदास हे चर्मकाम करणारे, कावरा हे डुकरे पाळणारे आणि हरिजन हे नगरपालिका, बंदरे व मंड्यांमधील सफाईचे काम करणारे समाज आहेत. हे सर्वच समाज अतिशय गरीब आणि अशिक्षित आहेत.

दुर्बल घटकांच्या ह्या पाहणीत रंगपूर व राजेशाही जिल्ह्यांमध्ये बाहेरून आलेले संथाल आणि सुंदरबन भागातले मुंडा हे आदिवासी समाजही आले. ते शेकडो वर्षांपूर्वी भारतातून इथे आले आहेत. त्याखेरीज मासे पकडणारे आणि त्यासाठी जाळी बनवणारे बागडी समाजातले स्थानिक लोक आहेत. हे बहुतेक सगळे हिंदू अशिक्षितही आहेत. त्यांच्या स्त्रियांची परिस्थिती अधिकच वाईट आहे. त्यांना कुठल्याच प्रकारचे अधिकार व कायद्याचे संरक्षण नाही.

दलित, आदिवासी आणि मागासवर्गीय अशा ह्या सर्व समाजांना उपेक्षित व विषमतापूर्ण आणि कायद्याचे कुठलेही संरक्षण नसलेले जीवन जगावे लागत आहे.

हिंदू कायद्यात सुधारणेची आवश्यकता आणि दुर्बल घटकांची पाहणी हे दोन्ही अहवाल मेघनाजींनी मला सादर केले. ह्या विषयावर मला लिहायला आवडेल आणि त्यासाठी तुमच्या अभ्यासाची मला मदत होईल, असे सांगितल्यावर मेघनाजींनी तसे करण्यासाठी मला मोकळ्या मनाने परवानगी दिली.

हिंदू धर्मीयांमध्ये अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना मिळणारी वागणूक हा एक स्वतंत्र प्रश्न आहे. मातुआ हा त्यातलाच एक नामशूद्र समजलेला समाज आहे. आम्ही ज्यांना भेटलो, त्या सामाजिक कार्यकर्त्या शिरीन हक् स्पष्टपणे म्हणाल्या की, हिंदू समाजामध्ये अस्पृश्यता ही अदृश्य स्वरूपामध्ये चालूच आहे. बांगलादेशच्या राज्यघटनेच्या कलम १९(२) मध्ये माणसामाणसांमधली सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणे हे सरकारचे उद्दिष्ट असल्याचे जाहीर केले आहे आणि तरीही हिंदू समाजातले कित्येक उच्चभ्रू भद्रलोक दलितांना हीन दर्जाची वागणूक देतात. सरकारनेही त्याबाबत आवश्यक ती पावले उचललेली नाहीत, यावर त्यांनी भर दिला.

मधल्या काळात भारतामध्ये हिंदू धर्मीयांच्या कायद्यात मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आलेली आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १७ अन्वये कुठल्याही प्रकारची अस्पृश्यता पाळणे ह्यावर बंदी घालण्यात आलेली आहे आणि तो गुन्हा ठरविण्यात आला आहे. भारताच्या संसदेने हिंदू कायद्यात सुधारणा करणाऱ्या 'हिंदू कोड बिलाचा' विचार पुढे ढकलल्याने राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.आंबेडकर यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता आणि त्यानंतर १९५५-५६ मध्ये पारंपरिक हिंदू कायद्यात बदल

करणारे कायदे हे संसदेने मंजूर केले. हे कायदे हिंदू, बौद्ध, जैन, शीख, आदिवासी ह्या सर्वांना लागू आहेत. त्यानुसार विवाहाची नोंदणी आवश्यक झाली आणि बहुपत्नीकत्वाची प्रथा कायद्याने बंद करण्यात आली. हिंदू स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान कारणांसाठी घटस्फोटाचा अधिकार मिळाला. (उदा.निष्ठूर वागणूक, विवाहबाह्य संबंध) त्यांना पोटगीचा अधिकार, तर मुलींना संपत्ती आणि वारश्यामध्ये हिश्श्याचा हक्क मिळाला. भारतातल्या मुस्लिम धर्मीयांच्या कौटुंबिक कायद्यामध्येही कालांतराने थोडीफार का होईना, पण सुधारणा करण्यात आली. महाराष्ट्रातले मुस्लिम समाजसुधारक हमीद दलवाई यांनी मुस्लिमधर्मीय कायद्यात सुधारणेच्या मागणीसाठी ८ एप्रिल १९६६ रोजी सात महिलांचा मोर्चा काढला होता. ही मागणी पुढे जात-जात आधी सुप्रीम कोर्टाने आणि नंतर संसदेनेही २०१९ च्या कायद्याने तिहेरी तलाकची पद्धत बेकायदा ठरवली.

आता २०१७ मध्ये नवाझ शरीफ पाकिस्तानचे पंतप्रधान असताना तिथेही सुधारित हिंदू विवाह कायदा करण्यात आला आहे. त्या कायद्याप्रमाणे लग्नाची नोंदणी करणे, घटस्फोट आणि पोटगी आदी बाबींसाठी सुधारित नियम करण्यात आले आहेत.

आज अनेकांना हे माहीत नाही की, डॉ.आंबेडकर हे भारताच्या घटना परिषदेमध्ये तेव्हाच्या पूर्व बंगालमधील (आत्ताच्या बांगलादेशमधील) जेसोर व खुलना या मतदार-संघातून तेथील मागासवर्गीयांचे नेते जोगेंद्रनाथ मंडल यांच्या मदतीने निवडून आले होते. डॉ.आंबेडकर यांच्या आग्रहामुळे आणि त्यांच्या राजीनाम्यानंतर पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी १९५५-५६ मध्ये हिंदू कायद्यात सुधारणा करणारे कायदे भारतीय संसदेमध्ये मंजूर करून घेतले. त्या कायद्यांचा लाभ भारतामधील हिंदू स्त्रियांना मिळाला. परंतु पूर्व बंगाल हा पाकिस्तानात गेल्याने तिथल्या हिंदू स्त्रियांना मात्र ह्या कायद्याचा लाभ मिळाला नाही. हिंदू कायद्यामध्ये आता पाकिस्तानातही मर्यादित का होईना, पण सुधारणा करण्यात आल्या आहेत; परंतु बांगलादेशामध्ये त्या झालेल्या नाहीत.

हिंदू विवाहाची नोंदणी आवश्यक करणारा, हुंड्यावर बंदी घालणारा, द्विभार्या प्रतिबंधक, पती-पत्नींसाठी घटस्फोटाची सामान व्यवस्था असणारा व पोटगीचा अधिकार देणारा, स्त्रियांना संपत्ती व वारसा यांचा हक्क देणारा असा हिंदू विवाह कायदा बांगलादेशमध्ये होणे आवश्यक आहे. तसेच कौटुंबिक हिंसेला आळा घालणारी योग्य ती कलमे असलेल्या आणि सर्व धर्मीयांना लागू असलेल्या कौटुंबिक हिंसाप्रतिबंधक कायद्याचीही आवश्यकता आहे. बांगलादेशच्या चितगाव हिल ट्रॅक ह्या जिल्ह्यातले चकमा आदिवासी हे बौद्धधर्मीय आहेत. त्यांची धार्मिक परंपरा आणि स्त्रियांविषयीची विषमता मोठ्या प्रमाणात हिंदू धर्मीयांप्रमाणेच आहे. त्यांना आणि इतर आदिवासींना भारताप्रमाणे हिंदू कायद्यातल्या सुधारणांमध्ये समाविष्ट करून घेणे आवश्यक आहे. प्रा.मेघनाजी आणि शिरीन हक़ यांच्यासारख्या व्यक्ती, R.I.B. आणि मानुशेर जोनो फाऊंडेशन यांसारख्या संस्था ह्या दृष्टीने प्रयत्न करत आहेत.

जगातल्या आणि भारतीय उपखंडातल्या स्त्रियाही एकविसाव्या शतकात सर्व दृष्टीने प्रगतिपथावर आहेत. बांगलादेशची राज्यघटना ही राष्ट्रवाद व लोकशाही यांबरोबरच समाजवाद आणि सर्वधर्मसमभाव ही आपली उद्दिष्टे घोषित करते. बांगलादेशमधल्या हिंदू, बौद्ध, ख्रिस्ती आणि इतर धर्मीयांनाही मुस्लिमांप्रमाणेच समान हक्क असतील असेही त्यांची घटना जाहीर करते. या धर्मांच्या स्त्रियांनाही समतेवर आधारित कायदेशीर हक्क मिळाले पाहिजेत. त्यासाठी बांगलादेशमधील हिंदूधर्मीय कायद्यात सुधारणेची आवश्यकता आहे. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना या एक प्रगतिशील राज्यकर्त्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशच्या लोकांचा आर्थिक जीवनस्तर चांगलाच उंचावलेला आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्याच्या ५० व्या वर्षांत हिंदू-बौद्ध कायद्यात सुधारणेची पावले उचलली जातील, अशी आपण अपेक्षा करू या.

**न्या. हेमंत गोखले,** मुंबई
gokhalehemantlaxman@gmail.com
Mob. 9769305849
(लेखक, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती या पदावरून २०१४ मध्ये निवृत्त झाले आहेत.)

---

## पुढील अंकात

**'सोनार बांगला'** या लेखमालेचा दहावा व अखेरचा भाग प्रसिद्ध होईल.

**- संपादक**

दरशथ पारेकर

# सदा डुम्बरे : ‘कोल्हापूर सकाळ’पासून पाहिलेले

सदा डुम्बरे यांच्या मृत्यूचं वृत्त अत्यंत धक्कादायक होतं आणि अंतिम प्रवास तर खूपच वेदनादायी ठरला. नाशिकला क्रिडाईच्या एका सार्वजनिक कार्यक्रमासाठी ते गेले होते. नगररचना विषयावरचं त्यांचं तिथलं भाषणही खूपच चांगलं झालं होतं. त्यासंदर्भात ते अतिशय उत्साहानं बोलले होते. पण, नंतर चारच दिवसांनी त्यांना इस्पितळात दाखल करण्यात आल्याचं समजलं आणि तिथंच त्यांनी अंतिम श्वास घेतला. पत्रकारितेतील एका व्यासंगी व संपन्न व्यक्तिमत्वाचा कोरोना विषाणूनं बळी घेतला. ‘साहेब’, ‘मित्र’ आणि ‘कौटुंबिक स्नेही’ म्हणून मला त्यांच्याबरोबर चार दशकांचा काळ व्यतित करता आला. या प्रदीर्घ सहवासातील त्यांच्या संबंधीच्या असंख्य आठवणी. अविस्मरणीय अशा सदासर्वदा. त्या ताज्या व टवटवीतच राहतील. मन:पटलावर कोरलेल्या त्यांच्या सदाबहार, प्रसन्न व्यक्तिमत्वाप्रमाणे...

‘सकाळ’ पुणेची कोल्हापूर आवृत्ती १ ऑगस्ट १९८० ला सुरू झाली. तत्पूर्वी साधारण पंधरवडाभर आधी सदा डुम्बरे संपादक म्हणून रूजू झाले. आवृत्तीची चर्चा सुरू झाल्यापासून संपादक म्हणून कोण येणार, याविषयी वेगवेगळी नावं चर्चेत होती. डुम्बरेचं नाव अनपेक्षितपणे पुढं आलं. कारण सकाळमध्ये त्यावेळी अनेक ज्येष्ठ पत्रकार होते. डुम्बरे त्यामानानं अनुभवानं कमी होते. खुद्द त्यांनाही ते कोल्हापूर आवृत्तीचे संपादक म्हणून निवडले जातील, असं वाटलं नव्हतं. आणि त्यावेळी तरी पुणं सोडण्याच्या मन:स्थितीत नव्हते. पुणे जिल्ह्यात ते वाढलेले आणि पुण्यातच शिकलेले होते. पुण्याचं सांस्कृतिक, शैक्षणिक पर्यावरण त्यांना आवडत असे. साहजिकच पुणं सोडून कोल्हापूरसारख्या आडबाजूच्या शहरात यायला ते फारसे उत्सुक नव्हते. पण, बहुधा संपादक श्री. ग. मुणगेकर यांच्या शब्दांखातर ते यायला तयार झाले असावेत. कोल्हापुरात आल्यानंतरही त्यांची पुण्याची ओढ यत्किंचितही कमी झालेली नव्हती. दर महिन्याला ते एक दोन दिवसांसाठी पुण्याला जात असत. पुण्यात विविध क्षेत्रात चालणाऱ्या घडामोडींच्या तुलनेत कोल्हापुरात फार मोठ्या प्रमाणावर असं काही घडत नसे. एकंदर अवकाश खूपच कमी. पुण्यात त्यांचा विविध संस्थांशी, त्यांच्या उपक्रमांशी निकट संबंध होता. मित्रपरिवारही मोठा होता. या पार्श्वभूमीवर कोल्हापुरात त्यांना पोकळी जाणवणं साहजिक होतं. त्यांचा स्वभावही काहीसा ‘रिझर्व्ह’ असा. अघळपणा वा कुठंही सहज मिसळण्याची त्यांची वृत्ती नव्हती. ते मितभाषी आणि गंभीर प्रकृतीचे. निवडक मित्रमंडळीत, विद्वज्जनांत वावरण्यात त्यांना आनंद वाटत असे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना भेटण्यात, चर्चा करण्यात त्यांना अधिक रस असे. थोडक्यात, पुण्यातील त्यांच्या जडणघडणीला आणि वेगळ्या अभिरूचीला कोल्हापूरचं वातावरण फारसं मानवणारं नव्हतं. त्यामुळं कोल्हापुरात दीर्घकाळा वास्तव्य

करण्याचा विचार त्यांनी सुरूवातीपासूनच केलेला नसावा. झालंही तसंच. वर्षभरातच त्यांना पुण्याला परतण्याचे वेध लागले. आणि सकाळ (कोल्हापूर)चा पहिला वर्धापनदिन झाल्यानंतर ते पुण्याला परत गेले.

सन १९८०-८१ मधील कोल्हापुरातील त्यांची 'सकाळ'मधील कारकीर्द उण्यापुऱ्या एकच वर्षाची. कोल्हापुरात ते तसे नवखे होते आणि त्यांना ओळखणारेही फारच कमी लोक होते. पुण्यातील बहुसंख्य लोकांच्या मनात कोल्हापूरविषयी काही पूर्वग्रह आणि बरेच समज, गैरसमज असतात. डुम्बरेंच्या मनातही तसे ते असावेत. पण, एक वर्षाच्या इथल्या वास्तव्यात या शहराविषयी आणि परिसरातील माणसांविषयी त्यांनी खूप काही जाणून घेण्याचा प्रयत्न केला. साहजिकच त्यांची आधीची मतं बऱ्याचअंशी बदलली असणार. त्यामुळंच कोल्हापूर-सांगलीला आलो की मला माहेरी आल्यासारखं वाटतं, असं ते नंतर म्हणत असत. २२ जानेवारी २०१९ ला पुणे येथील पत्रकार भवनात त्यांच्या सत्तरीच्या निमित्तानं झालेल्या सत्काराला उत्तर देताना केलेल्या भाषणातही ते म्हणाले होते, 'मी पुणेकर असलो तरी सांगली व कोल्हापूर मला खूप आवडतं. कोल्हापुरात मला राहायला जागा मिळाली. ती वि.स. खांडेकरांच्या बंगल्यात. खूप मित्र मिळाले. गो.मा. पवारांपासून प्रा. चंद्रशेखर जहागीरदार यांच्यापर्यंत आणि म. द. हातकणंगलेकर व मालतीबाई किर्लोस्कर यांच्यापर्यंत अनेकांशी स्नेह जुळला. या दोन्ही शहरांनी मला खूप प्रेम, जिव्हाळा आणि आपलेपणा दिला. माहेरी जावं तसं दरवर्षी सातारा, सांगली, कऱ्हाड आणि कोल्हापूरला मी जात राहिलो. विठ्ठलाचे भक्त दरवर्षी पंढरपूरची वारी करतात,.मी या शहरांची करतो. त्याच भक्तिभावाने.' पण, हे त्यांचं नंतरचं मत होतं. तसा दक्षिण महाराष्ट्राचा सारा प्रदेश त्यांना वाचून, ऐकून माहीत होता. प्रसंगपरत्वे केलेल्या दौऱ्यांमुळे तो परिचीतही होता, पण, विविधांगाने तो समजून घेण्याचा, त्याच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न मात्र त्यांनी कोल्हापुरातील वास्तव्याच्या काळात केला. वसंतदादा पाटील यांच्यापासून ते श्रीपराव बोंद्रे, त्र्यं. सी. कारखानीस, सदाशिवराव मंडलिक यांच्यापर्यंत अनेक राजकीय नेते; माधवराव बागल, पी. बी. साळुंखे, एन. डी. पाटील, शांताराम गरूड, गोविंदराव पानसरे, पी. बी. पाटील यांच्यासारखे विचारवंत; व्ही. टी. पाटील, डी. वाय. पाटील, तात्यासाहेब कोरे, आप्पासाहेब उर्फ सा.रे. पाटील, बापूसाहेब पाटील अशा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील विविध नेत्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या कार्याविषयी माहिती घेण्याचा, त्यांची भूमिका समजून घेण्याचा डुम्बरेंनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला.

**प्रायोगिकतेचं आकर्षण**

वेगवेगळ्या क्षेत्रांत ज्यांनी प्रचंड काम उभं केलं आणि जनसामान्यांत महत्त्वाचं स्थान निर्माण केलं, त्यांना सर्वांगानं जाणून घेण्यात त्यांना मोठा रस होता. ज्यांच्याविषयी ऐकून वा वाचून माहिती असते, त्याहून खूप काही त्यांच्याशी भेटून-बोलून समजून घेता येतं, असं ते म्हणत. त्यामुळं अशा लोकांना भेटायला ते स्वत:हून जात असत. संपादकाने अशा बाबतील 'स्टेटस'चा विचार न करता 'फिल्ड'वर जाणं आवश्यक आहे, असं त्यांचं मत होतं. समाजात वेगवेगळ्या क्षेत्रांत चाललेल्या नवनव्या प्रयोगाविषयीही त्यांना औत्सुक्य असे. त्यामुळंच श्रीपाद दाभोलकरांनी घराच्या गच्चीवर केलेले शेतीचे प्रयोग असोत, आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील यांनी केलेली पॉली हाउसमध्ये केलेली गुलाबाची लागवड असो, किंवा तासगावच्या माळावर बहरलेली द्राक्ष बागायती असोत- प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन पाहण्याला ते अग्रक्रम देत असत. प्राचार्य लीलाताई पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या प्रयोगाविषयी तर त्यांना खूपच आत्मीयता होती. सृजनानंद शिक्षण केंद्राची संकल्पना प्रत्यक्ष येण्याच्या कितीतरी आधीपासून- म्हणजे लीलाताई बीएड् कॉलेजच्या प्राचार्य होत्या तेव्हापासून- डुम्बरे त्यांच्या नियोजित प्रयोगाच्या योजनेत सहभागी होते. (नंतरच्या काळातही ते त्यांना त्यांच्या प्रयोगात, लेखनात आणि पुस्तक प्रकाशनात सहकार्य करीत राहिले.) कोल्हापुरात असताना लीलाताई व बापूसाहेब पाटील यांचं निवासस्थान हे जणू त्यांचं हक्काचंच घर होतं. सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर हेही आणखी एक निकटचे मित्र. त्यांच्यामुळं त्यांचे बंधू प्रा. रमेश शिपूरकर आणि प्रा. सुभाष जोशी यांच्याशीही त्यांचा चांगला स्नेह जुळलेला होता. ही सारी मंडळी सामाजिक क्षेत्रांत, परिवर्तनाच्या चळवळीत काम करणारी आणि समविचारी म्हणूनही त्यांना जवळची वाटायची. त्यांच्यामुळं सीमाभागातही त्यांचा अनेकांशी संबंध आला, देवदासी प्रश्नापासून तंबाखू उत्पादकांच्या समस्यांपर्यंत अनेक गोष्टी त्यांना समजून घेता आल्या. कोल्हापूरचे प्रख्यात वास्तूशिल्पी शिरीष बेरी हेही डुम्बरेंचे आणखी एक खास मित्र. वास्तूरचना, पर्यावरण, नगररचना हे त्यांच्या विशेष

आवडीचे विषय. बेरींशी त्यांची या विषयानुषंगाने वारंवार चर्चा होत असे. वास्तूरचनेच्या बाबतीत बेरींनी ठिकठिकाणी केलेले प्रयोग पाहण्यातही त्यांना रस होता. त्यामुळं या भागातील त्यांच्या कितीतरी प्रकल्पांना त्यांनी भेटी दिल्या. (नंतरदेखील जेव्हा जेव्हा कोल्हापुरात येत, तेव्हा बेरींशी त्यांची भेट ठरलेली असे.) कोल्हापुरात असताना अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तींशी, तसेच बाहेरून काही कार्यक्रमांच्या निमित्ताने येणाऱ्या साहित्यिक कलावंत, कलाकार आदींशी भेटी घडवून आणण्याचे काम त्यावेळी 'सकाळ'मध्ये ग्रंथपाल म्हणून काम करणारे राम देशपांडे मोठ्या उत्साहाने करीत असत.

शिवाजी विद्यापीठ हे डुम्बरेंचं आणखी एक भेटीगाठीचं ठिकाण. ज्ञानाशी संबंधित सर्वच क्षेत्रांविषयी त्यांना आकर्षण आणि आस्था वाटत असे. ते स्वत: विज्ञान शाखेचे विद्यार्थी होते. पर्यावरण आणि वनस्पतीशास्त्र हे त्यांच्या विशेष आवडीचे विषय होते. विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जोशी यांच्याशी त्यांचा दृढ परिचय होता. त्यांना ते अधूनमधून भेटत असत. पत्रकारिता आणि साहित्य हे तर त्यांच्या व्यासंग व अभ्यासाचे विषय. साहजिकच त्या विद्याशाखांशी त्यांचा नेहमीच संबंध येत असे. त्यावेळी इंग्रजी अधिविभाग प्रमुखपदी कार्यरत असलेले प्रसिद्ध कन्नड साहित्यिक डॉ. शांतीनाथ तथा एस. के. देसाई व त्यांचे सहकारी डॉ. चंद्रशेखर जहागीरदार आणि मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. गो. मा. पवार यांच्याशी त्यांचे व्यक्तिगत आणि कौटुंबिक पातळीवर स्नेहबंध जुळलेले होते. त्या विभागात व्याख्यानासाठी येणाऱ्यांत राज्यातील आणि देशातील अन्य ठिकाणच्याही अनेक नामवंत व्यक्तींचा समावेश असे. त्यांच्याशी अनौपचारिक गप्पांचा कार्यक्रम काहीवेळा आयोजित केला जात असे. अशावेळी प्रमुख निमंत्रितांत डुम्बरेंचा आवर्जून समावेश होत असे. डॉ. भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. राम बापट, डॉ. यू. आर. अनंतमूर्ती अशा अनेकांशी त्यांनी मुक्तपणे गप्पागोष्टी केल्याचे आठवते. कितीतरी नामवंत साहित्यिक पत्रकार, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते तेव्हा 'सकाळ' कार्यालयास आवर्जून भेट देत असत. डुम्बरे यांचा त्यांच्याशी असणारा व्यक्तिगत स्नेह हेही त्यामागचे एक प्रमुख कारण असे.

**वादळी पार्श्वभूमीवर प्रारंभ**

डुम्बरेंचे कोल्हापुरातील आगमन एका वेगळ्याच पार्श्वभूमीवर झाले होते. त्यावेळी 'सकाळ'ची आवृत्ती कोल्हापुरातून सुरू करण्यास काही स्थानिक घटकांनी विरोध केला होता. मोठ्या वृत्तपत्र समूहाचे 'आक्रमण' स्थानिक वृत्तपत्राच्या दृष्टीने मारक व हानीकारक ठरेल, असे काही लोकांना वाटत होते. स्थानिक अस्मितेला ते बाधक ठरेल, अशीही त्यांची भावना होती. या भूमिकेतून 'पुणेरी' वृत्तपत्राला सुरूवातीला खूपच विरोध झाला. तथापि पुढे तो टिकला नाही. एकदाचे वृत्तपत्र सुरू झाले. पण, त्या लहानशा वादळी घटनेमुळे वृत्तपत्र व्यवसाय चर्चेत आला. एरवी कोल्हापूरच्या वृत्तपत्र क्षेत्रात तशी नीरव शांतता असायची. तीनचार स्थानिक वृत्तपत्रे निघत आणि पुण्या-मुंबईची काही वृत्तपत्रे टॅक्सीने येत. त्यांचा खपही जेमतेमच असे. व्यापक चर्चा व्हावी, असे या क्षेत्रात फारसे काही घडत नसे. खपाची स्पर्धा वगैरे तर लांबचीच गोष्ट होती. पण, सकाळच्या आगमनामुळे माहोल बदलला. स्थानिक पातळीवर वृत्तपत्र स्पर्धा सुरू झाली. एकंदर वृत्तपत्र व्यवसायातच चैतन्य निर्माण झाले. साहजिकच वृत्तपत्रातील कर्मचाऱ्यांना महत्त्व प्राप्त झाले. त्यातही पत्रकारांचा भाव चांगलाच वधारला. कुशल व अनुभवी मनुष्यबळाची किंमत वाढली. माणसांची 'पळवापळवी' सुरू झाली. गुणवत्ताधारक कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने 'सकाळ' हे एक आकर्षण बनलं. संपादकीय विभाग महत्त्वाचा असल्यामुळं 'सकाळ'मध्ये कोणाची निवड होणार, हा औत्सुक्याचा विषय बनला. संपादकीय विभागाचं नेतृत्व करण्यासाठी डुम्बरेंची निवड झाल्यामुळं अन्य कुणी बुजुर्ग पत्रकार येतील, या अंदाजाला मात्र छेद गेला. एक-दोन अपवाद वगळता संपादकीय विभागात बहुअंशी सर्व तरुणांचीच निवड झाली. 'पत्रकार हे अनुभवातूनच तयार होत असतात', यावर त्यावेळी तरी बहुतेकांचं एकमत असे. वृत्तपत्र विद्या शिकून आलेले तरूण पत्रकार फारसे उपयोगाचे नसतात, असे तत्कालीन बहुअंशी संपादकांना वाटत असे. डुम्बरेंची भूमिका मात्र वेगळी होती. ते स्वत:लाही 'रानडे स्कूल'चे आणि नंतर 'सकाळ स्कूल'चे विद्यार्थी समजत असत. त्यामुळं पत्रकार हा विद्यार्थी असला पाहिजे आणि विद्यार्थी होण्याची तयारी तरूणच अधिक प्रमाणात दाखवू शकतो, असं ते म्हणत. साहजिकच नव्या दमाच्या उत्साही तरुणांनी पत्रकारितेत आलं पाहिजे, यावर त्यांचा भर असे. 'सकाळ'मधील बऱ्याच सहकाऱ्यांची निवड त्यांनी त्या दृष्टिकोनातूनच केली असावी. संपादकीय विभागात प्रशिक्षणार्थी पत्रकारांचाच भरणा अधिक होता. बहुतेक

सर्वांना ते एकेरी नावानेच संबोधत असत. दिवसभर कार्यालयात असताना ते कुणा ना कुणाला केबिनमध्ये बोलावून त्याच्याशी संवाद साधत असत. संपादकीय विभागातील प्रत्येक व्यक्ती आणि त्याचं काम ते समजून घेत. रोजच्या कामात चुका झाल्या असतील, तर समजावून सांगत.

'सकाळ'ची साप्ताहिक बैठक सर्व संपादकीय सहकाऱ्यांना सक्तीची असे. या बैठकीस रात्रपाळीचा संपादक आणि शहरातील सर्व बातमीदारही उपस्थित असत. गत सप्ताहातील बऱ्यावाईट कामाची सविस्तर चर्चा या बैठकीत होत असे. चुकलेल्या महत्त्वाच्या बातम्यांची शहानिशा तर होत असेच. पण प्रसिद्ध झालेल्या मजकुराचेही विश्लेषण् केले जात असे. चुकीचे मथळे, वापरलेले अयोग्य शब्द, सदोष वाक्यरचना, व्याकरणाच्या चुका, बातम्यांतील त्रुटी, त्यांचा अपुरेपणा वा अनावश्यक विस्तार, व्यक्तींच्या नावातील, त्यांना लावलेल्या पदनामातील चुका, छायाचित्रांचा अभाव किंवा वापरातील दोष वगैरे असंख्य गोष्टींची यावेळी चर्चा होत असे. ज्या चांगल्या गोष्टी घडल्या त्याचं कौतुकही केलं जाई. या बैठकीत सर्वांना मोकळेपणानं चर्चा करण्याची मुभा असे. अपवादात्मक प्रसंग वगळता चर्चा फारच चांगली होत असे. जणू वृत्तपत्र प्रशिक्षणाचीच ही प्रक्रिया असे. त्यावेळी पुण्याहून कोल्हापूरला आलेले व 'सकाळ'ची कार्यपद्धती माहीत असलेले किशोर कुलकर्णी, सोमनाथ पाटील व विजय साळुंखे या साप्ताहिक बैठकीतील चर्चेत आघाडीवर असत. शेवटी डुम्बरे मार्गदर्शन करीत. त्यांच्या बोलण्यात अनेक इंग्रजी आणि वृत्तपत्रीय पारिभाषिक शब्द वारंवार येत असत. शिवाय 'हिंदू', 'हिंदुस्थान टाइम्स', 'लंडन टाइम्स', 'न्यूयॉर्क टाइम्स', 'वॉशिंग्टन पोस्ट' यांचे ते संदर्भ देत असत. आम्हाला हे सारंच नवं आणि वेगळं वाटे. कोल्हापूर जिल्हा आणि परिसर किंवा फार तर राज्यापुरता मर्यादित विचार करणाऱ्या आम्हा स्थानिक पत्रकारांना डुम्बरे जणू वेगळ्या, अनोख्या विश्वाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न करीत.

**सर्वोत्तमाचा ध्यास**

'कोल्हापुरात पत्रकारिता करणाऱ्यांना कशाला हवं आहे हे सारं?' असं तेव्हा काही वेळेला वाटत असे. पण डुम्बरेंना मात्र सारं सर्वोत्तम हवं असे आणि ते सारं विशाल परिप्रेक्ष्यातून पाहण्याची त्यांना सवय होती. ती त्यांच्या बोलण्यातून सतत जाणवत असे. सुमार गोष्टींचं ते कधीच समर्थन करीत नसत. 'चलता हैं' म्हणून किंवा 'जुगाड' करून वेळ मारून नेणं त्यांच्या तत्त्वात बसत नसे आणि त्यांना ते कदापि पसंत पडत नसे. 'परफेक्शन'चे ते चाहते होते. त्यामुळंच बातमीची कॉपी स्वच्छ आणि नेमक्या व मोजक्या शब्दांतच हवी याकडं त्यांचा कटाक्ष असे. आणि लेख, अग्रलेख वा सदर लेखन आटोपशीर, स्पष्ट आणि ठोस तपशीलानिशीच हवं, असा ते आग्रह धरीत. त्यांचं स्वत:चं अक्षर अत्यंत सुरेख, रेखीव व देखणं होतं. आणि लिहिताना त्यांच्याकडून कागदावर कुठंही किंचितही खाडाखोड होत नसे. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषावर त्यांचं प्रभुत्व होतं आणि त्यांची लेखनशैलीही आकर्षक होती. ते मोजकंच लिहीत, पण नेमकं आणि आशयसंपन्न असे. साप्ताहिक बैठकीत चांगल्या गोष्टींचं ते मनमोकळेपणानं कौतुक करीत आणि त्याबरोबरच उपयुक्त सूचनाही अगदी सहजपणे करीत. त्याचं सारं बोलणं म्हणजे एक प्रकारचं बौध्दिकच असे. प्रमुख इंग्रजी वृत्तपत्रं व नियतकालिकं ते नियमीतपणे वाचत असत. विविध विषयांतील त्यांचं ज्ञान अद्ययावत असे. त्यातील ताजे संदर्भ त्यांच्या बोलण्यात वारंवार येत असत. कोल्हापूरला 'हिंदू' व 'हिंदुस्थान टाइम्स'चे अंक तेव्हा मिळत नसत. ते पुण्याहून मागवून घ्यायला त्यांनी सुरुवात केली. 'टाइम' व 'इकॉनॉमिस्ट'सारख्या आंतरराष्ट्रीय इंग्रजी नियतकालिकांचे अंकही ग्रंथालयासाठी ते मागवीत आणि सर्व सहकाऱ्यांसाठी ते उपलब्ध करून देत. संपादकीय सहकाऱ्यांची बौध्दिक क्षमता वाढली पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. त्यासाठी त्यांना हवे ते संदर्भग्रंथ, पुस्तके उपलब्ध करून देण्याची त्यांची तयारी असे. 'सकाळ' पुणेचे ग्रंथालय संपन्न होते. तेथून कितीतरी संदर्भग्रंथ, विविध लेखांची कात्रणे ते संदर्भासाठी घेत. अपुऱ्या वा वरवरच्या माहितीवर विसंबून काहीही लिहिणे टाळले पाहिजे, असं ते म्हणत. कॉलेजविश्वपासून शेतीपर्यंत वेगवेगळी सदरं सुरू करून सहकाऱ्यांना लिहितं ठेवण्यापासून ते त्यांना जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर विविध ठिकाणी महत्त्वाच्या घटनांचे वार्तांकन करण्यासाठी पाठवण्यापर्यंत त्यांनी अनेक उपक्रम सुरू केले. त्याचप्रमाणे वेगवेळे विषय निवडून त्यासंदर्भात माहिती व अभ्यासपूर्ण लेखन करण्यासाठीही त्यांना प्रोत्साहन दिलं. थोडक्यात, संपादकीय विभागाला त्यांनी एखाद्या अभ्यासवर्गाचं स्वरूप दिलं. त्यामुळे प्रारंभीच्या काळात तरी 'सकाळ'मध्ये एकप्रकारचं उत्साही वातावरण असे. पत्रकारांची एक चांगली टीम तयार करण्यात ते यशस्वी

झाले. संपादकीय सहकाऱ्यांशी ते आपुलकीनं वागत असत. पण, गैर काही घडलं तर तीव्र संतापही व्यक्त करीत. पत्रकारांच्या स्वातंत्र्य व हक्कांसाठी व्यवस्थापनाशी संघर्ष करण्याची नेहमीच तयारी असे. त्यामुळे व्यवस्थापनाशी त्यांचे काही वेळा खटके उडत. संपादकीय विभागात ते जाहिरात विभागाला किंवा त्यांच्या बाजूंनी वकिली करणाऱ्या व्यवस्थापकांना कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करू देत नसत. संपादकपद हे सर्वांत महत्त्वाचं आणि अंतिम अधिकाराचं, हे तत्त्वत: मानणाऱ्यापैकी ते होते आणि आपल्या कारकीर्दीत तरी ते स्वतंत्रपणे निर्णय घेत राहिले. पत्रकारांना द्यावयाचे जादा लेखनासाठीचे मानधन किंवा बाहेरील लेखकांचे मानधन याबाबतीत ते मुळीच तडजोड करीत नसत. त्यांच्या लेखी पत्रकार, लेखक, विचारवंत, कलाकार यांची प्रतिष्ठा निर्विवादपणे मोठी असे.

**चळवळींविषयी आस्था**

१९८० मध्ये तत्कालीन केंद्रीय कृषीमंत्री डॉ. बलराम जाखड यांचा कोल्हापूर दौरा झाला. त्यावेळी शेतकरी मेळावा, कृषी प्रदर्शन असे बरेच कार्यक्रम जिल्ह्यात आयोजित करण्यात आले होते. त्यानिमित्तानं डुम्बरेंनी एका कृषी पुरवणीचे नियोजन केले. ‘सकाळ’ची ती पुरवणी अतिशय दर्जेदार झाली आणि बहुचर्चित ठरली. कोल्हापुरात त्या काळात झालेले रिक्षाचालकांचे आंदोलन आणि त्यांनी महापालिकेला घातलेला घेराव हे प्रकरणही त्यावेळी राज्यभर गाजले. ‘सकाळ’ने त्या घटनेचे केलेले विस्तृत वार्तांकन हाही त्यावेळी व्यापक चर्चेचा विषय ठरला. ६ एप्रिल १९८१ रोजी निपाणी येथे शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी आंदोलन तर राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वपूर्ण घटना म्हणून नोंदले गेले. शेतकऱ्यांच्या त्या ऐतिहासिक लढ्याचे डुम्बरे हे एक प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होते. ‘सकाळ’ने त्यावेळी जाणीवपूर्वक शेतकऱ्यांची बाजू घेतली आणि अप्रत्यक्षरित्या शेतकरी आंदोलनाला झुकते माप दिले. संपादक म्हणून त्यावेळी घेतलेल्या या भूमिकेचे डुम्बरेंनी नेहमीच समर्थन केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे आणि शेतीविषयाचे ते जाणकार व अभ्यासक होते. शरद जोशींच्या तंबाखू आंदोलनाच्या निमित्ताने त्यांनी सीमाभागातील अनेक गावांचे दौरे करून शेतकऱ्यांची भूमिका जाणून घेतली होती. शरद जोशी यांच्याशी तर त्यांचे जवळिकीचे संबंध होतेच. पण, हमाल पंचायतीचे नेते डॉ. बाबा आढाव, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नेते डॉ.नरेंद्र दाभोलकर, देवदासींच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असताना प्रा. विठ्ठल बन्ने, डॉ. आनंद वास्कर, डॉ. राजन गवस, भटक्या-विमुक्त संघटनेचे नेते लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके, रामनाथ चव्हाण, व्यंकप्पा भोसले, डॉ. बाबासाहेब अकादमीचे किशोर बेडकिहाळ व दिनकर झिंब्रे, स्त्रीमुक्ती चळवळीतील विद्या बाळ, पुष्पा भावे, छाया दातार, आदिवासी क्षेत्रात काम करणारे दीनानाथ मनोहर, वाहरू सोनावणे, मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे हुसेन जमादार, दलित पँथरचे नेते नामदेव ढसाळ, राजा ढाले, अरूण कांबळे अशा अनेकांनी ‘सकाळ’ कोल्हापूरला त्यावेळी भेटी दिल्याचे आठवते. पुरोगामी विचाराचे नेते आणि परिवर्तनाच्या चळवळी यांच्याशी डुम्बरेंचे नेहमीच आपुलकीचे नाते राहिले. पाणी पंचायतीचे विलासराव साळुंखे, सर्चचे डॉ. अभय बंग व राणी बंग आनंदवनचे डॉ. विकास आमटे व हेमलकसाचे डॉ. प्रकाश आमटे या विधायक क्षेत्रांतील कार्यकर्त्यांशीही त्यांचा निकटचा संपर्क असे. त्यांच्याशी त्यांचा पत्रव्यवहार चाले आणि काहीवेळा भेटीही होत. त्यांचे काम प्रत्यक्ष पाहायलाही ते जाऊन आले होते. पर्यावरण, ग्रामीण विकास व रचनात्मक क्षेत्रांत स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्यांविषयी त्यांना विशेष आत्मियता वाटे. राजकीय नेते वा उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांपेक्षा अशा कार्यकर्त्यांना भेटण्यात त्यांना अधिक आनंद वाटत असे. साहित्यिक व वैचारिक कार्यक्रमांच्या बाबतीतही दर्जा, सामाजिक मूल्ये, अभिरूची आदींचा विचार करून निवडक ठिकाणी जाणेच ते पसंत करीत. ते उत्तम वक्ते होते. पण, सवंग व गर्दीच्या सार्वजनिक कार्यक्रमांऐवजी विचारमंथनाला वाव असणाऱ्या मोजक्या समारंभांना वा चर्चा-परिसंवादांना ते अग्रक्रम देत असत. त्या काळात शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे आयोजित केलेल्या एका राष्ट्रीय चर्चासत्रास ते तीन दिवस पूर्णवेळ उपस्थित राहिल्याचे आठवते. डॉ. गो. मा. पवार यांनी आयोजित केलेल्या त्या चर्चासत्राचे बीजभाषण डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केले होते. त्यांच्या त्या भाषणाने आणि त्यात सहभागी झालेल्या साहित्यिकांमुळे ते खूपच गाजले होते. त्या चर्चासत्राच्या निमित्ताने घडलेली एक कटू आठवण इथे मुद्दाम नमूद करावीशी वाटते. त्या चर्चासत्रासंबंधी समग्र आढावा घेणारा एक लेख मराठीतील एका ख्यातनाम समीक्षकांना ‘सकाळ’साठी लिहायला सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे त्यांनी तो लिहिलाही. पण, तो अत्यंत सुमार

असल्याचे सांगून डुम्बरेंनी तो प्रसिद्धच केला नाही. त्यामुळे त्या समीक्षकाचा त्यांनी कायमचा रोष ओढवून घेतला. त्यामुळे अन्य कुणी संपादक असता तर कदाचित तो लेख छापून मोकळा झाला असता. पण डुम्बरेंनी ते केले नाही. लेखनाच्या बाबतीत दर्जाशी तडजोड करणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. त्यामुळे संपादकीय विभागात काम करणाऱ्यांना त्यांच्या 'पसंती'चे नेहमीच एक प्रकारचे दडपण वाटत असे. मात्र लेखन आवडले की ते एकदम खूश होत आणि लिहिणाराही समाधानाचा सुस्कारा टाकत असे. संपादन व लेखनाच्या बाबतीत ते अत्यंत कठोर वागत. व्यक्ती कोण यापेक्षा त्याचं काम ते महत्त्वाचं समजत. त्यामुळं त्यांच्या निकषांना उतरणं ही कसोटी असे.

वृत्तपत्राच्या दैनंदिन कामकाजाच्या धबडग्यात लहानसहान चुका होतच असत. पण, काहीवेळा त्यांचे स्वरूप गंभीरही असे. तथापि, या चुकांची जबाबदारी सहकाऱ्यांवर टाकून नामानिराळे राहण्याऐवजी ते त्या स्वत:कडे घेत. एकदा कोल्हापूरच्या शिक्षणक्षेत्रातील एका ऋषीतुल्य व्यक्तीच्या निधनाची बातमी अंकात शेवटच्या पानावर व अगदीच त्रोटक स्वरूपात प्रसिद्ध झाली. आदल्या दिवशीच्या रात्रपाळीच्या संपादकाला त्यांच्याविषयी काहीच माहिती नव्हती. तो पुण्याहून आला असल्यामुळं त्याच्याकडून हे अनावधानाने घडलं होतं. पण, साप्ताहिक बैठकीत स्थानिक सहकाऱ्यांनी हा विषय जोरदारपणे उपस्थित केला. शहरातूनही या बातमीच्या तीव्र प्रतिक्रिया आल्या होत्या. डुम्बरेंनी हे प्रकरण शांतपणे हाताळलं आणि चुकीची भरपाई करण्याचाही प्रयत्न केला. प्रत्येक शहरांची, गावांची म्हणून काही आदरस्थानं असतात, त्यांच्या स्वतंत्र अस्मिता असतात. लोकांच्यात त्याबाबतच्या वेगळ्या भावना असतात तेव्हा पत्रकारांनी कसं काळजीपूर्वक जपून काम करायला हवं, याबाबत अनेक उदाहरणांनिशी डुम्बरेंनी नंतरच्या साप्ताहिक बैठकीत सहकाऱ्यांना प्रबोधित केलं. बैठकीत कधीही ते स्पर्धक दैनिकाबद्दल किंवा तेथील पत्रकारांविषयी टिकाटिप्पणी करीत नसत. स्वैर व सवंग प्रतिक्रिया तर कधीच व्यक्त करीत नसत. टीकासुद्धा ते अत्यंत जबाबदारीनं आणि रास्त व सौम्य शब्दांत करीत.

**पत्रकारितेतील आदरस्थाने**

मराठी पत्रकारितेसंबंधी बोलताना त्यांच्या तोंडून 'सकाळ' आणि डॉ. ना. भि. परूळेकर व श्री. ग. मुणगेकर (सर) ही नावे आपसूकपणे येत असत. प्रभाकर प्राध्ये यांचाही ते अनेकदा उल्लेख करीत असत. ही तिन्ही व्यक्तिमत्वे त्यांना आदरस्थानी होती. 'सकाळ'मध्ये कसे व किती नवनवे प्रयोग करण्यात आले हे ते आवर्जून सांगत. या तिन्ही संपादकांकडे कशी वेगळी व व्यापक दृष्टी होती हेही प्रसंगपरत्वे निदर्शनास आणून देत. वास्तविक, डुम्बरे कोल्हापूरला आले तेव्हा ते तिशीतले होते. पण, खूपच अनुभवी वाटावेत, असं त्यांचं वक्तव्य असे. त्यांचं वाचन अफाट होतं. आणि व्यासंगही मोठा होता. त्यांच्या ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्वाचा अल्पावधीतच साऱ्यांवर प्रभाव पडत असे. तसे जेमतेम एक वर्षच ते कोल्हापुरात होते. कोल्हापूर त्यांना नवं होतं आणि प्रारंभी फारसं कुणी त्यांना ओळखत नव्हतं. पण तरीदेखील अल्पकाळातच त्यांनी 'सकाळ' रूजवला आणि त्याची वेगळी ओळख निर्माण करून दिली. ते स्वत: मात्र इथे रमले नाहीत. त्यांना आपल्या करिअरसाठी पुणे आणि 'सकाळ' पुणे हेच योग्य ठिकाण वाटलं असावं. कोल्हापुरात दीर्घकाळ संपादक म्हणून राहण्याचा त्यांनी आधीपासूनच विचार केला नसावा. 'सकाळ' कोल्हापूरला त्यांनी नेतृत्व दिलं. पण, त्यांचं नावही 'प्रेसलाईन'मध्ये नव्हतं. गांधीनगरच्या त्यावेळच्या काहीशा 'निर्जन' परिसरात ते वावरले. 'सकाळ'च्या पार्सल व्हॅनमधूनच ते कार्यालयात येत असत आणि कार्यक्षेत्रात सर्वत्र बसनेच प्रवास करीत असत. शहरात तर एखाद्याच्या स्कूटरवर मागे बसून वा रिक्षानेच फिरत. अशा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी वृत्तपत्राला दिशा देण्याचा आणि पत्रकारितेला विधायक वळण देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. त्यांचे अनेक सहकारी नंतर विविध वृत्तपत्रांत संपादक वा अन्य पदावर चांगल्या प्रकारे कार्यरत राहिले.

वर्षभर संपादक म्हणून काम केल्यानंतर डुम्बरे पुण्यास गेले आणि रविवार सकाळचे काम पाहू लागले. नंतर ते साप्ताहिक सकाळचे संपादक झाले. वास्तविक, दैनिकाचे संपादक म्हणून ते सक्षमपणे काम करू शकले असते. पण, ते पद त्यांच्या वाट्याला येऊ शकले नाही. साप्ताहिक सकाळमुळे ते काहीसे वृत्तपत्रांच्या मुख्य प्रवाहांपासून बाजूला फेकले गेले. पण साप्ताहिक सकाळला त्यांनी वेगळी उंची व दर्जा मिळवून दिला आणि अनेक लेखक घडवले हे खरे. दैनिक वृत्तपत्रांचे विश्व आणि दैनिकाच्या संपादकाचे महत्त्व वेगळेच असते. पुरेसा अनुभव, प्रगल्भता व वैचारिक क्षमता असूनही दैनिकाचा संपादक होण्याचे भाग्य त्यांना लाभू शकले नाही. बहुधा संस्थेतील अंतर्गत राजकारणाचा ते

बळी ठरले असावेत. महाराष्ट्र टाइम्सचे संपादक गोविंद तळवलकर व लोकसत्ताचे संपादक माधव गडकरी यांच्याशी डुम्बरेंचा चांगला स्नेह होता आणि त्या दोघांनीही त्यांना आपल्या वृत्तपत्रात येण्याचा आग्रह केला होता. (७० व्या वाढदिवसानिमित्त पुण्यात केलेल्या भाषणात त्यांनीच हे नमूद केले होते.) पण काही कौटुंबिक कारणामुळे ते पुणे सोडू शकत नव्हते. परिणामी सकाळ संस्थेतच ते अखेरपर्यंत कार्यरत राहिले. तिथल्या प्रदूषित वातावरणातही त्यांनी स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले, हे खरे. पण, दैनिकाचा संपादक म्हणून त्यांचे वेगळे कार्यकर्तृत्व महाराष्ट्राला पाहायला मिळाले असते. तथापि, ती संधी त्यांना मिळू शकली नाही. तसा सकाळ संस्था हा नेहमीच त्यांचा 'विक पॉइंट' राहिला. या संस्थाप्रेमापोटी त्यांनी 'सकाळ'मध्ये तब्बल ३६ वर्षे पत्रकारिता केली. त्यातील प्रारंभीची दहा-बारा वर्षे सोडली तर दोन दशकांहून अधिक काळ साप्ताहिक सकाळचे संपादक म्हणूनच ते कार्यरत राहिले. तिथे त्यांची बरीच घुसमट झाली. पण, तरीदेखील वृत्तपत्रसृष्टीतले महत्त्वाचे पत्रकार म्हणून ते नावारूपाला आले व त्यांच्या नावाला वेगळे वलयही प्राप्त झाले. मात्र त्यांचा पिंड हा दैनिक वृत्तपत्राच्या संपादकाचाच होता. डॉ. परूळेकरांनी 'सकाळ' सामान्य माणसापर्यंत कसा पोहाचविला व त्यांच्या जीवनाचा तो कसा अविभाज्य बनला, हे डुम्बरे नेहमीच पोटतिडकीने सांगत असत. 'सकाळ'ची जेव्हा एखाद दुसरीच आवृत्ती होती, तेव्हा ते हे बोलत असत. पुढील काळात या वृत्तपत्राच्या अनेक आवृत्त्या निघू लागल्या. पण, समाजाचा 'आतला' आवाज व समाजाच्या सद्सद्विवेकाचा विश्वस्त असणारे किती संपादक या वृत्तपत्रांना लाभले? समूह संपादक म्हणून या वृत्तपत्रांची धुरा वाहण्यास डुम्बरे हे निश्चितच कार्यक्षम व सर्वस्वी सुयोग्य ठरले असते. तथापि, ही संधी नंतरच्या काळातही त्यांना कधीच का मिळू शकली नाही, हे समजले नाही. डुम्बरेनीही त्याबाबत कधी भाष्य केले नाही. दीर्घकाळ साप्ताहिकाच्या कामातच ते अडकून पडले. त्यांच्यामुळं साप्ताहिक सकाळचा दर्जेदार 'ब्रँड' झाला. पण दैनिकाचा संपादक म्हणून त्यांना जो लौकिक लाभला असता त्याचे मोल वेगळेच ठरले असते. 'सकाळ'च्या दृष्टीनेही ते फलदायी ठरले असते. पत्रकार म्हणून डुम्बरेंची गुणवत्ता माहीत असणाऱ्या त्यांच्या मित्रांच्या व चाहत्यांच्या दृष्टीने ही नेहमीच खंतावणारी बाब बनून राहिली.

**निवृत्तीनंतरची वाटचाल**

डुम्बरे पुण्याला गेल्यानंतर त्यांचा सकाळ कोल्हापूरशी फारसा संबंध राहिला नाही. पुण्यातही दैनिकाच्या कामापासून ते दूरच असल्याने त्यांच्याशी बोलण्याचा कोल्हापूरच्या संपादकीय सहकाऱ्यांना फारसा कधी प्रश्न येत नसे. कोल्हापूरशी त्यांचे हे तुटलेपण तसे पुढे बराच काळ राहिले. गरजेपुरती कधीतरी संपादकीय विभागाची ते मदत घेत असतील, तेवढीच. त्यामुळे दैनंदिन संपर्क, फोनवर चर्चा वगैरेचा प्रश्नच येत नसे. या भागातील त्यांचे येणेजाणेही तुलनेने कमी झाले. व्याख्याने व अन्य काही सार्वजनिक कार्यक्रमाच्या निमित्ताने ते येत राहिले असतील, तेवढेच. साप्ताहिक सकाळची लोकप्रियता व त्यातील डुम्बरेंचे योगदान याविषयी कोल्हापूरच्या संपादकीय विभागात मात्र नेहमीच बोलणे होत असे. साप्ताहिक सकाळमधील 'तुकाराम दर्शन', 'लोकमान्य ते महात्मा', व 'गर्जा जयजयकार' या डॉ. सदानंद मोरे यांच्या सदरांची सर्वत्र व्यापकपणे व दीर्घकाळ चर्चा होत राहिली. पुढे ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाल्यानंतरही त्यांच्या लेखनाचा खूपच गाजावाजा झाला. साप्ताहिक सकाळच्या वर्धापनदिनानिमित्त पुण्यात देशपातळीवरील अनेक नामवंत व्याख्याते दरवर्षी येत राहिले. यू. आर. अनंतूमर्ती. एम. टी. वासुदेवन नायर, पी.साईनाथ, दिलीप पाडगांवकर, योगेंद्र यादव, रामचंद्र गुहा, नानी पालखीवाला, डॉ. वसंत गोवारीकर, डॉ. राजा रामण्णा, अनिल अग्रवाल, वंदना शिवा, प्रमोद तलगेरी, डॉ.अभय बंग, जावेद अख्तर, राम गुहा आदी विविध क्षेत्रांतील दिग्गजांची नावे पाहिली की डुम्बरेंच्या कल्पकतेचे कौतुक वाटे. या साऱ्यांची व्याख्याने त्या त्या वेळी गाजली आणि लोकांना आवडलीही. त्या भाषणाचा 'कर के देखो' या नावाने नंतर प्रकाशित झालेला संग्रह हा जणू मौलिक संदर्भ ग्रंथ ठरला आहे. सकाळच्या सेवेत असताना आपण एक अक्षरही अन्यत्र लिहिलं नाही, असं डुम्बरे म्हणत असत. सकाळ व साप्ताहिक सकाळमध्येही त्यांनी मोजकंच लिहिलं. पण जे लिहिलं ते अत्यंत सकस असं. व्यासंग, अभ्यासूपणा आणि दूरदृष्टी यांचा प्रत्यय त्यांच्या लेखनात प्रकर्षाने येत राहतो. 'आरसपानी', 'प्रतिबिंब', 'दशकवेध', 'देणारं झाड' आणि 'सदासर्वदा' ही त्यांची मोजकीच पुस्तकं. पण, त्यांचा वैचारिक आवाका आणि त्यांची लेखनक्षमता याचा अंदाज त्यावरून सहज बांधता येतो. शेती, नद्या, जंगलं, धरणं, पर्यावरण, प्रदूषण, शहर नियोजन, ग्रामीण व

सामाजिक सुधारणा, आंतरराष्ट्रीय राजकारण, प्रबोधन, प्रसार माध्यमं हे त्यांचे आवडते विषय होते. अर्थात विषय कोणताही असो, सामान्य माणूस हा केंद्रबिंदू आणि व्यापक देशहित हा त्यामागचा अंतिम विचार असे. विचाराने ते नि:संशय पुरोगामी व 'लेफ्ट टू द सेंटर' भूमिका असणारे होते. ते उदारमतवादी होते आणि महत्त्वाचं म्हणजे महाराष्ट्रातल्या रानडे-आगरकरांच्या बुद्धीवादी परंपरेचे पाईक होते. पंडित नेहरू आणि यशवंराव चव्हाण यांच्या राजकीय भूमिका आणि वाटचालीबद्दल त्यांना आदर होता व त्यांचे ते कट्टर समर्थकही होते. साहित्य, कला, संस्कृती, राजकारण, समाजकारण व प्रसारमाध्यमे आदी क्षेत्रांचा त्यांचा म्हणून वेगळा विचार असे आणि त्या क्षेत्रांतील काही व्यक्तीविषयीची ठोस मतेही त्यांनी बनवलेली असत. त्यासंदर्भात बोलताना त्यांचा कधीच गोंधळ होत नसे. माहीत नसलेल्या गोष्टीबद्दल बोलणे किंवा मोघम शेरेबाजी करणे ते कटाक्षाने टाळत. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे दुसऱ्याचं पूर्णपणे ऐकून व समजून घेऊन मगच ते मतप्रदर्शन करीत. आपले विरोधक व टीकाकारांविषयी ते कधीच काही बोलत नसत. उमदं, उत्साही, मनमोकळं व सहृदयी असं त्यांचं व्यक्तिमत्व होतं. ते समजायला मात्र काही काळ जावा लागत असे. कोल्हापुरात सुरवातीला आले तेव्हा 'रिझर्व्ह' वाटणारे डुम्बरे आम्हालाही तसे खूपच उशीरा कळले.

२००८ ला साप्ताहिक सकाळमधून निवृत्त झाल्यानंतर डुम्बरेंचा सार्वजनिक क्षेत्रातील वावर वाढला. परिसर, मुक्तांगण, लोकविज्ञान, शं. वा. किर्लोस्कर प्रतिष्ठान, निरामय पब्लिक ट्रस्ट, प्रभाकर पाध्ये प्रतिष्ठान अशा काही संस्थांशी ते आधीपासून संबंधित होतेच. नंतर त्यांच्या कामासाठी ते अधिक वेळ देऊ लागले. अध्यापन त्यांना नेहमीच आवडत असे. रानडे इन्स्टिट्यूटमध्ये ते अतिथी प्राध्यापक म्हणून जात असत. नंतर तिथेही नियमीतपणे जात राहिले. भारतीय जैन संघटनेच्या शैक्षणिक कार्यातही काही काळ सहभागी झाले. पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळ व अन्य काही समित्यांवरही काम करत राहिले. व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे यांत अधिक प्रमाणात भाग घेऊ लागले. या सर्व घडामोडी व उपक्रमाबाबत ते नेहमीच सविस्तर बोलत असत. फर्ग्युसन टेकडीवर नियमीत फिरायला जाण्यापासून देशी-विदेशी इंग्रजी वृत्तपत्रांच्या वाचनापर्यंत त्यांचे दैनंदिन व्यवहार पूर्वीसारखेच सुरू राहिले. त्याविषयी अधून मधून ते प्रदीर्घ संवाद करीत. नवे काय वाचले, ते सांगत. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे निवृत्तीनंतर त्यांचं फिरणं खूपच वाढलं. व्याख्यानांच्या निमित्तानं तर ते महाराष्ट्रात सर्वत्र दौरे करत राहिलेच. पण, निव्वळ पर्यटन म्हणूनही देश-विदेशातही फिरत राहिले. गेली सुमारे दोन दशके त्यांची ही भटकंती सुरूच होती. यातील अनेक दौऱ्यात आम्हालाही त्याची साथसंगत लाभली. त्यांच्या प्रेमळ सहवासाचा तर लाभ झालाच, पण असंख्य विषयांवर मनसोक्त गप्पागोष्टी करता आल्या. या काळात त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू पाहायला मिळाले आणि त्यांच्या वैचारिक उंचीचेही दर्शन घडले. गेल्या काही वर्षापासून त्यांच्या सांगली-कोल्हापूरच्या फेऱ्याही वाढल्या होत्या. पत्नी शुभांगीसह ते येत, तेव्हा सांगलीत प्रा. अविनाश सप्रे आणि कोल्हापुरात आमच्याकडे वास्तव्य करीत. नंतर राधानगरी, पन्हाळा किंवा अन्य एखाद्या पर्यटनस्थळी आम्ही जात असू. तेव्हा कुटुंबवत्सल, प्रेमळ व सहृदयी डुम्बरेंची वेगवेगळी रूपं पाहायला मिळत. अलीकडे कोरोनामुळं या उपक्रमात काहीसा खंड पडला होता. तथापि, आगामी काळातील पर्यटनाच्या बऱ्याच योजनांची आमची आखणी सुरू होती. देशांतर्गत तसंच विदेशातही अनेक ठिकाणी जायचं ठरलं होतं. लेखनाच्या बाबतीतही त्यांनी काही संकल्प केले होते. आणि मराठी वृत्तपत्रांच्या संदर्भात त्यांचं कामही सुरू होतं. त्याविषयी अधूनमधून ते चर्चा करीत असत. त्यांच्या अनपेक्षित जाण्यानं हे सारं आता कल्पनेतच राहिलं आहे. त्यांच्या मृत्यूचं वृत्त अत्यंत धक्कादायक होतं आणि अंतिम प्रवास तर खूपच वेदनादायी ठरला. नाशिकला क्रिडाईच्या एका सार्वजनिक कार्यक्रमासाठी ते गेले होते. नगररचना विषयावरचं त्यांचं तिथलं भाषणही खूपच चांगलं झालं होतं. त्यासंदर्भात ते अतिशय उत्साहानं बोलले होते. पण, नंतर चारच दिवसांनी त्यांना इस्पितळात दाखल करण्यात आल्याचं समजलं आणि तिथंच त्यांनी अंतिम श्वास घेतला. पत्रकारितेतील एका व्यासंगी व संपन्न व्यक्तिमत्वाचा कोरोना विषाणूनं बळी घेतला. 'साहेब', 'मित्र' आणि 'कौटुंबिक स्नेही' म्हणून मला त्यांच्याबरोबर चार दशकांचा काळ व्यतित करता आला. या प्रदीर्घ सहवासातील त्यांच्या संबंधीच्या असंख्य आठवणी. अविस्मरणीय अशा सदासर्वदा. त्या ताज्या व टवटवीतच राहतील. मन:पटलावर कोरलेल्या त्यांच्या सदाबहार, प्रसन्न व्यक्तिमत्वाप्रमाणे...

**दशरथ पारेकर,** कोल्हापूर

Mob.9420454765 / dvparekar@rediffmail.com

सुरेश द्वादशीवार

# ‘एकाकी’मधील शेवटची दोन प्रकरणे

सुरेश द्वादशीवार लिखित ‘एकाकी’ ही दहा भागांची लेखमाला गेल्या वर्षी साधना साप्ताहिकातून क्रमश: प्रसिद्ध झाली. त्यानंतर आणखी सात लेखांची भर टाकून, त्याच नावाचे पुस्तक साधना प्रकाशनाकडून या आठवड्यात प्रसिद्ध होत आहे. या पुस्तकात नव्याने समाविष्ट केलेल्या सात प्रकरणांपैकी दोन प्रकरणे येथे प्रसिद्ध करीत आहोत.

– संपादक

समाज आणि व्यक्ती

गांधीजी म्हणायचे, ‘मार्क्स समाजापासून सुरू होतो आणि व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतो. मी व्यक्तीपाशी सुरू होतो अन् तिच्याजवळ थांबत असतो.’

व्यक्ती प्रगल्भ झाली अन् विकसित झाली की, समाजाच्या विकासाचा वेगळा विचार वा प्रयत्न करावा लागत नाही. आताचे सारे प्रयत्न समूहांना, वर्गांना, समाजांना, धर्मांना आणि धर्मपंथांना दुरुस्त करण्यासाठी वा त्यांच्या विकासासाठी आखले जातात. गर्दीच्या या योजनांमध्ये व्यक्ती कोरडी राहते. लोहिया म्हणायचे, ‘दिल्लीहून निघालेला एक रुपया सामान्य माणसांपर्यंत पोहोचेपर्यंत पाच पैशांचा होतो.’ राजीव गांधींच्या शोधात तो पंधरा पैशांचा होतो, असे आढळले. सगळी यंत्रणा व व्यक्तींवर सकारण-अकारण नियंत्रण ठेवणाऱ्या संस्था-संघटनाच तिच्या वाट्याचे सारे काही हिरावून घेतात. हे केवळ आर्थिक बाबतीतच होते, असे नाही. विचार, विकास, उन्नती, अभिक्रम या सगळ्याच गोष्टींत समाज व्यक्तीला मागे ठेवण्याचाच नव्हे, तर शक्य तो अनभिज्ञ ठेवण्याचाही प्रयत्न करतो. विकास योजनांचे देशात व अन्यत्र जे झाले, ते हे आहे. उत्पादन वाढले ते देशाचे, विकासाचा दर वाढला तो देशाचा, शिक्षणाचा प्रचार झाला तो समाजात वा त्यातील वरिष्ठ वर्गाचा. सामान्य माणूस अजून जिथल्या तिथे राहिला वा गेलाच असेल, तर फार थोडा वर गेला. माणसांचे आत्मसंतुष्टपण त्याला आहे त्या स्थितीत समाधानी ठेवते. त्याचमुळे हे दुष्टचक्र चालू राहते.

व्यक्ती स्वत:चा विचार करू लागली. आपल्या स्थितीचा आढावा घेऊ लागली. ‘ते तसे अन् मी का असा?’ हा विचार तिच्या मनात येऊ लागला की, तिच्या खऱ्या विकासविषयक हालचालींना सुरुवात होते. ही स्थिती तिला समूहात गाठता येत नाही. धर्मात, जातीत, वर्गात वा तशा समूहात प्राप्त करता येत नाही. ती तिला एकाकी असणेच देत

असते. समूह माहितीत भर घालतात, प्रसंगी मनाच्या कक्षा रुंदावतात; पण ज्ञानात भर घालत नाहीत. ती एकट्याची, एकाकी अवस्थेत गाठलेली उंची असते. तिथे आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. सोबतचा जोडीदार– मग ती स्त्री असो वा पुरुष– ही पायांतली एक मोठी बेडी असते. ती सुरक्षा देत नाही आणि उंचीही देत नाही. सोबतच्याने जवळ असणे व आपल्या 'हो'ला 'हो' म्हणणे एवढेच मग तिला अपेक्षित असते. व्यक्तीला या जोडीची एवढी सवय होते की, ती स्वत:चा चेहराच नव्हे तर चवही हरवून बसते. जवळचे लोक त्यांचे 'ते एकरूप झाल्याचे' कौतुक करतात, पण ते एकरूप होत नाहीत. त्यांच्यातले काही तरी जसे वा तसेच असते. त्या दोघांचे 'अर्धमेले'पणच त्यांची एकरूपता वा पूर्तता असल्याचे ते व इतरही समजत असतात.

स्वावलंबन जाणे आणि परावलंबन येणे, हीच स्नेहाची कसोटी असते काय? समाजही त्याच परावलंबनाने आपले विस्तारलेले रूप असतो काय? समूहांची व समाजांचीही एक गंमत असते. ते एकाच व्यक्तीवर विश्वास ठेवतात व तिलाच पूज्य मानतात. तिच्या जवळ असणारे तिचे प्रतिनिधी असणाऱ्यांविषयी त्यांना आस्था असते. पण ती निष्ठा त्या सर्वोच्च व्यक्तीवर असते, जी साऱ्यांच्या वाट्याला येत नाही. नेहरूंनी गांधीजींवर लिहिलेल्या एका 'निनावी' लेखाचे शीर्षकच 'गांधी– जे मला आवडत नाहीत' असे होते. त्यातले त्यांचे एक विधान येथे सांगण्यासारखे आहे. ते लिहितात, "लोक माझ्या सभांना लाखोंच्या संख्येने येतात, मला पाहून खूश होतात. माझे भाषणही मन लावून ऐकतात. पण सभेच्या शेवटी त्यातले कोणीही 'जवाहरलाल नेहरू की जय' म्हणत नाहीत, ते सारे 'महात्मा गांधी की जय' असेच म्हणतात." आपल्या लोकप्रियतेचा खरा आधार नेहरूंना कळत होता.

हीच गोष्ट त्यांनी सुभाषबाबूंना लिहिलेल्या पत्रात म्हटली आहे. 'आपण दोघेही लोकांचे लाडके आहोत. पण आपल्या लोकप्रियतेचा खरा आधार गांधी आहेत. त्यांच्यापासून कधी दूर जाऊ नकोस. तसे केलेस, तर तू जनतेपासून दूर जाशील व देशापासूनही तुटशील.' व्यक्तीचे माहात्म्य सांगण्याचा हा प्रकार नाही. समाजजीवनातले वास्तव मात्र असे आहे. समाजाला एकच एक सर्वोच्च व्यक्ती नेतृत्वासाठी हवी असते. काँग्रेसच्या वर्किंग कमिटीत पंतप्रधान होण्याच्या योग्यतेची अनेक माणसे होती, पण त्यातले कोणीही गांधीजींची जागा घेऊन शकत नव्हते.





पृष्ठे : ११०, किंमत : १०० रुपये

अनुक्रम

एकाकीपणाचे पिशाच!
एकाकीपणाशी मैत्र...
एकाकी निर्मितीला श्रद्धेचा अडसर
जगन्मिथ्या म्हणजे तरी काय?
एकाकीपण की समाजविन्मुखता?
एकट्या व एकाकी जगाविषयी आस्था– की तिरस्कार?
त्यागाने एकाकीपणाची भूक मिटते काय?
एकाकीपणाच्या मुळाचा अवघड शोध
तर्काच्या विजयाची वाट
कळप आणि हाकणारे
एकाकी शहाणपण व दिशाहीन समूहमन
एकाकी यायचे, एकाकी जायचे
एकाकीपण धावणारे, तर समूहमन स्थिरावलेले
एकाकी जीवाची सोबत
शेजारी निवडता येत नाही
समाज आणि व्यक्ती
प्रवास आणि थांबलेपण

संपर्क : साधना प्रकाशन,
४३१ शनिवार पेठ, पुणे ३० / Ph. 020-24459635
mediasadhana@gmail.com

गांधीजी एकाकी होते काय? समूहात, समाजात, पक्षात व लोकांत राहूनही त्यांच्या आत्म्याचाच आवाज त्यांना मार्गदर्शक का वाटायचा? तो सहकाऱ्यांच्या शब्दांहून त्यांना महत्त्वाचा का वाटायचा? आत्म्याचा आवाज हाही अखेर 'एकाकीपणाचाच हुंकार' असतो की नाही?

गांधीजींच्या पश्चात तो सन्मान नेहरूंना मिळाला; पण गांधीजींवरील जनतेच्या विश्वासात निष्ठा होती, नेहरूंविषयी तिला प्रेम होते... नेल्सन मंडेला सत्तावीस वर्षे तुरुंगात राहिले. पण तुरुंगात असले तरी साऱ्या स्वातंत्र्यप्रेमी दक्षिण आफ्रिकन जनतेचे तेच खरेखुरे नेते होते. त्यांच्यावरील जनतेची निष्ठा देवदुर्लभ म्हणावी अशी होती. समाज व व्यक्ती यांचे असलेले नाते असेही या संदर्भात विचारात घ्यावे लागते. रामाविषयीची भक्ती, कृष्णाविषयीचे प्रेम, साधू-संतांविषयीची शतकानुशतके टिकणारी भक्ती ही तरी याच वास्तवाची उदाहरणे आहेत की नाहीत? ज्या काळात राजेशाही होती व ज्या देशात आजही वंशपरंपरागत ती शाही टिकली आहे, तिथे अशा आज्ञाधारकपणाला निष्ठा वा श्रद्धेची गरज नसते. हुकूमशहा आणि लष्करशहा यांनाही लोकांच्या निष्ठा फारशा लागत नाहीत. त्यांची दंडुकेशाहीच सारी प्रजा धाकात ठेवणारी असते. येथेच नमूद कराविशी महत्त्वाची गोष्ट ही की- समूहाची, वर्गाची, धर्माची वा वंशाची विचारसरणी त्यांच्या नेत्याला हुकूमशाहीकडे नेते. व्यक्तीसाठी ही हुकूमशाहीच असते. एकाकीपणाचा, एकेकट्या माणसाचा स्वतंत्र विचार जिच्यात असतो, ती विचारसरणी लोकशाहीच्या दिशेने जाते. जगभरचे वर्गशहा, धर्मशहा वा वंशवादी हे नेहमीच त्यांचे राजकारण द्वेषावर उभे करणारे दिसतात, उलट व्यक्तिवादी विचार विधायक प्रेमाचा व माणुसकीच्या मूल्याचा आढळला. हिटलर लोकशाही-वादी होऊ शकत नाही आणि गांधींना हुकूमशहा होता येत नाही.

एकाकीपण आत्मसंवाद साधणारे असते. मात्र तो संवाद सरळ व विधायक व्हायचा, तर त्या मनाला असूयेचा वा द्वेषाचा स्पर्श नसणे भाग असते. असूयेने पेटलेले मन स्वत:जवळ कधी जात नाही. ते त्याच्या असूयेच्या विषयाभोवती व व्यक्तीभोवतीच घुटमळत असते. असूया व द्वेष या प्रेरणा स्पर्धेची ऊर्जा देतात. प्रसंगी त्या स्पर्धा जिंकूनही देतात. मात्र अशी स्पर्धा जिंकणारे पहिल्या क्रमांकावर आले, तरी मनाने खूप खाली राहत असतात. विधायक मनच मोठे व उंच होत असते. त्याला विजय वा पराजयाची गरज नसते. ज्ञानदेवाची कुणाशीही स्पर्धा नव्हती, त्याचमुळे 'दुरितांचे तिमिर जावो' असे त्यांना म्हणता आले. कुणाच्या तरी तिमिराची इच्छा असणाऱ्यांना ज्ञानदेव होता येत नाही.

समूहात, कुटुंबात, पक्षात वा मित्रांत असणारी दु:खी व स्वत:च्या मनातच गुरफटून राहणारी माणसे आपण पाहिलेली असतात. याउलट एकटी, एकाकी असूनही आनंदात जगणारेही आपण पाहिलेले असतात. आपली मानलेली माणसे जवळच असावी लागणे त्यासाठी आवश्यक नाही. ती दूर असली तरी आपली असतात, ही भावनाही व्यक्तीच्या एकाकीपणाला सर्वस्पर्शी व आनंदी बनवत असते. 'अणुरेणुहूनिया थोकडा, तुका आकाशा-एवढा' ही भावना एका संताच्या मनात कशी येत असेल? ती त्याला कशी झेपत असेल? ती एक कविता असते, की त्याचे आत्मस्वरूप? आपल्या ठायी साऱ्यांना पाहता येणे, हेही एकाकीपणाचेच व्यापक रूप नाही काय? आणि आपल्या मनासारखे काहीही आपले नाही, हा भाग क्षुद्रपणाचा मानायचा की नाही?

एक विषय आणखीही. स्वत:ला दु:खी समजणारी व्यक्ती वा एकटी वा एकाकी माणसे आपल्या आनंदाचे अदृश्य निकष ठरवत असतात. ते तिच्या हाडीमांसी खिळलेले असतात. त्या निकषावर तिच्या आवडी-निवडीच नव्हे, तर सुख-दु:खेही निश्चित होतात. यातले चमत्कारिकपण असे की, हे निकष कायम स्वरूपाचे नसतात. ते बदलतात. काल आवडणाऱ्या गोष्टी व व्यक्ती आज आवडेनाशा का होतात? माणसाचे मन असे १८० अंशांनी का फिरते? त्यातला कोणता कोन खरा मानायचा, की ते सारेच तात्कालिक म्हणून पाहायचे?

आपल्याला आपले नातेवाईक निवडता येत नाहीत, तसे शेजारीही निवडून घेता येत नाहीत. जे मिळाले तेच आपले असतात. मात्र आपले मित्र व जोडीदार आपण निवडू शकतो. ते निवडस्वातंत्र्य आपल्याला आहे. अर्थात यातही एक अडसर आहे. ही निवड आपल्या मनाने करण्याचे स्वातंत्र्य किती जणांना असते? विशेषत: आपल्यातील स्त्रियांना? त्यातल्या अशिक्षित व मागास स्त्रियांची- ज्या वर्गात बालविवाह होतात, त्यातल्या स्त्रियांची- गणना यात करायची नाही. शिक्षित समाजातही आई-वडील, बहीण-भाऊ, ओळखीपाळखीचे, जातीतले, धर्मातले असे जोडीदार व मित्र निवडले जातात. ते नेहमीच आपल्याशी

पुरते जुळतात काय? जुळले तरी त्यात स्वेच्छेचा, प्रेमाचा भाग किती अन् नाइलाजाचा किती? आपल्या अवतीभोवतीच्या कुटुंबाकडे जरा लक्ष दिले, तरी त्यात मनातून एकमेकांना नावे ठेवीत नाइलाजाने जगणारी घरं आपण किती पाहतो? राजकीय पक्ष, संघटना व संस्था यांचेही असेच असते. पण तरीही समाज असतो. त्याचे सर्वसमावेशक व पारंपरिक निर्बंध अशाही साऱ्यांना एकत्र ठेवतात किंवा बांधून ठेवतात.

'याला जीवन ऐसे नाव' म्हणून मग आपण गप्प राहतो व आहे त्या व्यवस्थेशी जुळवून घेतो. मग पुरुषाला त्याचे जीवन अनुभवता येते. स्त्रीला त्यातला कितीसा भाग जगता येतो? एक दुष्ट गोष्ट अशी की, यात कोणी तरी कुणावर स्वार व्हायचे वा स्वत:वर कुणाला तरी स्वार होऊ द्यायचे, एवढेच असते की नाही? प्रेम म्हणायचे आणि त्यापलीकडे पाहायचे. समूह फक्त वाईटच नसतात; त्यात सहकार असतो, सहयोग असतो, भागीदारी असते. पण त्या प्रत्येकाची कुठली तरी मागणीही असते. ती नसेल, तर ते निरपेक्ष सहकार्य आनंददायी ठरते. मात्र ते फार अपवादाने लाभते आणि तेच खरे तर आयुष्यातील अंधाराला उजाळा आणते. हा सहभाग आयुष्यात काय आणतो? ज्ञान, अर्थ, स्नेह, जवळीक, मोठेपण? त्यातली काही माणसे अशी येतानाही त्यांचे मीपण आणतात आणि तापदायक होतात. तीही त्याचीच किंमत असते.

स्वयंशिस्त नावाचीही एक शिस्तबद्ध व्यवस्था असते. मी ती जपानमध्ये पाहिली. रस्त्यावरचे लाल दिवे लागतात, गाड्या थांबतात. थांबताना त्या आपसात दहा फुटांचे अंतर ठेवतात. प्रवासातसुद्धा त्यांचे ते अंतर कायम असते. युद्धामुळे शिस्त आली, की शिस्तीच्या बळावर तो देश महायुद्ध करायला सिद्ध झाला– हे कळायला आज मार्ग नाही. पण स्वातंत्र्य व शिस्तबद्धता यांची सांगड घालणारी स्वयंशिस्तीएवढी दुसरी गोष्ट नाही, हे तेव्हा लक्षात आले. लोक श्रीमंत आहेत किती? तर, दर वेळी टॉयलेटमधून बाहेर पडताना हातात एक कागद येतो– त्यावर तुमचे बी.पी., शुगर, अल्कोहोल आणि प्रकृतीतील इतर लहान–मोठे बदल सांगितले असतात. शिवाय त्यावरचे तातडीचे उपायही त्यात असतात. जपान हे दुसऱ्या महायुद्धापूर्वी हुकूमशाही राष्ट्र होते, पण स्वित्झर्लंडचे तसे नाही. ते पूर्वापार स्वतंत्र, मुक्त व आंतरराष्ट्रीय संघटनांच्याही बांधणीबाहेरचे राष्ट्र आहे. प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग राबविणारा जगातला आज तो एकमेव देश आहे. त्याच्या जिनेव्हा या शहरातील मध्यवर्ती व तीन देश जोडणाऱ्या मोठ्या कालव्यातून सफर करताना मी सोबतच्या मंत्र्यांना विचारले, ''तुमच्या लोकशाही देशाने १९६८ पर्यंत स्त्रियांना मताधिकार का दिला नाही?'' त्यावर ते शांतपणे म्हणाले, ''त्यांनी तो मागितलाच नाही.'' मी म्हणालो, ''आमच्या देशाने त्यांना तो न मागताच स्वातंत्र्यानंतर दिला...'' ते म्हणाले, ''असेल, पण येथे त्यांची तशी मागणीच आली नाही.'' स्वित्झर्लंड हा जगातला सर्वाधिक सुशिक्षित देश आहे. तिथे असे का व्हावे? त्या मंत्र्यांनी आणखीही एक धक्कादायक गोष्ट त्या वेळी सांगितली. ''आमच्या स्त्रियांना १९७८ पर्यंत बँकिंगचेही अधिकार नव्हते, कारण त्यांनी ते मागितले नव्हते. घरातल्या पुरुषांच्या अधिकारात त्या निर्धास्त होत्या.''

माणसे देशपरत्वे वेगळी असतात काय? त्यांची मानसिकता भिन्न असते काय? जपान आणि स्वित्झर्लंड यातले प्रगत कोण व अप्रगत कोण आणि शहाणे कोण व समाधानी कोण? माणूस हाच कमालीचा बुचकळ्यात टाकणारा प्राणी आहे. त्यातून स्त्री ही तर फारशी कुणाला समजली नाही, असे अशा वेळी मनात आले तर काय? अशांचे एकाकीपण कोणाला उमजेल? त्यांची उंची, खोली, प्रगल्भपणा वा संकुचित असणे तरी कोणाच्या लक्षात येईल?

## प्रवास आणि थांबलेपण

व्यक्तीच्या (म्हणजे एकाकी वा एकट्या माणसाच्या) संरक्षणासाठी निर्माण झालेले धर्म, राज्य, वंश, परंपरा आणि परमेश्वर याच संस्था वा संकल्पना व्यक्तीचे सर्वाधिक बळी का घेतात? युद्धे व्यक्तीत होत नाहीत, ती धर्मांमध्ये झाली व होतात, ती राज्यात झाली व होतात. सम्राट व राजे लढाया करायचे. आता जगातल्या महाशक्ती युद्धे करतात किंवा ती करण्याच्या तयारीसाठी शस्त्रस्पर्धा चालवतात. व्यक्तींना वाद घालता येतो, प्रसंगी हातघाईवर येता येते; पण त्यांच्यात युद्धे वा महायुद्धे होत नाहीत. ज्यांनी संरक्षण करायचे, त्या संस्था वा संघटना संरक्षणाच्याच नावाने माणसे मारतात. त्यातल्या बळींची इतिहासातील संख्या अब्जावधींची आहे. त्याहून दुर्दैव हे की, त्या मेलेल्या माणसांतील अनेकांना आपण नेमके कशासाठी वा कुणासाठी लढलो आणि मेलो, हे कळलेही नाही.

जोवर या संस्था आहेत, तोवर युद्धे संपणारही नाहीत. घाऊक पद्धतीने माणसांचे बळी घेणाऱ्या यंत्रणा नाहीशाही

होणार नाहीत. आज महायुद्धे होत नसली तरी स्थानिक, प्रादेशिक पातळीवरच्या लहानसहान लढाया चालू आहेत आणि त्यात दर दिवशी शेकडो माणसे बळीही पडत आहेत. महायुद्धे थांबली असल्याचे कारणही महाशक्तीतले वैर संपले हे नाही; त्यांना परस्परांजवळ असलेल्या अतिसंहारक शस्त्रांची भीती वाटते, म्हणून. छोटासा उत्तर कोरिया हा देश अमेरिकेला युद्धाचे आव्हान देतो आणि अमेरिका त्याच्याशी वाटाघाटी करायला राजी होते. चीनचे भारतावरचे आक्रमण चालूच असते आणि देशाचे पंतप्रधान त्या देशाशी बोलणी करतच असतात. नेपाळसारखा चिमुकला देशही भारतावर आक्रमण करतो. पाकिस्तानचा तो उद्योग सुरूच असतो. सगळे मध्य आशियाई देश, आफ्रिकेतील अनेक राष्ट्रे सदैव युद्धमग्न असतात. त्यांची सीमायुद्धे सतत सुरू असतात (सीमेच्या लढाया संपल्या की, देशांची सरकारे त्यांच्या विरोधकांचे मुडदे पाडतात). अशा वेळी या संस्थांना संरक्षक म्हणायचे की जीवघेण्या?

माणसांचे माणसांशी असलेले वैर एक वेळ समजून घेता येते, पण धर्मांचे धर्मांशी शत्रुत्व का असावे? एका धर्माचा ईश्वर दुसऱ्या धर्माच्या ईश्वराशी लढायला का निघावा? की, त्यांचे नाव समोर करून माणसेच स्वार्थाच्या हाणामाऱ्या करीत असतात? राजे त्यांच्या महत्त्वाकांक्षा खऱ्या करतात आणि जग जिंकण्याच्या ईर्ष्याही त्याचमुळे जन्माला येतात. या संस्था हिंसाचारी व मरणाचारी असतील, तर त्या टिकतात का आणि त्या टिकवण्याचा अट्टहास तरी का असतो? या संस्था-संघटना नसत्या तर एकटी व एकाकी माणसे अशी लढली व मृत्यू पावली असती काय? दर दिवशी सीमेवर मरणाऱ्यांना मृत्यूचे कारणही न कळता मरण आले असते काय? हिरोशिमा आणि नागासाकीत मेलेली दोन लाख माणसे- त्यांना लढायचे होते वा ती लढणारी होती म्हणून मृत्यू पावली नाहीत, त्या निष्पापांना आलेले मरण महासत्तांच्या व त्यांच्या सूत्रधारांच्या महत्त्वाकांक्षा यामुळे आले. माणसांनी नकळत मरायचे आणि त्यांना मरायला लावणाऱ्यांनी नेते वा जेते म्हणून आपली पाठ थोपटून घ्यायची आणि आपल्या देशालाही ती थोपटायला लावायची, हा मृत्यूचा खेळ कोण खेळतो? माणूस की धर्म, माणूस की राज्य, एकाकी जग की महासत्ता?

या संस्था नसत्या तर मनुष्यप्राणी इतर प्राण्यांच्याच अवस्थेत राहिला असता काय? आजवरची समाजाची प्रगती व्यक्तींचे संशोधन व शोधांमुळे झाली की, केवळ संस्थांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे? सामूहिक प्रयत्न महत्त्वाचे असले, तरी शोध वा संशोधन हे समूहाचे काम नाही. समूह फार तर अशा वेळी मदतीला येतात, आवश्यक ती उभारणी करतात. प्रत्येक शोध वा संशोधन मात्र व्यक्तीचेच असते. अग्नी, शेती हे आरंभीचे शोध कोणी लावले आणि अण्वस्त्रांची निर्मिती कोणी केली? व्यक्ती एकाकी अवस्थेत काही नवे शोधते आणि ते उपयोगाचे म्हणूनच समाज तिचा स्वीकार करतो. समाजाचे स्वत:चे सामूहिक म्हणावे असे संशोधन कोणते असते? विचार, सिद्धान्त, कल्याणकारी मार्ग, द्रव्य हे त्याचे एकीचे मार्ग की आणखी काही?

प्लेटो म्हणतो, झुंडीला तिचे एक मानस असते. तिला बुद्धीचा व ज्ञानाचा स्पर्श नसतो. तिचे मानस वाऱ्यासारखे दिशाहीन व बरेचदा आंधळेही असते. झुंडींनी समाजाचे कधी कल्याण केले आहे काय? की, त्यात हिंसा व संहार आणले...? हां, एक गोष्ट झुंडीच्या बाजूने सांगता येते- तिला श्रद्धा व भक्तीचा मार्ग गवसला की ती दिंड्या काढते, मिरवणुका काढते. यात्रा आणि तशाच भक्तिमार्गाने जाते. पण तिचे जाणेही कुठवर असते? जे अगोदरच हाती लागले असते, तिथवर. त्याहून पुढे नाही.

समाजाचे कल्याण व प्रगती साधणारे संशोधन नेहमी व्यक्तींनी केले. नोबेल पारितोषिके त्यामुळे व्यक्तींनाच दिली जातात. समाज व राज्य या संशोधनाचे सार्वत्रिकीकरण तेवढे करतात. त्या विस्ताराचे श्रेय समूहाला दिले, तरी त्याच्या निर्मितीचे श्रेय व्यक्तीच्या पदरात टाकावे लागते.

खरे तर, समाज व राज्य यांच्या संरक्षणासाठी ज्या यंत्रणा निर्माण होतात, त्यांचाही शोध व्यक्तींनीच लावलेला असतो. इस्रोसारख्या वा नासासारख्या संस्था त्यांचे श्रेय स्वत:कडे घेत असल्या, तरी त्यांचे बीज व्यक्तींचेच असते. अणुबॉम्ब ट्रुमन यांना वापरता येतो, पण त्याची निर्मिती शोपेनहॉवरकडून झालेली असते. समूहांना श्रेष्ठत्व देणारे समाज व्यक्तीचे मोठेपण कृपणतेने मान्य करतात. त्यांच्या निर्मितीचे जास्तीचे श्रेय ते देश, राज्य व समाजाला देतात. जाणकारांना मात्र यातले सत्य ठाऊक असते.

युद्ध वा संरक्षण सोडले आणि सामाजिक, सांस्कृतिक वा धार्मिक क्षेत्र घेतले तरी व्यक्तीचे नव्याच्या शोधाचे, पुढे जाण्याचे व ते क्षेत्र विकसित करण्याचे श्रेय कुणाचे असते? व्यक्तीचे की समूहाचे? स्वातंत्र्याच्या वा समतेच्या लढ्यासाठी लोक संघटित होतात. पण ते संघटन एक गांधी वा एक आंबेडकर करीत असतो. आपला वारकरी संप्रदाय ज्ञानदेवापाशी सुरू होतो. हिंदू धर्माचे संरक्षण व संघटन

शंकराचार्यांकडून होते. महावीर जैन धर्माची, बुद्ध बौद्ध धर्माची, पैगंबर इस्लामची आणि नानक शीख धर्माची स्थापना करतात; ती समूहाची निर्मिती नसते. समूहांना ती मोठे व संघटित करते, एवढेच. चित्रकला, संगीत, नाटक, चित्रपट ही कुणाची निर्मिती? तीत सारे जण गुंतलेले दिसत असले, तरी तिची प्रेरणा कुणा एकाचीच असते की नाही? या स्वयंमेव एकाकी व्यक्तीला समूहाचे पाठबळ लाभते ते तिच्याच गुणवत्तेच्या व उपयुक्ततेच्या बळावर.

सत्तेला सत्य तसेही चालत नाही, तिला सोय हवी असते. तिचा आधार खरेपणा नसतो. श्रद्धा, भक्ती, अडाणीपण, चौकसहीनता आणि सत्तेची गुलामगिरी यावरच ती पुष्ट होत असते- मग ती सत्ता कोणतीही असो. धर्मसत्तेला धर्मविरोधी वा त्याहून विसंगत विचार चालत नाहीत. विचार करा, पण तो वेदानुकूलच करा- या हिंदू धर्माच्या आदेशाने त्यात सत्यशोधनाच्या व तर्काच्या परंपरा वाढू दिल्या नाहीत. बायबलविरोधी विचार हे पाखंड आहे आणि ते मृत्युदंडास पात्र आहे, ही धर्माज्ञा त्या धर्मक्षेत्रात संशोधने वाढू देणारी नव्हती. एवढेच नव्हे, तर तिने पूर्वीच्या सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल आदींच्या तत्त्वपरंपरा मोडीत काढल्या. कुराण हा ईश्वरी ग्रंथ ठरला, तेव्हा सारे अरबी तत्त्वचिंतन इतिहासजमा झाले. अगदी अलीकडे आपल्या कल्पनांना छेद देणारे काही संशोधक स्टालिनने तुरुंगात टाकले व मारले. मार्क्सहून वेगळा विचार नको- ही मार्क्सवाद्यांची, हिंदुत्वाहून वेगळा विचार नको- ही हिंदुत्ववाद्यांची परंपरा हेच सत्य अधोरेखित करीत असते. परिणामी- स्वर्ग, नरक, ईश्वर, पूर्वजन्म आणि पुनर्जन्मासारख्या भाकडकथाच मजबूत होतात.

श्रद्धा हा समूहाच्या एकजुटीचा, तर सत्य हा व्यक्तीच्या संशोधनाचा विषय आहे. काही व्यक्तींना समाजाने इतिहासात जो विरोध केला वा मृत्यू दिला, त्याची कारणंही सत्याच्या वा त्यांनी असत्यासी केलेल्या विरोधातच शोधावी लागतात. व्यक्ती पुढे का जाते? ज्ञान उंची का गाठते? आणि समूह स्थिर का राहतात? श्रद्धा जागच्या जागी होत्या, तशाच का राहतात? यांची उत्तरेही यातच सापडतात. सबब सत्याचे व तर्काचे महत्त्व वाढते व वाढवले पाहिजे. भारतात तर काही वर्षांआधी न्यायालयाच्या बदनामीच्या खटल्यात सत्य हा पुरावा म्हणूनही अमान्य केला जात होता. त्यामुळे बदनामी होते, एवढाच काय तो अपराध मान्य होत होता. ती नामुष्की आता संपली आहे.

सत्य, तर्क, विचार, संशोधन, शोध हे व्यक्तीच्या वा एकाकी माणसाच्या कामाचे; तर श्रद्धा, भक्ती व अनुनय हे समूहाच्या भावनांचे क्षेत्र आहे.

प्रगती साधायची, तर यातला पहिला स्वार्थ साधायचा तर दुसरा मार्ग अवलंबायचा असतो. प्रसंगी त्यासाठी समूहापासून, संस्थांपासून- अगदी धर्मासारख्या श्रद्धाधारित संघटनांपासूनही दूर व्हावे लागते. असत्यावर प्रकाश टाकल्याखेरीज आणि खोटेपणावर उभारलेले इमले खाली आणल्याखेरीज खऱ्यापर्यंत जाता येत नाही. विकासाची वाटही सत्यापासूनच सुरू होते. ही वाट सरळ वा सोपी नसते. ती सत्तेच्या, धर्मांच्या, आपले म्हणणाऱ्या अनेकांच्या विरोधातून जाते. सारे तुटते. प्रसंगी जीव धोक्यात येतो. सत्यासाठी प्राणार्पण केलेल्या खऱ्या हुतात्म्यांची इतिहासातील लखलखती बाजू मोठी आहे. ती जळणारी आहे, पण समाजातले हीन जाळणारी आहे. मनाची फार मोठी तयारी व त्याआधी फार मोठी जिद्द मनात असल्याखेरीज या वाटेने जायचे नसते... मात्र जे जातात, तेच जगाचे उपकारकर्ते, नेते व मार्गदर्शक ठरतात. प्रसंगी त्यांना दैवतांचा मान मिळतो. मात्र ही वाटचाल त्या सन्मानासाठी करायची नसते, स्वतःच्या उन्नतीसाठी व समाजाच्या कल्याणासाठी करायची असते.

एकट्या माणसांनी जगाचा विनाश केला नाही, असे नाही. ती माणसेही बुद्धिमानच होती. पण त्यांच्या बुद्धीचे वळण वाकडे होते. उदाहरणार्थ- हिटलर, मुसोलिनी. इतिहासात चंगेझखान, अनेक रोमन सम्राट, पोप अन् राजांनीही जमेल तेवढा जगाचा विनाश केला. बर्नार्ड शॉ यांनी एका भाषणात म्हटले, ''नेपोलियन एकच चांगली गोष्ट करू शकला असता, ती म्हणजे त्याने जन्मान न येणे.''

मात्र अशा माणसांच्या तुलनेत जगात कल्याणकारी माणसे अधिक झाली आणि कल्याणाची प्रक्रिया विनाशाहून अधिक परिणामकारक व प्रदीर्घ काळ टिकणारीही असते. विनाशी माणसांची नावे इतिहासजमा होतात, कल्याणकर्त्यांची इतिहासात कायम अन् अजरामर होतात. आजचा समाज त्यांचेच नाव घेतो. उद्याचा काळही त्यांचेच नाव घेणार आहे.

**सुरेश द्वादशीवार**, चंद्रपूर
sdwadashiwar2021@gmail.com
Mob. : 9822471646

संतोष दास्ताने

# विषमतेचा विषाणू

विषमता दूर करून संपूर्ण आणि आदर्श अशी समता प्रस्थापित करणे, हे व्यवहारात एक स्वप्नच ठरते. ज्ञान, कौशल्यपातळी, कार्यक्षमता, जोखीम यातील नैसर्गिक फरक लक्षात घेता, प्रत्येक समाज काही प्रमाणातील विषमता स्वीकारत असतो. त्या-त्या देशातील सामाजिक-आर्थिक आकृतिबंध, साक्षरता पातळी, माध्यमांची भूमिका, कायद्यांची परिणामकारकता, संस्थांची चौकट, दबाव गटांची सक्रियता, राजकीय-सामाजिक इच्छाशक्ती अशा अनेक घटकांवरून विषमतेची सहनीय आणि स्वीकारार्ह पातळी ठरत असते. काळानुसार ती बदलतही असते. पण त्या अपेक्षित विषमता पातळीपासून सतत दूर असणे, उच्च व निम्न उत्पन्न स्तरांमधील गुणोत्तर वाढत जाणे, समतेकडे नेणारे घटक प्रभावहीन ठरणे या चिंतेच्या बाबी आहेत. काही अपवाद सोडता, जगामध्ये व भारतामध्ये असेच घडताना दिसते, असे म्हणावे लागेल.

देशाचे वार्षिक अंदाजपत्रक सादर करण्याचा इव्हेन्ट एक फेब्रुवारी रोजी पार पडला. त्यावरील स्पष्टीकरण, खुलासे, प्रतिक्रिया, अंदाजपत्रकाच्या दस्तावेजांच्या तळटीपांमधील बारीक टाइपातील मजकुराचे वाचन व त्याचे विश्लेषण करून झाले. आता उरले ते म्हणजे, या वार्षिक कर्मकांडाने देशाच्या मूलभूत आर्थिक-सामाजिक समस्यांना कितपत स्पर्श केला आहे हे पाहणे. गरिबी, बेरोजगारी, विषमता, अस्थिरता, प्रादेशिक असमतोल या समस्या आपल्या पाचवीलाच पूजलेल्या! स्वातंत्र्यानंतरच्या सर्व पिढ्या हा वारसा सांभाळून आहेत आणि इमाने इतबारे पुढील पिढीकडे सोपवीत आहेत. आता पाहायचे इतकेच की, या समस्यांना भिडण्याचे प्रामाणिक प्रयत्न याद्वारे होत आहेत किंवा कसे, तसेच त्या समस्यांची कालबद्ध सोडवणूक करण्याचा काही ठोस कार्यक्रम येथे दिसतो का नाही. अर्थात हेही खरे की, एका अंदाजपत्रकाने फार काही साधते असे नाही. अंदाजपत्रकाच्या भारदस्त दस्तावेजात आर्थिक घडामोडी, राजकीय-सामाजिक कार्यक्रमांच्या घोषणा, प्रशासकीय फेरबदल, सांख्यिकी माहितीची कसरत, पुढील घटनांचा अंदाज असे सर्व काही ठासून भरलेले असते. त्यामुळे त्या सर्वांचा सावकाशीने अर्थ लावणे हे नेटाने करणे भाग आहे.

या अंदाजपत्रकाच्या थोडे आधी, म्हणजे २५ जानेवारी २०२१ रोजी दावोस, स्वित्झर्लंड येथे जागतिक आर्थिक परिषदेची वार्षिक बैठक झाली. त्यात ऑक्स्फाम या बिगरसरकारी संस्थेने आपला विषमतेचा विषाणू या शीर्षकाखाली 'कोरोना महामारीच्या काळात जगात विषमता वाढत गेली' अशा आशयाचा अहवाल सादर केला. अर्थात विषमता ही घटना जगात नवी नाही, पण कोरोनाच्या निमित्ताने ती पुन्हा तीव्रतेने अधोरेखित झाली. कोरोनाचे संकट कालांतराने दूर होईल, पण सर्व आर्थिक-सामाजिक स्थिती पूर्वपदावर येण्यास त्यानंतर कित्येक महिने लागणार आहेत, हे कटू सत्य आता स्वीकारावे लागणार

आहे. तेव्हा या विषमतेच्या समस्येची सोडवणूक जगाने आणि भारताने कशी काय करायची, हे पाहणे आवश्यक आहे. सन २०२० या वर्षात कोरोना महामारीने एकूणच आर्थिक-सामाजिक घडी विस्कटून गेली. पण नेमके काय घडले हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. उदा. अब्जावधी डॉलर्सची संपत्ती बाळगणाऱ्या जगातील श्रीमंत व्यक्तींची संख्या गेल्या तीन वर्षांत ७० टक्क्यांनी वाढली. एलन मस्क हा गर्भश्रीमंत माणूस सध्या सर्वत्र चर्चेत आहे. त्याची संपत्ती नजीकच्या काळात १०० बिलियन डॉलरने वाढली. ॲमेझॉनचा संस्थापक जेफ बेझोस याची संपत्ती वेगाने वाढून ती २०० बिलियन डॉलरवर गेली. ॲपल कॉर्पोरेशनच्या भांडवलाचे बाजारमूल्य दोन ट्रिलियन डॉलरवर गेले. भारतातील करोडपतींची संख्या ३५ टक्क्यांनी वाढली. कोरोनाकाळात असंघटित-असुरक्षित गटातील ७० टक्के जणांनी रोजगार गमावले. त्यांचे उत्पन्न घटले, कर्जबाजारीपणा वाढला. महिलांच्या रोजगार समाप्तीत तुलनेने अधिक वाढ दिसली, त्यांचे उत्पन्न अधिक प्रमाणात उतरले. येथेही लिंगविषमता आहे. या अवघड काळात लोकांच्या उत्पन्नात सरासरी सुमारे १७ टक्क्यांची घट झाली, असे एका संशोधनात आढळून आले आहे. त्यातही तळाच्या १० टक्के लोकांच्या उत्पन्नातील घट उच्च उत्पन्न गटातील लोकांच्या उत्पन्नघटीपेक्षा सुमारे २.५ पटीने जास्त आहे. म्हणजे, श्रीमंत गटाचे उत्पन्न १० टक्क्यांनी घटले, तर अगदी गरीब गटाचे उत्पन्न २५ टक्क्यांनी घटले. याचा अर्थ असा की उत्पन्नातील घट सोसण्याची क्षमता जास्त असणाऱ्या लोकांवर कमी ओझे पडले, तर उत्पन्न घट पेलण्याची सुमार क्षमता असणाऱ्या लोकांवर कमालीचे जास्त ओझे पडले. त्यात मुख्यतः कंत्राटी, रोजंदारीवरील, असंघटित, स्थलांतरित गरीब मजूर होते. नोटाबंदीच्या काळापासून त्यांची फरफट झालेली आढळते. त्यांच्या हलाखीच्या बातम्या आठवून पाहा. शेकडो किलोमीटरचे पायी प्रवास, प्रवासातील गैरसोय, थकवा, अपघात, आजारपण, नैराश्य, आत्महत्या अशात सुमारे ३०० जणांचे बळी गेले. गरीब आणि श्रीमंत या दोन गटांतील सरासरी उत्पन्नातील दरी रुंदावतच गेली. याच काळात देशातील १५ राज्यांमधील अल्प उत्पन्न गटातील ४७ हजार कुटुंबांचे व्यापक सर्वेक्षण करण्यात आले. त्यात त्यांच्या कर्जबाजारीपणात लॉकडाऊनपूर्वीच्या पातळीच्या तुलनेने सरासरी सुमारे ७० टक्क्यांची वाढ झालेली दिसली. रोजचे अन्नपाणी-भाजीपाला असे किमान खर्च भागवण्यासाठी यापैकी सुमारे २५ टक्के जणांना आपल्याजवळील किडुकमिडूक सामानही विकावे लागले. आता दुसऱ्या बाजूचे चित्र पाहा.



भारतातील शेअर बाजार  रोज उसळी घेऊन नवनवीन उच्चांक प्रस्थापित करीत आहे. देशातील अनेक उद्योगांची झालेली कोंडी, त्यांची कुंठितावस्था, औद्योगिक क्षेत्राची फुगत गेलेली कर्जपातळी, बँकांची- वित्तीय संस्थांची बेसुमार थकित कर्जे या सगळ्याचे शेअर बाजाराला फारसे सोयरसुतक नाही, असेच दिसते. येथे मूठभर लोकांचे अमाप पैसा कमावणे सतत चालू असते. देशाच्या अर्थव्यवस्थेतील हे दोन समांतर प्रवाह म्हणजे अधिक विषमतेच्या दिशेने चाललेली दमदार वाटचाल होय!

जगाच्या विषमता निर्देशांकाच्या विविध मालिका सतत प्रसिद्ध होत असतात. सन २०१७ व २०१८ नंतर २०२० मध्ये या निर्देशांकाची तिसरी क्रमवारी प्रसिद्ध झाली. त्यात १५८ देशांच्या यादीत भारताचा १२९ वा क्रमांक आहे. नॉर्वे या यादीत अव्वल क्रमांकावर, तर दक्षिण सुदान शेवटच्या क्रमांकावर आहे. विषमता कमी करण्याच्या बाबतीत अत्यंत निराशाजनक कामगिरी करणारे देश या उपगटात भारताची गणना करण्यात आली आहे. ही क्रमवारी ठरवताना देशातील प्रगतिशील करपद्धती, कामगारांचे हक्क व उपलब्ध सार्वजनिक सेवा यांचा एकत्रित विचार केला गेला आहे. या तीन उपायांच्या आधारे विषमता घटवण्याची एखाद्या देशाची किती प्रबळ इच्छाशक्ती आहे, हे ठरवले जाते. त्या दृष्टीने भारताची आतापर्यंतची कामगिरी फारशी आश्वासक नाही, असा निष्कर्ष अटळपणे निघतो.

देशात आर्थिक आघाडीवर चढ-उतार नेहमी होतात याबद्दल दुमत नाही. पण सामाजिक आघाडीवरदेखील परिस्थिती गंभीर आहे. लिंगसमानता निर्देशांकाच्या क्रमवारीत भारत १२३ व्या क्रमांकावर आहे. हा गट अत्यंत असुरक्षित आणि चिंताजनक परिस्थिती असलेला असा मानला जातो. या काळात घरगुती हिंसाचारात ६० टक्क्यांनी वाढ झाली. कोरोनाकाळात कुटुंबनियोजन उपायांमध्ये अडथळे आल्यामुळे अवांच्छित संतती, गर्भपात, प्रसूतीमृत्यू यात सर्वत्र वाढ झाली, असे जागतिक आरोग्य संघटनेचा ताजा अहवाल म्हणतो. याच काळात जगात ११ कोटी लोक गरिबी रेषेखाली नव्याने ढकलले गेले. पण या सर्वाबद्दलची अधिकृत आणि विश्वसनीय आकडेवारी भारत सरकारकडून उपलब्ध होत नाही.

विषमता दूर करून संपूर्ण आणि आदर्श अशी समता प्रस्थापित करणे, हे व्यवहारात एक स्वप्नच ठरते. ज्ञान, कौशल्यपातळी, कार्यक्षमता, जोखीम यातील नैसर्गिक फरक लक्षात घेता, प्रत्येक समाज काही प्रमाणातील विषमता स्वीकारत असतो. त्या-त्या देशातील सामाजिक-आर्थिक आकृतिबंध, साक्षरतापातळी, माध्यमांची भूमिका, कायद्यांची परिणामकारकता, संस्थांची चौकट, दबाव गटांची सक्रियता, राजकीय-सामाजिक इच्छाशक्ती अशा अनेक घटकांवरून विषमतेची सहनीय आणि स्वीकारार्ह पातळी ठरत असते. काळानुसार ती बदलतही असते. पण त्या अपेक्षित विषमतापातळीपासून सतत दूर असणे, उच्च व निम्न उत्पन्न स्तरांमधील गुणोत्तर वाढत जाणे, समतेकडे नेणारे घटक प्रभावहीन ठरणे या चिंतेच्या बाबी आहेत. काही अपवाद सोडता जगामध्ये व भारतामध्ये असेच घडताना दिसते, असे म्हणावे लागेल. येथे ग्रामीण व नागरी, संघटित व असंघटित क्षेत्र असे मुख्य फरक आहेत. प्राथमिक सांख्यिकी माहितीची उपलब्धता आणि गुणवत्ता अशा बाबतीत दोन्ही क्षेत्रांमध्ये मोठा फरक आहे. त्यामुळे विषमता कमी करणाऱ्या धोरणांची फलनिष्पत्ती वेगवेगळी दिसत राहते. असे नियम, कायदे आणि धोरणांची भारतात कमतरता नाही. पण ते तयार करणारे गटच प्रत्यक्षात विषमता कमी होऊ देत नाहीत. नियम-कायदे संदिग्ध असतात, त्यांची माहिती लोकांना नसते, ते कालबाह्य झालेले असतात, ते राबवणारी यंत्रणा कुचकामी असते, प्रशासन आणि न्यायव्यवस्था अपुरी व भ्रष्ट असते- असे चित्र सर्वत्र असताना विषमता निश्चितपणे कमी होत राहील, अशी अपेक्षा कशी काय ठेवणार? न्यायव्यवस्थेतील दोषांबाबत उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांचे न्यायाधीशच जाहीरपणे कबुली देत असतात. हे पाहता, विषमता कमी होईल अशी परिस्थितीच नाही, असे का म्हणायचे नाही ? भारतातील दोन गटांच्या उदाहरणावरून हा मुद्दा स्पष्ट होईल. एका गटात संघटित कामगार/कर्मचारी, उद्योगपती, उद्योजक, निवृत्तिवेतनधारक यांचा समावेश करू. दुसऱ्या गटात सामान्य शेतकरी, शेतमजूर, स्वयंरोजगारी, हंगामी रोजगारी, असंघटित कामगार, रोजंदारी मजूर, प्रकल्पग्रस्त, आदिवासी, बेरोजगार, अभावग्रस्त यांचा समावेश करू. पहिल्या गटातील लोकांचे उत्पन्न सतत वाढण्याची दाट शक्यता. त्याला वेतन आयोग-वेतनकरार, वाढता महागाई भत्ता यांचा भक्कम आधार असतो. दुसऱ्या गटातील लोकांचे उत्पन्न वाढत राहील याची काहीच शाश्वती नाही. त्यांना कुंठित, घटत्या, चढ-उताराच्या व कित्येक वेळेस शून्य उत्पन्नाचीच तसेच उणे उत्पन्नाचीच- म्हणजे उदा.

कर्जबाजारीपणाची शक्यता. या दोन गटांच्या चढाओढीत विषमतेचा विषवृक्षच फोफावणार!

सरकारने या समस्येचा मात्र पूर्वीपासून पाठपुरावा केला आहे, हे नाकारून चालणार नाही. संघटित क्षेत्रात उत्पन्न आणि संपत्तीत जलद वाढ घडवून आणण्यास देशातील बडी औद्योगिक घराणी व त्यांची मक्तेदारीसदृश कामगिरी कारणीभूत होती, असे स्वातंत्र्यानंतरच्या अनेक आयोग-चौकशी समित्यांनी अभ्यास करून मांडले आहे. त्याचा परिणाम म्हणून आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झाले. विषमतेला यामुळे खतपाणी मिळाले. ज्या काळामध्ये सरकारने लोकशाही समाजवादाचा प्रयोग अधिकृतपणे राबवला, त्याच काळात हे घडून आले. हा कालखंड साधारणपणे १९५५ ते १९९०. यात लक्षणीय बाब अशी की- औद्योगिक परवान्यांचे वाटप करणे, विदेशी चलन उपलब्ध करून देणे, बँका व वित्तीय संस्थांमार्फत वित्तपुरवठा करणे अशा सर्व गोष्टी सरकारच्या पूर्णपणे नियंत्रणाखाली असताना संपत्तीचे केंद्रीकरण आणि मक्तेदारी संस्था हे सर्व फोफावत गेले. सन १९६५ ते १९९० या दरम्यान देशात शेतीक्षेत्रात हरित क्रांती घडून आली. पण तिचा खरा लाभ ठरावीक पिके घेणारे मोठे बागायतदार शेतकरी यांनीच उठवला. सरकारकडून विविध क्षेत्रांत अनेक सवलती, करमाफी, कर्जमाफी अशा योजना अमलात येतात. त्यांचा लाभ मूठभर धनदांडगे आणि सत्ताधीश उठवत असतात, हे उघडपणे दिसते. अशा सर्व घडामोडींनी देशात आर्थिक-सामाजिक ध्रुवीकरण आणि विषमता घडवून आणली.

सन १९९० नंतरची विविध आर्थिक धोरणे राबवताना सरकारची भूमिकाच आता बदललेली आढळते. सार्वजनिक क्षेत्र आणि इतर अनेक मार्गांनी सरकारचा आर्थिक बाबींमध्ये पूर्वी थेट हस्तक्षेप असे, तो आता जवळजवळ नाहीसा झाला आहे. आर्थिक सुधारणांचे युग आले. किमान हस्तक्षेप करणे, खासगी क्षेत्रास मुबलक वाव देणे, परवाने-नियंत्रणे कमी करणे, जागतिकीकरणाचा पाठपुरावा करणे, विदेशी तंत्रज्ञान आणि गुंतवणुकी यांचे स्वागत करणे असे सध्या हे सरकार मनोभावे करीत आहे. आता समाजवादी धोरणांना सुट्टी मिळाली. देशाचे नियोजन मंडळ मोडीत निघाले. पंचवार्षिक योजना इतिहासजमा झाल्या. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होणार... अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरची होणार अशा चमकदार घोषणांचे आता युग आले. त्या दिशेने काही कामगिरी नक्कीच होईल, पण देशातील विषमतेची दरी मिटत जाईल अशी खात्री देता येत नाही.

गेल्या सुमारे पंचवीस वर्षांतील एक नवी घडामोड म्हणजे नवमध्यम वर्गाचा उदय आणि विस्तार. वाढते नागरीकरण, सेवाक्षेत्राची वाढ, संगणक आणि त्यावर आधारित उद्योगांचा विकास हे आता आपण अनुभवत आहोत. विमा, वित्त, क्रीडा, करमणूक, शिक्षण, माध्यमे, सल्लासेवा, व्यापार, आरोग्य, पर्यटन, दूरसंचार, किरकोळ विक्री, स्वयंचलित वाहने अशा क्षेत्रांमध्ये निवडक रोजगार आणि गुंतवणुकी प्रचंड प्रमाणात वाढल्या आहेत. चंगळवादी संस्कृती आता स्थिरावली आहे. भरपूर पैसा चटकन मिळवण्यासाठी शेअर बाजाराचा आधार घेतला जात आहे. पण त्याच बरोबरीने प्रत्यक्ष कर योजनांचा प्रभावी वापर करून विषमता कमी करण्याच्या दिशेने परिणामकारक कृती दिसत नाही. दोन वर्षांपूर्वी सरकारने निगम करामध्ये भरपूर सवलती दिल्या. त्यामुळे सरकारचे सुमारे दीड लाख कोटींचे कर उत्पन्न बुडाले. देशाच्या इतिहासात प्रथमच निगम कराचा महसूल उत्पन्न कराच्या महसुलापेक्षा कमी गोळा झाला. हा सगळा प्रकार प्रतिगामी ठरला.

मक्तेदारी प्रवृत्तींना अटकाव करून स्पर्धेला उत्तेजन देण्याचे सरकारचे मनापासून धोरण आहे का नाही, अशीच शंका येते. सरकारने मक्तेदारी कायदा रद्द करून २००२ मध्ये स्पर्धा कायदा केला व भारतीय स्पर्धा आयोगाची स्थापना केली. आयोग अस्तित्वात आल्याबरोबर त्याला न्यायालयात आव्हान दिले गेले. त्यामुळे त्याची अंमलबजावणी सुरू होण्यास वर्ष २००९ उजाडले. आता नव्या कायद्यानुसार सरकार मक्तेदारी अनिष्ट किंवा निषिद्ध मानतच नाही. जर मक्तेदारी स्थितीचा दुरुपयोग होत असेल, तरच सरकार त्याविरुद्ध कारवाई करणार. असा दुरुपयोग सिद्ध करण्याचा उद्योग सरकारला करावा लागतो. मक्तेदारीसदृश किंवा निर्बंधात्मक व्यवहार केल्याबद्दल कंपन्यांना कोट्यवधी रुपयांचा दंड केल्याचे सरकार मोठ्या थाटामाटात जाहीर करते. पण बड्या कंपन्या न्यायालयात जाऊन दंड रद्द करून घेतात अथवा त्याला स्थगिती मिळवतात. अशी किती तरी प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. मक्तेदारीवर जर प्रभावी नियंत्रण ठेवता आले असते, तर विषमता घटवण्याच्या दिशेने तो एक ठोस कार्यक्रम ठरला असता. पण तसे घडत नाही. हा कायदा म्हणजे धार नसलेले हत्यार झाले आहे. अमेरिकेतही शेरमन

कायद्यासारखे मक्तेदारीविरोधी कायदे फारसे यशस्वी ठरले नाहीत. अनेक जुने कामगार कायदे रद्द करून भारतात सरकारने सप्टेंबर २०२० मध्ये चार कामगार संहिता संमत केल्या. असंघटित क्षेत्रालाही हे नियम लागू असल्याचे खास करून जाहीर केले. पण त्यासंबंधीचे नियम तपशिलात पाहता, सुमारे ७० टक्के असंघटित कामगार यापासून वंचितच राहणार आहेत. आधार कार्ड वापरून त्यांनी नोंदणी करावी, असे कायदा म्हणतो. पण स्थलांतरित कामगारांनी नेमकी नोंदणी कुठे करायची याबाबत गोंधळ आहे. जर गरीब आणि असुरक्षित मजूर या सर्वांपासून दूर ठेवले जाणार असतील, तर विषमता घटवण्याच्या योजनांना कितीसे यश मिळणार? सन २०२१-२२ च्या ताज्या अर्थसंकल्पाने तर कडीच केली. देशाचा रोख आर्थिक वाढीवर असणार आहे, विषमता घटवणे यावर नाही, असे अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात जाहीरपणे सांगितले. आर्थिक पाहणी अहवालामध्येही हेच ध्वनित आहे. देशाचे प्रमुख आर्थिक सल्लागार के. सुब्रमन्यन यांनी असेच निवेदन माध्यमांमध्ये दिले आहे. जर विषमता दूर करण्याकडे लक्ष दिले नाही, तर गरिबी दूर करण्याची धोरणे फोल ठरतात. पण आपले सरकार हा अनुभवसिद्ध विचार मानतच नाही.

सैद्धांतिक दृष्ट्या पाहता स्पर्धात्मक, बाजारकेंद्री भांडवलशाहीमध्ये संपत्तीचे केंद्रीकरण आणि उत्पन्नातील विषमता हे घडून येण्याची अंगभूत प्रवृत्ती असते. फ्रेंच अर्थतज्ज्ञ थॉमस पिकेती यांनी आपल्या २०१३ च्या आणि २०१९ च्या पुस्तकांमध्ये या प्रवृत्तींचे अगदी तर्कशुद्ध व साधार विश्लेषण मांडले आहे. त्यांची पुस्तके जगभर गाजली. सायमन कुझ्नेत्स हे नोबेल स्मृती पुरस्कारप्राप्त अमेरिकन अर्थतज्ज्ञ. भांडवलशाहीत उत्पादकता वाढल्यामुळे कालांतराने विषमता कमी होत जाईल, असे त्यांनी मांडले. पिकेती यांनी विविध देशांतील विषमतेची अडीचशे वर्षांची सांख्यिकी माहिती वापरून त्यांचे म्हणणे खोडून काढले. मायकेल सांडेल यांचे २०२० चे पुस्तक The Tyranny of Merit आता सगळीकडे चर्चेत आहे. ते हार्वर्ड विद्यापीठ- अमेरिकेत कायदा, राज्यशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांचे प्राध्यापक आहेत. जॉन रोल्स यांच्या प्रसिद्ध सिद्धांतांचा प्रतिवाद केल्यामुळे सांडेल चर्चेत आले. भांडवलशाहीमध्ये श्रीमंतांची सुबत्ता वाढली तर तो त्यांच्या कर्तृत्वाचा विजय मानला जातो; पण गरीब हे अधिक गरीब होत जातात, कारण त्यांच्याकडे पुरेशी कौशल्ये नसतात म्हणून! मग कौशल्यांचा विकास करण्याची जबाबदारी श्रीमंतांची का नाही? समतेचा बळी देऊन गुणशाहीचा मेरिटोक्रसी उदो-उदो काय कामाचा? असे विचार सांडेल उपस्थित करतात. विसाव्या शतकाच्या शेवटी-शेवटी जगातून समाजवादी अर्थव्यवस्था एक-एक करून लयाला गेल्या. तेथील विषमता, पिळवणूक, भ्रष्टाचार ही त्यामागील मोठी कारणे होती. तेथील राजकारणी, पक्षनेते, नोकरशहा यांची वैयक्तिक संपत्ती डोळे दिपवणारी होती.

एकविसाव्या शतकातील एक नवी घडामोड विषमतावाढीस अनुकूल ठरत आहे. अंकाधारी तंत्रज्ञान डिजिटल टेक्नॉलॉजी विषमतेस थेटपणे जबाबदार असल्याचे दिसत आहे. इंटरनेट, संगणक असे हाताशी नसल्याने कोरोनाकाळात शहरी भागातील सुमारे ३० टक्के तर ग्रामीण भागातील ५० टक्के विद्यार्थी संख्या ऑनलाईन शिक्षणापासून गेल्या वर्षी वंचित राहिली, असे आढळून आले आहे. ही ध्रुवीकरण होण्याकडे वाटचाल आहे. अवर्षण, वादळे, अतिवृष्टी, गारपीट, महापूर, तापमान-बदलाची संकटे यांचा मुकाबला करण्यास गरीब लोक अक्षम ठरत आहेत. त्यांना मिळणारी सरकारी मदत बेभरवशाची व अपुरी. समाजातील उच्च गटातील सुदैवी लोक आणि दुसरीकडील गरीब, पीडित जनता यांच्यामधील दरी रुंदावत आहे, असे जाणवते.

सरकारच्या पोतडीतून अनेक विकासयोजना सतत बाहेर पडत असतात. त्यांचा आढावा घेण्याचा पाठ्यपुस्तकी प्रकार येथे करायचा नाही. पण विषमता कमी करण्याचे नेमके उद्दिष्ट केंद्रस्थानी ठेवून योजनांची पुनर्रचना करायला हवी. आधी विकास साधू, समतेचे नंतर बघू- हा दृष्टिकोन आत्मघातकी ठरणार, हे उघड आहे. अंत्योदय, रोख रकमेचे थेट हस्तांतर, मनरेगा या योजना ठीक आहेत. पण त्यांचा आवाका मर्यादित आहे. इतर अनेक योजनांना विषमता घटीचे वळण दिल्याशिवाय तरणोपाय नाही. देशात विषमतेचा निर्देशांक कमी होऊन जर समतेचा निर्देशांक स्थिरपणे वाढता राहिला, तर ते विकासाला अनुकूल तर ठरेलच; शिवाय सामाजिक कल्याण, समाधान, आत्मविश्वास, परस्परस्नेह यांच्या वाढीलाही उपयुक्त ठरेल, हे निश्चित.

**डॉ. संतोष दास्ताने,** पुणे
Mob. 9822009954
santosh.dastane@gmail.com

छाया दातार

# न्या. राजिन्दर सच्चर : एक सच्चा माणूस

राजिंदर सचर हे एक प्रकारे फाळणीचे बळी होते. त्या वेळी अनेक हिंदूंना आणि शीखमंडळींना अचानक एका रात्रीत घरादाराला-मातृभूमीला सोडून यावे लागले, त्यातील ते एक होते. एका अर्थाने फाळणीच्या पूर्व परिस्थितीमध्ये त्यांना सातत्याने हिंदू-मुस्लिम संघर्षाचा जाच व्यक्तिगतरीत्या सहन करावा लागला. आणि तरीही इतर अनेकांसह तेही एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते की, ज्यांनी भारतातील मुस्लिम समाजाची परिस्थिती सुधारावी म्हणून सातत्याने प्रयत्न केले होते. शेवटी मुस्लिम हा भारतातील सर्वांत मोठा अल्पसंख्य समाज आहे, याची नोंद त्यांनी घेतली होती. भारतात आल्यावर त्यांनी भारतीय सोशॅलिस्ट पक्ष पुन्हा एकदा उभा राहील, यासाठी प्रयत्न पण केले होते. त्यांच्या लेखनातून वाट काढताना त्यांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य जाणवते की- त्यांना स्वत:ची मते होती, दृष्टिकोन होता आणि त्यासाठी अतिशय नेटाने संघर्ष करण्याची तयारीही होती.

हल्लीच्या काळात 'बोलणारी' माणसे भेटणे विरळ झाले आहे, म्हणूनच वायरमध्ये त्यांच्या आत्मचरित्राचे परीक्षण आल्यावर मी भारावून गेले. मला वाईट वाटले की, इतक्या भल्या माणसाची मला पुरेशी माहिती कशी नाही? भारतातील मुस्लिम समाजाच्या सद्य:स्थितीबद्दलचा अहवाल यूपीए सरकारच्या काळात त्यांनी लिहिला होता; याचे उल्लेख मी आमच्या मुस्लिम स्त्रीवादी मैत्रिणींकडून पुष्कळदा ऐकले होते. काही आकडेवारीही समोर आली होती, पण ती आकडेवारीच राहिली होती. आज मुस्लिमद्वेष इतका भडकलेला असताना मला वाटले की, या अहवालाचे पुन्हा एकदा पाढे म्हणून दाखवायची गरज आहे. ते करू तेव्हा करू; पण आज तरी या माणसाची ओळख करून घेऊ, असे माझ्या मनात आले. त्यांचे हे आत्मचरित्र ते निवर्तल्यावर प्रसिद्ध झाले आहे, त्यामुळे त्यानिमित्ताने सत्कार समारंभ आणि पुरेशी प्रसिद्धी मिळण्याची शक्यता नाही. पुस्तक दोघांनी मिळून तयार केले आहे. एक आहे त्यांचा एकनिष्ठ सचिव निरंजन कौशिक आणि अतिशय साक्षेपी पत्रकार चित्रा पद्मनाभन. या दोघांची त्यांच्याबद्दल असलेली निष्ठा व आपुलकी पाहता, वाटेत भेटलेल्या सर्वांना आपल्याबरोबर घेऊन जाण्याच्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही. अनेकांबरोबर त्यांचा सहज संवाद होत असे. त्यामध्ये समोरची व्यक्ती कोणत्या वयाची आणि अनुभवाची आहे, हेही ते बघत नसत. उद्याचे जग सुंदर असेल, नव्या जाणिवांचे असेल यावर त्यांचा विश्वास होता.

सच्चर प्रत्यक्ष कधी राजकारणामध्ये निवडून आले नाहीत आणि तरीही ते मनाने राजकारणी होते. बरीच वर्षे तरुणपणी ते संयुक्त समाजवादी पक्षाचे सभासदही राहिले होते. 'हिंद मजदूर सभे'चे काम केले होते. दिल्ली उच्च न्यायालयामध्ये न्यायाधीश आणि नंतर मुख्य न्यायाधीश म्हणून काम करत असताना राजकारणाशी म्हणजेच

सत्तेमधील राजकीय लोकांशी त्यांचा संबंध सतत येत राहिला. त्या वेळी अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या. प्रत्येक घटनेबद्दल त्यांनी स्वत:ची भूमिका घेतली. कोणत्याही आमिषाला बळी न जाता स्वत:ची विवेकबुद्धी सांभाळून ठेवण्याची त्यांची तयारी होती. राजकारणाबद्दल प्रेम असूनही राजकारण अंगाला लावून न घेणारा निरलस माणूस विरळाच.

आजच्या पाकिस्तानात १९२३ मध्ये त्यांचा जन्म झाला होता. जवळजवळ २० वर्षे वयापर्यंत ते लाहोरला राहिले होते. दि.१४ ऑगस्ट १९४७ ला ते पाकिस्तानात होते. त्यांचे वडील तेथील संविधान समितीमध्ये सभासद म्हणून निवडून आले होते. ते भीमसेन सच्चर या गांधीवादी स्वातंत्र्यसैनिकांचे पुत्र होत. मुख्य म्हणजे, महंमद अली जीनांनी पहिल्या स्वातंत्र्यदिनी केलेले भाषण ऐकायला ते उपस्थित होते. त्या भाषणामध्ये जीनांनी 'हे स्वातंत्र्य सर्वांचे आहे; हिंदू, मुस्लिम, शीख सर्व जण आपापल्या धर्माचे पालन करायला स्वतंत्र आहेत,' हे शब्द त्यांनी ऐकले आणि घरी येऊन बघतात तर रेडिओवर हिंदू-मुस्लिम दंग्याच्या आणि हिंसेच्या बातम्या येऊ लागल्या होत्या. त्यांच्या आईचे वडील आणि सर्व कुटुंब उन्हाळ्यासाठी डलहौसीला जाऊन राहिले होते, ते परत येऊ शकले नाहीत. त्यांच्या घरात आधीच कोणी तरी राह्यला आले होते आणि सच्चरांना आतमध्ये यायला मज्जाव करत होते. एवढेच नव्हे तर, आणखी काही दिवसांनी ते स्वत: व वडील दिल्लीहून लाहोरला सामान घेण्यासाठी आले, तेव्हा त्यांचे स्वत:चे घर भारतातून पाकिस्तानात आलेल्या एका मुस्लिम वकिलाला असेच मिळाल्याचे लक्षात आले. नशिबाची गोष्ट एवढीच की, तो वकील खूप सभ्य निघाला आणि त्याने शांतपणे त्यांना सामान बांधण्यासाठी वेळ दिला. हे मुद्दाम सांगायचे अशासाठी की- स्वत: फाळणीचे बळी असूनसुद्धा कधी त्यांना मुस्लिमांबद्दल चीड आली नाही; द्वेष वाटला नाही तर अल्पसंख्याकांचे दु:ख ते समजू शकत होते. पुढे १९४८ मध्ये भीमसेन सच्चर हे पंजाब प्रांताचे मुख्यमंत्रीही झाले होते. त्यामुळेच राजिंदरना जवळच आखाड्यात चाललेले अनेक राजकीय सत्तासंघर्ष आणि घटना जवळून बघण्याची संधी मिळाली. कौतुकाची गोष्ट म्हणजे तरुणपणीचा स्वत:चा उल्लेख करताना ते स्वत:ला फक्त राजिंदर लाल म्हणवून घेताना आढळतात, कारण त्यांना असे वाटते की- आडनाव लावले तर त्यांच्या वडिलांच्या छायेचा ते उपयोग करून घेतात की काय, असे लोकांना वाटेल.

या पुस्तकातून सच्चरांचा जीवनप्रवास- एक मुलगा, एक विद्यार्थी, एक कायदेतज्ज्ञ, एक न्यायाधीश, राजकीय प्राणी, राजकीय कार्यकर्ता आणि पुन्हा अनेकांना दिशा दाखविणारे मेन्टॉर म्हणून पुढे येत राहतो. अतिशय संघर्षमय प्रसंगीही न्यायाची बाजू आग्रहपूर्वक जपणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधोरेखित होत जाते. त्यांच्या जीवनातून हाच संदेश मिळतो की, तुम्ही स्वत:साठी कोणतेही कार्यक्षेत्र निवडलेले असू दे, उदाहरणार्थ- वकील, न्यायाधीश किंवा पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीजचा कार्यकर्ता- या सर्व छोट्या-मोठ्या भूमिकांतूनही शेवटी अर्थपूर्ण आणि आदर्शवत् काम करता येते, हे त्यांनी दाखवून दिले.

काँग्रेसमधून फुटून समाजवादी पक्ष १९४८ मध्ये तयार झाला होता. डॉ.लोहिया आणि जयप्रकाश नारायण यांनी पुढाकार घेतला होता. त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघविरोधी मोहीम सुरू केली होती. त्यांनी काही दिवस हिंद मजदूर संघ या समाजवादी पक्षाच्या कामगार युनियनमध्ये काम केले होते. जॉर्ज फर्नांडिसशी त्यांची ओळख होती. या पक्षातर्फे आपल्याला राज्यसभेमध्ये जाता येईल का, याची त्यांनी चाचपणी केली होती. संसदीय कामातूनच राजकारण पुढे नेता येईल, असे त्यांना वाटत होते. पण ते शक्य झाले नाही आणि त्यांनी वकिली सोडून उच्च न्यायालयातील न्यायाधीशाची नेमणूक पत्करली. त्यांचा पोशाख बदलण्यासाठी कामगार संघटनेचे काम कारणीभूत झाले. कामगारांमध्ये हिंडतांना त्यांच्या लक्षात आले की, पँट आणि कोट घातल्यामुळे एक प्रकारचा दुरावा तयार होतो. म्हणून ते पायजमा आणि कुर्ता घालू लागले. पुढे उच्च न्यायालयामध्येही त्यांनी आपला पोशाख कायम ठेवला. ते अचकन आणि सुरवार असा भारतीय पोशाख घालू लागले. अनेक वेळा सहकाऱ्यांनी सांगूनही त्यात फरक पडला नाही. कामगार संघटनेचे काम करताना त्यांना थोडे अपराधी वाटत असे की, वडील आपली जेवण्या-खाण्याची काळजी घेतात म्हणून आपण असे बिनपैशाचे काम करू शकतो. त्याला विशेष स्वार्थत्याग म्हणता येणार नाही.

सच्चर बोलत राहत आणि आपली भूमिका मांडत राहत. आणीबाणी काळातील दोन घटना खूप बोलक्या आहेत. आणीबाणी जाहीर झाल्यावर सर्वोच्च न्यायालयातील सर्व न्यायाधीशांनी शासनाशी समझोता केला होता. पण बार

कौन्सिलच्या वकिलांनी त्या दिवशी विरोध जाहीर केला आणि सभा घेतली. सच्चर उच्च न्यायालयात न्यायाधीश होते, तरीही ते या निदर्शनांना हजर राहिले. त्याच काळात सिक्कीम राज्य नुकतेच जाहीर झाले होते आणि तेथे उच्च न्यायालय उघडले गेले होते. सच्चरांची बदली तेथील उच्च न्यायलयातील मुख्य न्यायाधीश म्हणून करण्यात आली. त्यांना ती नको होती; पण ज्येष्ठ सहकाऱ्यांनी सांगितले की, यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे लवकर उघडले जातील. तेव्हा सच्चर सिक्कीममध्ये असताना त्या वेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधींनी तेथे भेट दिली. दोन दिवस त्या होत्या. सिक्कीमच्या मुख्यमंत्र्यांनी हेलिकॉप्टर पॅडच्या बाहेर स्वागतासाठी ज्या चार-पाच व्यक्तींची निवड केली गेली, त्यात सच्चरांचे नाव होते. पण त्यांनी निक्षून सांगितले नाही. रात्री जेवताना इंदिराबाईंची भेट झाली, पण अगदी औपचारिक संभाषणाशिवाय ते काहीच बोलले नाहीत. याच इंदिराबाईंच्या हत्येनंतर जे हत्याकांड दिल्ली येथे झाले, ६००० शीख मंडळी मारली गेली. त्या वेळी राजीव गांधींना जाब विचारणारी जी थोडी मंडळी होती, त्यात ते होते. त्यांच्याच दबावामुळे त्या वेळी शोधकमिशन नेमण्यात आले. अर्थात त्याचा फारसा उपयोग झाला नाही, हा इतिहास आहे.

कायदा, न्यायालये आणि न्यायव्यवस्था याबद्दल त्यांची खास मते होती. त्यांचे जीवन म्हणजे भविष्यामध्ये सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायाधीश म्हणून काम करू इच्छिणाऱ्या, किंवा कायद्याशी संबंधित काम करू इच्छिणाऱ्या सर्वांना एक आदर्श आहे. कारण कायदा या ज्ञानशाखेचा उद्देशच मुळी सर्वांत दुबळ्या आणि सत्ताहीन अशा लोकांना न्याय मिळवून देणे हाच आहे. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आणि जेव्हा कोणी  ऐकून घेणार नाहीत, तेव्हा त्यांचा आवाज होणे हेच न्यायदान करणाऱ्यांचे काम आहे, असे त्यांचे मत होते. न्यायाधीशांनी दिवाळीच्या वेळी वकिलांकडून येणारी मिठाई, भेटवस्तू स्वीकारू नयेत- हे ते आवर्जून सांगत असत. तसेच न्यायाधीशांच्या नियुक्त्यांबाबत त्यांच्या मते न्यायाधीशाच्या सामाजिक विचारव्यूहाचा विचार झाला पाहिजे. न्यायाधीश हा संविधानाचा संरक्षक असतो. त्या काळी बांधिलकी असलेले न्यायाधीश योग्य की अयोग्य, ही चर्चा बऱ्याच जोरात चालू होती. त्या वेळी त्यांनी स्वत:चे मत बोलून दाखविले होते. शासनाशी- किंबहुना सत्तेवर असणाऱ्या पक्षाशी बांधिलकी असणे चूक आहे,




या पुस्तकातून स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्य काळासारख्या खळबळजनक काळाचा आलेख रेखाटला गेल्यामुळे अनेक महत्त्वाची माणसे आणि प्रसंग सहजपणे सच्चरांसंदर्भात समोर येतात. उदाहरणार्थ- सच्चरांचे वडील भगतसिंगबरोबर तुरुंगाच्या कंपाऊंडमध्ये फिरत असत, तेव्हापासून ते जीनांनी ऑगस्ट १९४७ मध्ये पाकिस्तान स्वतंत्र होत असताना केलेल्या भाषणचा उल्लेख येतो, तसेच महात्मा गांधींच्या हत्येनंतर बिर्ला हाऊसच्या आवारामध्ये धक्का बसल्यामुळे व्यथित झालेले नेहरू बोलत असताना सच्चरांची आठवण ठळकपणे पुढे येते. आणीबाणीच्या विरोधात केलेले प्रयत्न, नंतर १९८४ ला इंदिरा गांधींच्या हत्येनंतर झालेले शिरकाण या सर्व प्रसंगांची उजळणी त्यांच्या स्वत:च्या मतांनिशी पुढे येते. त्यानंतरचा सर्वांत अलीकडचा प्रसंग म्हणजे मुस्लिम समाजाच्या परिस्थितीचा आढावा घेणारा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर जी प्रचंड टीका सहन करावी लागली, विरोधाला तोंड द्यावे लागले- त्यावेळचे अनुभव.

पण संविधानाशी बांधिलकी असलीच पाहिजे. या पार्श्वभूमीवर त्यांनी कामगार व कंपनी यांच्यामधील केससंबंधी दिलेला निकाल ही बांधिलकी दर्शवितो. खालच्या न्यायालयाने दिलेला निकाल कामगाराच्या बाजूने लागला आणि त्याला त्याचा मागील पगार देण्याबाबत कंपनीसाठी हुकूम निघाला. परंतु कंपनीने आपण वरील न्यायालयात अपील करणार आहोत आणि म्हणून आता पगार देण्याची गरज नाही, अशी भूमिका मांडली. त्यावर सच्चरांनी ५० टक्के रक्कम आता द्या आणि बाकी रक्कम नंतर द्या, असा न्याय दिला. कामगाराने काम केलेले आहे, त्याची भरपाई झाली पाहिजे, ही भूमिका घेतली. तोपर्यंत सर्व कंपन्या खालच्या न्यायालयातील निकालावर स्टे आणत होत्या आणि बिचारा कामगार पैशाविना तडफडत असे. सच्चरांचा निकाल हा आदर्श समजला गेला आणि हीच पद्धत पुढे चालू राहिली. ते एका हाय पॉवर कमिटीचे सभासद होते. त्या कमिटीने रिव्ह्यू कंपनीज ॲक्ट करून १९७८ मध्ये तो अहवाल सरकारला सादर केला. त्यात महत्त्वाची सूचना होती की, कोणत्याही कंपनीला राजकीय पक्षांना देणग्या देण्यास बंदी घालावी. मात्र हा कायदा १९८५ मध्ये सुधारणा करून बोर्ड ऑफ डिरेक्टर्सनी निर्णय घेऊन देणगी देण्यास हरकत नाही, असा करण्यात आला. यानंतर काही कालावधीने तो आणखी सुधारून तीन वर्षे नफ्याच्या सरासरीच्या ७.५ टक्क्यांपर्यंत देणग्या देण्याची परवानगी देण्यात आली. आजच्या राजकारणातील पैशांचे महत्त्व कसे वाढत गेले ते आपण जाणतोच.

या पुस्तकातून स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्य काळासारख्या खळबळजनक काळाचा आलेख रेखाटला गेल्यामुळे अनेक महत्त्वाची माणसे आणि प्रसंग सहजपणे सच्चरांसंदर्भात समोर येतात. उदाहरणार्थ– सच्चरांचे वडील भगतसिंगबरोबर तुरुंगाच्या कंपाऊंडमध्ये फिरत असत, तेव्हापासून ते जीनांनी ऑगस्ट १९४७ मध्ये पाकिस्तान स्वतंत्र होत असताना केलेल्या भाषणाचा उल्लेख येतो, तसेच महात्मा गांधींच्या हत्येनंतर बिर्ला हाऊसच्या आवारामध्ये धक्का बसल्यामुळे व्यथित झालेले नेहरू बोलत असताना सच्चरांची आठवण ठळकपणे पुढे येते. आणीबाणीच्या विरोधात केलेले प्रयत्न, नंतर १९८४ ला इंदिरा गांधींच्या हत्येनंतर झालेले शिरकाण या सर्व प्रसंगांची उजळणी त्यांच्या स्वत:च्या मतांनिशी पुढे येते. त्यानंतरचा सर्वांत अलीकडचा प्रसंग म्हणजे मुस्लिम समाजाच्या परिस्थितीचा आढावा घेणारा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर जी प्रचंड टीका सहन करावी लागली, विरोधाला तोंड द्यावे लागले– त्या वेळचे अनुभव. एखाद्या देशापुढे अनेक आव्हाने उभी असतात आणि सर्वच संवेदनशील नागरिकांना त्यांच्यातून मार्ग काढण्यासाठी अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो.

सामान्य माणसाने, संवेदनशील नागरिकांनी सत्तेला प्रश्न विचारत राहणे, बोलत राहणे हे किती आवश्यक आहे, हे सच्चरांच्या जीवनातून पुन्हा एकदा लक्षात येते. नाही तर फक्त राजकीय पक्षांना आपण राजकीय लढे लढण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिल्यासारखे होते. पुष्कळदा असे प्रश्न विचारत राहणे हे भिंतीवर डोके आपटण्यासारखे वाटून जाते, तरीसुद्धा सतत बोलत राहण्यामुळे चर्चेचा प्रवाह बदलण्यास काही प्रमाणात मदत होते आणि अगदी न वाकणारा नेतासुद्धा काही वेळा नवे विचार अजमावून पाहायला तयार होतो. सच्चरांच्या जीवनचरित्रामधून लक्षात येते की, पूर्वीचे काही न्यायाधीश उदा.– ए.पी.शाह, मदन लोकूर, गोपाल गौडा आणि अशीच काही महत्त्वाची मंडळी जेव्हा त्यांच्या व्यवस्थेबद्दलच्या ज्ञानाच्या जोरावर सत्तेवर असणाऱ्यांच्या कृतीला सतत जबाबदार धरत राहतात, स्पष्टीकरण विचार राहतात; तेव्हा काही प्रमाणात सत्तेला संविधानाच्या तत्त्वांना जागून जनतेला न्याय देण्यास ते भाग पाडू शकतात.

अखेरच्या दिवसांत त्यांचे खरे नाव झाले ते मुस्लिम समाजातील सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचा दस्तऐवज त्यांनी तयार केल्यामुळे (२००६). त्या वेळचे पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांच्या शासनाने त्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या वरिष्ठ पातळीवरील समितीला हा अहवाल तयार करण्याचे आदेश दिले होते. त्या अहवालामुळे मुस्लिम समाजाबाबतच्या चर्चाविश्वाची दिशाच बदलून गेली. त्याचे परिणाम दोन्ही बाजूने झाले. एक तर मुस्लिम समाजाच्या अंतर्गत ह्या चर्चेला योग्य ती दिशा मिळाली आणि तसेच मुस्लिम समाजाच्या बाह्य विश्वातही, देशातही यातील अनेक मुद्दे अधोरेखित होऊन डोळे उघडल्यासारखे झाले. आजपर्यंत मुस्लिम समाजाची चर्चा केवळ त्यांची 'अस्मिता जपणे' या संकल्पनेवर येऊन थांबत असे. आता ती त्यांची पीछेहाट कशी झाली आहे आणि त्यांचे सक्षमीकरण कसे होण्याची गरज या मुद्यावर येऊन ठेपली. एवढेच नव्हे तर मुस्लिम समाजानेसुद्धा सक्षमीकरणासाठी बांधिलकी असल्याचे जाहीर करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली गेली. या

पार्श्वभूमीवर जे सतत काँग्रेसच्या मुस्लिम तुष्टीकरणाबद्दल बोलत होते, त्यांच्या शिडातील हवाच निघून गेली. मात्र दु:खाची गोष्ट अशी की, तो अहवाल प्रसिद्ध झाल्याला आठ वर्षे होत नाहीत तोवर परिस्थितीमध्ये नाट्यपूर्ण बदल झालेला आहे. आता त्यांच्या अस्मितेचा प्रश्न तर मागेच पडला आहे, पण सुरक्षितता आणि त्याहून अधिक त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे.

राजिंदर सच्चर हे एक प्रकारे फाळणीचे बळी होते. त्या वेळी अनेक हिंदूंना आणि शीख मंडळींना अचानक एका रात्रीत घरादाराला, मातृभूमीला सोडून यावे लागले, त्यातील ते एक होते. एका अर्थाने फाळणीपूर्व परिस्थितीमध्ये त्यांना हिंदू-मुस्लिम संघर्षाचा जाच व्यक्तिगत रीत्या सातत्याने सहन करावा लागला. तरीही इतर अनेकांसह तेही एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते की, ज्यांनी भारतातील मुस्लिम समाजाची परिस्थिती सुधारावी म्हणून सातत्याने प्रयत्न केले होते. शेवटी मुस्लिम हा भारतातील सर्वांत मोठा अल्पसंख्य समाज आहे, याची नोंद त्यांनी घेतली होती. भारतात आल्यावर त्यांनी भारतीय सोशॅलिस्ट पक्ष पुन्हा एकदा उभा राहील, यासाठी प्रयत्न पण केले होते. त्यांच्या लेखनातून वाट काढताना त्यांचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य जाणवते की, त्यांना स्वत:ची मते होती, दृष्टिकोन होता आणि त्यासाठी अतिशय नेटाने संघर्ष करण्याची तयारीही होती. त्यांच्यावर अनेक वेळा कट्टर लोकांनी हल्ला करण्याचा व त्यांच्या दृष्टिकोनाचा अपभ्रंश करण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांचे चैतन्य हरपले नाही. ते स्वत: म्हणतात तसे ते त्यांचे वडील व आजोबा यांच्या प्रभावाखाली होते आणि म्हणूनच वैश्विक मानवी आदर्श सांभाळण्याची त्यांनी तात्त्विक पराकष्ठा केली. विश्वबंधुत्वाची कल्पना पावित्र्यपूर्वक जपली.

जर सच्चर आणखी काही काळ जगले असते, तर मागील वर्षी सध्याच्या सरकारविरोधी नागरिकता आणि धर्म जोडला गेल्याच्या पार्श्वभूमीवर (CAA) संबंधित धरणे झाली, त्याबद्दल त्यांनी बरीच टीकाटिप्पणी केली असती. आपल्याला माहिती आहे की, जेव्हा पाकिस्तानची निर्मिती झाली आणि त्यांना लाहोरमध्ये स्वत:च्या घरातून हाकलून लावले गेले होते, त्या वेळी ते व्यथित झाले होते पण रागावलेले नव्हते. नागरिकतेच्या प्रश्नामध्ये धर्म आल्यावर निर्माण होणाऱ्या विद्वेषाची परिणती काय होते, हे त्यांनी स्वत: अनुभवले होते. त्यांना कधी निवृत्त न्यायाधीश म्हटलेले आवडत नसे. म्हणूनच ते १२ वर्षे पीयूसीएल या संस्थेचे काम करत राहिले. काश्मीर प्रश्न नुकताच सुरू झाला होता. त्या वेळी त्यांनी काश्मीरचा दौरा करून जेकेएलएफ या जहाल तरुणांच्या संघटनेबरोबर बोलणी (१९८९-१९९३) करण्याचा प्रयत्न केला होता.

अशा अतिशय सज्जन आणि सच्च्या माणसाला प्रणाम!

**छाया दातार,** मुंबई
chhaya.datar1944@gmail.com

**In Pursuit of Justice**
- Justice Rajindar Sachar
Rupa Publications
Pages 280, Rs. 595

**साधना साप्ताहिकाचे**
**स्वामित्व व अन्य विषयासंबंधी**
**विवरण फॉर्म- ४, नियम ८ अन्वये**

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थान | : | ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०. |
| प्रकाशन अवधी | : | साप्ताहिक, दर सोमवारी. |
| मुद्रकाचे नाव | : | आनंद चिंतामण लाटकर |
| प्रकाशकाचे नाव | : | हेमंत दादासाहेब नाईकनवरे |
| संपादकाचे नाव | : | विनोद शंकर शिरसाठ |
| नागरिकत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०. |
| स्वामित्व | : | साधना ट्रस्ट, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०. |

मी हेमंत दादासाहेब नाईकनवरे, घोषित करतो की माझ्या जास्तीत जास्त माहितीला व विश्वासाला अनुसरून वर दिलेले विवरण खरे आहे.

२० मार्च २०२१ **हेमंत नाईकनवरे** (प्रकाशक)

रवी गोडबोले

# ‘अंतर्नाद’चा पूर्णविराम

‘अंतर्नाद’ हे कसलेल्या तसेच होतकरू लेखकांचं हक्काचं आणि घरगुती व्यासपीठ होतं, ते आज नाहीसे झालं. हे खरंच, पण एक विचार मनात आला की- ‘अंतर्नादने मला काय दिलं?’ उत्तर शोधू लागलो तेव्हा जाणवलं की, सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे वाचनाचा आनंद मुबलक प्रमाणात दिला. चांगलं आणि वेगवेगळ्या प्रकारचं वैचारिक खाद्य दिलं. वरवर अनाग्रही वाटणारे लेखन डोळसपणे वाचायची नवी दृष्टी दिली. फुरसतीने वाचायला आणि लिहायला सुचवलं. वाचताना अंतर्मुख व्हायला शिकवलं आणि चांगल्या लेखनासाठी आवश्यक अशी स्वानुभव, सभ्यपणा व उदारता ही त्रिसूत्री दिली. हे संचित आपल्यापासून कोणीच हिरावू शकणार नाही. हे काय कमी आहे? एक वाचक म्हणून ‘अंतर्नाद’बद्दल कृतज्ञता व्यक्त करणं हे मी माझं कर्तव्य समजतो. अंतर्नादचे संपादक आणि त्यांचे सहकारी यांनी दीर्घ काळ केलेल्या या अजोड कार्याबद्दल त्यांना मन:पूर्वक सलाम.

‘कोरोना’च्या प्रादुर्भावामुळे २०२० मध्ये वर्षानुवर्षे सहजगत्या घडणाऱ्या गोष्टी होऊ शकल्या नाहीत. आपल्याकडची पंढरीची वारी असो किंवा जपानमध्ये होऊ घातलेले ऑलिम्पिक, मग सांस्कृतिक उपक्रम होणे तर दूरच राहिले. पण या सगळ्यात एक गोष्ट सुदैवानं चांगली झाली. ती म्हणजे- ज्याला आधुनिक महाराष्ट्राची समृद्ध परंपरा म्हणता येईल, असे दिवाळी अंक बहुतांशी प्रकाशित झाले आणि ते डिसेंबरच्या सुरुवातीला मला इथे अमेरिकेत घरपोच मिळालेदेखील! त्यामुळे घरकैदेने पुरत्या त्रासलेल्या या वाचकाला भरपूर नवी सामग्री मिळाली. मोठ्या उत्साहानं ‘अंतर्नाद’चा अंक वाचायला घेतला खरा, पण संपादकीय वाचतानाच हा शेवटचा अंक याची जाणीव प्रकर्षानं झाली. अर्थात हे माहीत होतंच, परंतु शेवटी ते घडलं आणि खूप खिन्न झालो. अंतर्नादनं ऐन रौप्यमहोत्सवी वर्षात अशी Graceful Exit घ्यावी, ही चोखंदळ मराठी वाचकांच्या दृष्टीनं खरं तर एक लक्षवेधी व दुर्दैवी घटना आहे. आणि तिची योग्य दखल घेतली जावी, याच एकाच भावनेनं हे मनोगत लिहीत आहे.

माणूस खिन्न झाला की जुन्या चांगल्या आठवणींत रमतो हे खरं, त्यामुळे माझं मन अंतर्नादच्या आठवणी काढत बरीच वर्षे मागे गेलं. तसं पहिलं तर वृत्तपत्रं आणि मासिकं यातलं बरंचसं चांगलं वाचन हे योगायोगानं होत असतं. मी १५ वर्षांपूर्वी मद्रासला राहत असताना मुंबईला भेटायला आलो की, रविवार पुरवण्यांची जपून ठेवलेली कात्रणं वडील मला देत असत (त्यांना वाटे, मला तिथे मराठी वाचायला कसे मिळणार?). एका पुरवणीत संपादकांनी ‘बदलता भारत’ या पुस्तकातील भानू काळेंचे मनोगतच छापलं होतं. ते मला खूप आवडलंच, पण त्याचबरोबर ‘अंतर्नाद’ नावाचं मराठी भाषा आणि संस्कृती याला वाहिलेलं एक छोटेखानी मासिक गेली कित्येक वर्षे काळे पती-पत्नी चालवितात, हे प्रथमच कळलं. मग तत्परतेने






अंतर्नादचा वर्गणीदार होणे आणि त्यातून छापून येणाऱ्या लेखांचा आनंद लुटणे या गोष्टी ओघाने आल्याच! तेव्हा आपण अंतर्नादचे वर्गणीदार आधीच का झालो नाही याची खंत वाटली होती; परंतु पुढची अनेक वर्षे या मासिकाचा आस्वाद मला घेता आला, हेही नसे थोडके!

आता यंदाच्या दिवाळी अंकाबद्दल. २०२० च्या दिवाळी अंकात गेल्या २५ वर्षांतील निवडक लेखन संकलित केलेले आहे. त्यावर नजर फिरवली तर– किती तरी नावाजलेल्या आणि त्याचबरोबर काहीशा अपरिचित व्यक्तींना अंतर्नादने कसे बांधून ठेवले, प्रोत्साहित केले याचा अंदाज येतो. ही पुनर्भेट संग्राह्य झाली आहेच. त्यामुळेच की काय, मीदेखील जपून ठेवलेले जुने अंक परवा चाळत बसलो होतो. आणि जाणवले की, एकंदरीतच असे लेखन– जे मोठ्या वृत्तपत्रात किंवा मासिकांत जागेच्या मर्यादेमुळे वा अन्य कारणांमुळे छापले जाणे शक्य नव्हते ते– 'अंतर्नाद'च्या संपादकांनी आवर्जून छापले. उदा.– पं.भीमसेन जोशी यांचे ज्येष्ठ पुत्र राघवेंद्र जोशी यांच्या 'गाणाऱ्याचे पोर' पुस्तकातील एक प्रकरण किंवा ना.सी. फडके यांच्या कन्येने लिहिलेल्या आठवणी. दोन्ही लेखकांनी मनात साचलेल्या भावनांना मोकळेपणाने वाट करून दिलेली आहे. आणखी एक साठवण म्हणजे डॉ.सरोजा भाटे यांचा संस्कृत भाषेतली सौंदर्यस्थळं उलगडून दाखवणारा 'निद्रिस्त परी' हा सुंदर लेख. 'तेलुगू-मराठी घरोबा' हा विजय पांढरीपांडे यांचा लेख, हेरंब कुलकर्णी लिखित 'ग्रामीण दारिद्र्याची शोधयात्रा' किंवा 'मालदीव सोडताना' हे ज्ञानेश्वर मुळे यांचे कथन. याशिवाय काहीशा अपरिचित माणसांवर त्यांच्या आप्तेष्टांनी लिहिलेली सुंदर व्यक्तिचित्रं. अशी किती उदाहरणे सांगावीत!

कवितेवर संपादकांचे खास प्रेम असावे, इतकी जागा कवितेसाठी अंतर्नाद देत असे. कोणताही अंक चाळलात तर त्यांत जागोजागी कविता दिसतात– अगदी जाहिरातीतही! काव्यप्रकारावर आधारित 'सदरे' वेळोवेळी चालवलेली आढळतात. कविवर्य पाडगावकर कुठलेही मासिक उघडताच त्यातल्या कविता सगळ्यात आधी वाचायचे, असं म्हणतात. मला खात्री आहे की, त्यांनी 'अंतर्नाद'ला अगदी उत्तम गुण दिले असणार! मुखपृष्ठावरील चित्रं आणि चित्रकलेवरची सदरं हे इथले आणखी एक दालन... ती लिहिण्यासाठी त्यांनी नामवंत चित्रकारांना लिहितं केलं.

मला स्वतःला आवडणारा एक भाग म्हणजे वाचकांचा प्रतिसाद. यातली काही पत्रं जरुरीपेक्षा अधिकच 'दीर्घ'

असली तरी बहुतांशी वाचनीय असत किंवा पोटतिडिकीने लिहिलेली असत. कदाचित अशा पत्रांवर कात्री चालवण्यापेक्षा ती तशीच छापली तर पत्रलेखकांना (ज्यात मीही आलो!) प्रोत्साहन मिळू शकतं आणि त्यातले काही पुढे चांगले लेखन पाठवू शकतील, हाही उदार विचार असावा.

मला वाटतं की, अंतर्नाद हा अडीचखांबी तंबू. पहिला खांब म्हणजे हे मासिक निष्ठेने चालवणारे काळे पती-पत्नी (आणि व्याकरण सल्लागार यास्मिन शेख), दुसरा वर्गणीदार-आश्रयदाते यांचा आणि डगमगणारा अर्धा खांब जाहिरातदारांचा! तरीदेखील मासिक २५ वर्षे नेटाने टिकून राहिलं; हे कसे? माझ्या मते, वर उल्लेखलेल्या वैविध्यपूर्ण गोष्टींबरोबरच संपादकांच्या स्वतःच्या लेखनशैलीचाही त्यात सिंहाचा वाटा आहे. यात वेळोवेळी खाद्य आणि भ्रमंती यावर खुसखुशीत लिहिणाऱ्या कार्यकारी संपादिका वर्षा काळेदेखील आल्या.

भानू काळे यांचे संपादकीय म्हणजे वाचकांशी हळुवारपणे केलेले हितगुजच जणू. याची इतकी सवय होऊन गेली होती की, दोन वर्षांपासून मासिक स्वरूप बंद झाल्यानं मला चुकल्यासारखे वाटे, काही तरी गमावल्यासारखे वाटे! अर्थात वेळोवेळी त्यांनी लिहिलेल्या दीर्घ लेखांत 'लेखक' भानू काळे दिसून येतात. गेली काही वर्षे अशा लेखांद्वारे ते शरद जोशी यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याची व सुचवलेल्या मूलभूत उपायांची ओळख करून देताना किंवा विस्मृतीत गेलेल्या समतानंद गद्रे यांचे सामाजिक क्षेत्रातले काम लोकांपर्यंत पोहोचवताना दिसले. महर्षी शिंदे यांच्या शैक्षणिक कार्याचा त्यांनी फार सुंदर आढावा घेतल्याचे स्मरते. हे लेख संशोधनात्मक असल्याने काहीसे भरीव व माहितीपूर्ण आहेत. त्यामानाने त्यांचे आधीचे लेख जास्त सुटसुटीत आणि जास्त आकर्षक झाले आहेत. त्यातले विषय काहीसे नैमित्तिक असतीलही, पण लेखन विचार करायला लावणारे. अंतर्नादच्या सुरुवातीपासून २००७ पर्यंत वेळोवेळी त्यांनी लिहिलेल्या लेखांचे संकलन 'अंतरीचे धावे' (मौज प्रकाशन गृह) या संग्रहात झाले आहे, त्यातील मला भावलेल्या दोन-तीन लेखांविषयी थोडक्यात!

जे.आर.डी.टाटा यांचावरील एका पुस्तकावर एक सुंदर लेख येतो. त्यात जेआरडींनी रुजवलेली व्यवस्थापनशैली, एअर इंडियाबद्दलचे त्यांचे प्रेम आणि पुढे त्यातूनच त्यांच्या वाट्याला आलेली कटुता यावर भानू काळे छान टिप्पणी करताना दिसतात (आता २०२१ मध्ये आर्थिक डबघाईला आलेली 'एअर इंडिया' टाटा समूहाने जर पुन्हा विकत घेतली तर that will be a sweet justice!). एखादी कंपनी निव्वळ नफ्याइतकेच महत्त्व सामाजिक बांधिलकी आणि Human Resources या गोष्टींनाही देऊ शकते याचा प्रत्यय येतो. अर्थात १९९१ नंतर रतन टाटांच्या नेतृत्वाखाली टाटा ग्रुप बराच बदलला. तरी आपला मूळ पंथ त्यांनी सोडलेला नाही, हे मी स्वतः जमशेदपूर व कुर्ग येथे अनुभवले आहे.

भानू काळे स्वतः एके काळी मुद्रण व्यवसायात होते आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी बरीच मुशाफिरी केली आहे. साहजिकच त्यांनी 'इंडिया टुडे'चे सर्वेसर्वा अरुण पुरी यांची वाटचाल फार आत्मीयतेने आणि त्या क्षेत्रातल्या बारकाव्यांसह मांडली आहे. चांगल्या समाजाभिमुख (त्याचप्रमाणे चटकदार) विषयांवर अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून एक मासिक निघते आणि निव्वळ अभ्यासपूर्ण लेख व आकर्षकता यामुळे ते दिवसेंदिवस लोकप्रिय होत जाते, ही कल्पनाच ८० च्या दशकात करवत नसे! इंग्रजी मासिके वाचायचे माझे वेडही 'इंडिया टुडे'पासूनचेच. पत्रकारांना पुरी यांनी त्या वेळी दिलेल्या सोई आणि स्वातंत्र्य हे आजही बऱ्याच ठिकाणी मिळत नसेल. आणि आणीबाणी व दहशतीच्या काळात एखादी बातमी खरी असेल, तर ती छापण्याचे धारिष्ट्य तरी आज कुठे दिसते? बरीचशी पत्रकारमंडळी, नेते आणि नोकरशहा यांच्यात मिलीभगत असल्यासारखी वाटते. त्यामुळे अरुण पुरींसारख्या व्यक्तीबद्दल अचंबा वाटतो.

शांता शेळकेंना त्यांनी वाहिलेली आदरांजली ही एका अतिशय गुणी व्यक्तीचे मूल्यमापन आहे. शांताबाई किती व्यासंगी, अभ्यासू तितक्याच साध्या आणि भावुक होत्या याची प्रचिती हा लेख वाचताना येते. त्यांचे इंग्रजी वाचन किती चौफेर होते, याची कल्पना त्यांच्या मराठमोळ्या अवताराकडे बघून पटकन येत नसे, अशा अर्थाचे त्यांचे प्रांजळ आणि अचूक निरीक्षण मला खूप भावले! एका बाईने त्या काळात कविता, लेखन, गीत व पटकथालेखन या काहीशा पुरुषी प्रांतात स्वतःचा स्पष्ट ठसा उमटवला याचे ते तोंड भरून कौतुक करतात. त्याचबरोबर जाणवलेले स्वभावविशेष, हरहुन्नरी वृत्तीमुळे त्यांच्या legacybm आलेल्या मर्यादा यावरही काळे स्पष्टपणे लिहितात; अर्थात तेही शांताबाईंवरच्या जिव्हाळ्यापोटीच!

हे लेख वाचले की भानू काळे हे काय ताकदीचे लेखक-संपादक आहेत याची कल्पना येते आणि लगेच जाणवते की, ते हस्तिदंती मनोऱ्यात बसून लेख लिहिणारे संपादक नाहीत. अर्थकारण, राजकारण, जागतिकीकरण आणि त्याचे मराठी समाजावर व भाषेवर होणारे बरे-वाईट परिणाम हा त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे व त्यात ते खरे रमतात. आणि ते करताना उसनं ढोंग आणण्यापेक्षा सुसंस्कृत, शहरी व मध्यमवर्गीय या आपल्या कक्षा ते सोडत नाहीत. बहुतांशी स्वतः प्रवास किंवा शोधयात्रा करून अनुभवलेल्या गोष्टींवरच ते मोकळेपणे लिहितात. त्यात राणा भीमदेवी थाटाचे लेखन नसते किंवा 'मी सांगत नव्हतो का?' ही आत्मप्रौढीही नसते. आपला मुद्दा माहितीच्या आधारावर ते सभ्यपणे पण नेटाने मांडत राहतात.

आज 'अंतर्नाद'चा प्रवास थांबल्यावर भानू काळे यांनी २००५ मध्ये लिहिलेल्या 'अंतर्नादची दशकपूर्ती : थोडे प्रकट चिंतन' या लेखाचा उल्लेख करणे उचित ठरेल. हा लेख म्हणजे एक छोटे मासिक चालवताना, संपादन करताना येणाऱ्या अडचणी, परंतु त्याचबरोबर मिळणारे आंतरिक समाधान यावर मोकळेपणे केलेले भाष्यच. मी वाचलेल्या चिंतनपर लेखांपैकी तो एक सर्वोत्तम लेख आहे आणि मुख्य म्हणजे त्यात कुठेही त्यागाचा, अन्याय झाल्याचा सूर नाही! आपण जाणीवपूर्वक एक कार्ययज्ञ करतो आहोत आणि ते यज्ञकुंड यथाशक्ती पेटते कसे ठेवता येईल, हीच भावना आहे. मराठी माणसाला सकस आणि शुद्ध लेखन देत राहणे हेच त्यांचं ब्रीद व हीच त्यांची ऊर्जा, हे वाचकाला जाणवल्याशिवाय राहत नाही. त्यांना चिंता असलीच तर मासिक स्वबळावर दीर्घ काळ कसे तगेल, कालानुरूप त्यात काय बदल केले पाहिजेत आणि ते करताना मूळ उद्देश व निष्ठावंत वर्गणीदार यांच्यावर अन्याय होणार नाही ना- याची आहे! सत्यकथा बंद करण्यामागची आपली भूमिका श्री.पु.भागवतांनी एका लेखात मांडली होती आणि पुढे सत्यकथा बंद करावे लागले. तो लेख आणि भानू काळेंचा हा लेख यात मनाला चटका लावणारे साधर्म्य आहे. परंतु, ते कटु वास्तव आपण वाचक किंवा आश्रयदाते बदलू शकलो नाहीत, हे आज खेदाने मान्य करावे लागते.

खरं तर आज तीन-चार जणांचे कुटुंब उडप्याच्या हॉटेलात जेवायला गेले तर जितके बिल होते तितकीच अंतर्नादची वार्षिक वर्गणी होती! मग १० कोटींच्या महाराष्ट्रात ३००० पेक्षा जास्त वर्गणीदार त्याला का मिळाले नसावेत? शेकडो कोटींचे व्यापार करणारी आणि समाजात मराठी उद्योजक म्हणून टेंभा मिरवणारी मंडळी अंतर्नादसारख्या उपक्रमांना सढळ हस्ते जाहिराती का देत नसावीत, हे प्रश्न मलाही पडतात. जणू काही मराठी सांभाळण्याची जबाबदारी फक्त भानू काळेंसारख्या मंडळींवर आपण सोईस्करपणे टाकून मोकळे होतो. अर्थात आता हे प्रश्न विचारायला किंवा त्यांची उत्तरे शोधायला बराच उशीर झाला आहे!

'अंतर्नाद' हे कसलेल्या तसेच होतकरू लेखकांचं हक्काचं आणि घरगुती व्यासपीठ होतं ते आज नाहीसे झालं, हे खरंच; पण एक विचार मनात आला की, 'अंतर्नादने मला काय दिलं?' उत्तर शोधू लागलो तेव्हा जाणवलं की, सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे वाचनाचा आनंद मुबलक प्रमाणात दिला. चांगलं आणि वेगवेगळ्या प्रकारचं वैचारिक खाद्य दिलं. वरवर अनाग्रही वाटणारे लेखन डोळसपणे वाचायची नवी दृष्टी दिली. फुरसतीने वाचायला आणि लिहायला सुचवलं. वाचताना अंतर्मुख व्हायला शिकवलं आणि चांगल्या लेखनासाठी आवश्यक अशी स्वानुभव, सभ्यपणा व उदारता ही त्रिसूत्री दिली. हे संचित आपल्यापासून कोणीच हिरावू शकणार नाही. हे काय कमी आहे?

एक वाचक म्हणून 'अंतर्नाद'बद्दल कृतज्ञता व्यक्त करणं, हे मी माझं कर्तव्य समजतो. अंतर्नादचे संपादक आणि त्यांचे सहकारी यांनी दीर्घ काळ केलेल्या या अजोड कार्याबद्दल त्यांना मन:पूर्वक सलाम आणि पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा!

**रवी गोडबोले,** ॲटलांटा
ravigod08@rediffmail.com

# साधना प्रकाशनाची

# 75 पुस्तके e-book स्वरूपात kindle वर उपलब्ध

नोकरशाहीचे रंग • राजकारणाचा ताळेबंद • बापू : एकभाषित चिंतनकाव्य
हिंदभक्त विदेशिनी • बहादूर थापा • दलपतसिंग येती गावा • ऋतू बरवा
विज्ञान आणि समाज • चिखलाचे पाय • वाचता वाचता • शाळाभेट
गांधीजी आणि त्यांचे टीकाकार • स्वामिनाथन • दंतकथा • उघडा, दरवाजे उघडा!
प्रश्न तुमचा उत्तर दाभोलकरांचे • कोऽहम • मन्वंतर • युगांतर • सेंटर पेज • तारांगण
तीन तलाक विरुद्ध पाच महिला • श्यामची आई • लाल श्याम शाह
तीन मुलांचे चार दिवस • आठ प्राथमिक शिक्षकांची आत्मवृत्तं • हिरवे पान
विवेकाचा आवाज • चले जाव • इस्लाम आणि सहिष्णुतेचे भवितव्य • कालपरवा
माझे शिक्षक • सा. रे. पाटील बोलतोय • हे मित्रवर्या • वारसा प्रेमाचा
सार्क विद्यापीठातील दिवस • तात्पर्य • आठवणी जुन्या शब्द नवे • थर्ड अँगल
शोधयात्रा : ईशान्य भारताची • बिकट वाट • न पेटलेले दिवे • डिकन्स आणि ट्रोलॉप
लाटा लहरी • लॉरी बेकर • ऐकता दाट • इकेबाना • मी भरून पावले आहे
लढे अंधश्रद्धेचे • नक्षलवादाचे आव्हान • कैफियत • झुंडीचे मानसशास्त्र • जमीला जावद
मला प्रभावित करून गेलेला सिनेमा • कानोसा– भारतातील मुस्लिम मनाचा
पोशिंद्याचे आख्यान • इस्लामचे भारतीय चित्र • बिजापूर डायरी • रुणानुबंध
थैमान चंगळवादाचे • मेळघाट : शोध स्वराज्याचा • तरुणाईसाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर
चार्वाक • एकाकी • शोधयात्रा : ग्रामीण महाराष्ट्राची • चकवा • अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट
कारंत चिंतन • उंबरठ्यावर • गुलामगिरीतून गौरवाकडे • भारतातील मुस्लिम राजकारण
असेही विद्वान • श्याम • धडपडणारा श्याम • श्यामचा जीवनविकास
वरदान रागाचे • अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट • पुढे जाण्यासाठी मागे वळून पाहताना

**सर्व पुस्तकांच्या किंमती**
**५० ते २०० रुपये या दरम्यान**
ऋीशश ुळींह झळपवश्रश ‍पिश्रळाळींशव ाशालशीहळि

**आणखी ७५ पुस्तके**
**आगामी पाच महिन्यांत**
**क्रमाक्रमाने उपलब्ध होतील...**

also available on amazon.in

अधिक माहितीसाठी संपर्क
**साधना** प्रकाशन
431, शनिवार पेठ, पुणे 411030
Ph 02024459635 • mediasadhana@gmail.com



Today's good mood is brought to you by
monginis
Go ahead Celebrate!
Get this Designer Ceramic Mug worth ₹200/- FREE*
BLOOM YOUR HAPPINESS WITH
monginis
*on purchase of 1.5 Kg & above Monginis Birthday Cake, Wedding Cake or Special Cake. T&C apply. Limited period offer.
Have you tried our latest items ?
New items launched every month
Prawns Rissois
Duet Choco Bix
Chicken Chops
Brownie Magic
Chocolate Croissant

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6 / 31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/ 2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting : 15-3-2021 / Date of Publication : 15-3-2021



# 'मौज'ची नवीन प्रकाशने

लवकरच...




कथासंग्रह

**त्रिपर्ण**
मोनिका गजेंद्रगडकर




**बेबीचं जग**
अजिता काळे

अमेरिकेसारख्या प्रगत देशात वर्षानुवर्षं वास्तव्य असलेल्या भारतीय मनांचा नि समांतरपणे तिथल्या व्यवस्थेशी जुळवून घेताना निर्माण झालेल्या मूल्यात्मक, कौटुंबिक, वांशिक प्रश्नांचा अन्वयार्थ शोधणाऱ्या खोल दीर्घकथा.

एका बुद्धिमान, चौकस अशा कुमारवयीन मुलीच्या निरागस विश्वाचा एक लोभस कॅलिडोस्कोप.




**चिं० त्र्यं० खानोलकर आदिपर्व**
जया दडकर




**भुयपर्मळ**
रश्मी कशेळकर

कविता, पत्रे, लेख, मुलाखती यांसारख्या साधनसामग्रीतून चिं० त्र्यं० खानोलकर नावाच्या प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला सर्वांगीण वेध.

मालवणी भाषेचा लहजा पकडत, कोकणच्या मातीतील रंग, गंध, स्पर्श, नाद अशा विविध संवेदनांचा जिवंत प्रत्यय देणारे आगळे ललितलेखन.

## मौज प्रकाशन गृह

युनिट नं० ५, ७, ८, पहिला मजला, म्युनिसिपल इंडस्ट्रियल इस्टेट, वी० पी० रोड, विले पार्ले ( प० ), मुंबई ४०० ०५६.
Tel- 23871050 / 23872426 E-mail : moujprakashan@gmail.com